


स. ग्रं. सं. ठाणें

विषय

सं. नं.

REFBK-0005696


ना. भा. खोरकर

वा. भ. बोरकर

# कागदी होड्या

( लघुनिबंध )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५६९५
ग्रंथ शाखा

REFBK-0005696

श्री शिवाजी मुद्रणालय
नवीन - गोवें
१९३८

किंमत] [१२ आणे

**Editor:—** *Paraxurama S. Quensorí*

Com o Curso Complementar de Letras

Composto e impresso na Tipografia

**Shri Shivaji**

**NOVA GOA**

*Propriedade de Esvonta Poi Anqló*

माझे सुहृद

प्रो. रामचंद्र शंकर नायक

व

श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई

यांस

१०८८५
ग्रं. ७१

# प्रस्तावना

माझे मित्र श्री. बा भ. बोरकर यांच्या या लघुनिबंधसंग्रहाला मी प्रस्तावना लिहितों आहें हें कळल्याबरोबर माझा एक मित्र उपरोधिक स्वरांत उद्गारला, "आतां बहुतेक या निबंधांच्या गुणवर्णनाखेरीज तुझ्या प्रस्तावनेंत दुसरं कांहीं आम्हाला वाचायला मिळणार नसेलच !" त्याच्या म्हणण्याचा रोख असा होता कीं प्रस्तावना लिहिण्याचा मान मिळाल्यामुळें या निबंधासंबंधीं माझें निःपक्षपाती, प्रामाणिक मत न सांगतां मी फक्त त्यांतलें चांगलें तेवढेंच दाखवणार. तो प्रश्न विचारतांना त्याची अशी अपेक्षा होती, कीं मी निःस्पृह रामशास्त्री प्रभुण्यांचा आव आणून एकदम उलटून म्हणेन, "छे. छे. मी कसलीही पर्वा न करतां अगदीं न्यायनिष्ठुरपणें या पुस्तकांतले गुण तसेच दोषही दाखवणार आहें." पण त्याची अपेक्षा मला मुळींच पुरी करावयाची नव्हती. आणि तें सुद्धां त्याला केवळ चिडविण्याकरतां नव्हे, तर मला खरोखरच तसें वाटतें म्हणून. मी शांतपणें म्हणालों, "तुझं म्हणणं अगदीं खरं आहे. मी या पुस्तकांतले बहुतेक गुणच दाखवणार आहे. आणि त्याचं कारण असं, कीं मला प्रस्तावना लिहावयाची आहे—टीका नव्हे."

प्रस्तावनाकारावर अशा तऱ्हेचा हल्ला चढवणारे माझ्या मित्राप्रमाणेंच इतरही पुष्कळ लोक आहेत. त्यांच्या एवढें ध्यानांत येत नाहीं,

कीं प्रस्तावनाकार आणि टीकाकार यांच्या भूमिकेंत पुष्कळच फरक आहे. माझ्या मतें प्रस्तावनाकाराचें काम नवरी मुलगी दाखवावयाला नेणाऱ्या तिच्या भावासारखें किंवा मामासारखें आहे. आपली बहीण नवऱ्या मुलाला दाखवतांनां, "पहा, बुवा. ही गरीब आहे खरी, पण केव्हां केव्हां असा भांडकुदळपणा करते, कीं सांगतां सोय नाहीं ! तसंच आतां चांगली तुकतुकीत, निरोगी दिसत आहे, पण वर्षांतून एक दोनदां तरी आजारी पडते. हो, मी आपलं खरं तें सरळ सांगतों.," असं जर तो भाऊ मोठ्या निःपक्षपातीपणाचा आव आणून सांगूं लागला, तर त्याला तुम्ही काय म्हणाल ? अशा प्रसंगीं सर्वसाधारणपणें त्या भावानें तिचे गुणच सांगितले पाहिजेत. म्हणजे नसलेले गुण तिच्या अंगीं लावून तिची खोटीनाटी स्तुती केली पाहिजे, किंवा ती मुकी अथवा बहिरी असली तरी ते दोष लपवून त्या मुलाला त्यानें फसविलें पाहिजे असा त्याचा अर्थ नव्हे. सुदैवानें श्री. **बोरकर** यांच्या या **'कागदी होड्यांना'** प्रस्तावाचे चार शब्द लिहितांनां चांगली गोरीगोमटी आणि अभिमानानें दाखवण्यासारखी बहीण पुढें करणाऱ्या भावासारखीच माझी स्थिति झाली आहे.

'लघुनिबंधांत काय असावें,?' असा प्रश्न विचारणारांनां 'त्यांत काय नसावें ?' असा उलट प्रश्न विचारून मी नेहमी उत्तर देतों. मात्र यशस्वी लघुनिबंधांत एक गोष्ट असलीच पाहिजे. आणि ती म्हणजे तो लिहिणाऱ्या लेखकाचें स्वतंत्र व्यक्तित्व त्यांत ओतप्रोत भरलेलें असलें पाहिजे. हा निबंध सुंदर आहे, असें वाचकानें म्हणण्यापेक्षां निबंधावरलें नांव पाहिल्याशिवाय तो वाचल्यानंतर हा निबंध अमक्या लेखकाचा आहे, असे उद्गार तावडतोब त्याच्या तोंडातून बाहेर पडले पाहिजेत. हें झालें ज्यानें पांच दहा निबंध लिहिले आहेत अशा लेखकासंबंधीं. पण नवीन लेखकासंबंधींही असें म्हणतां आलें पाहिजे, कीं या निबंधांतले विचार किंवा त्यांची मांडणी विशेष चांगली नसेल, तरी पण यांत कांहींतरी वेगळेपणा खास आहे. प्रत्येक माणूस ज्याप्रमाणें तो उंच असो

किंवा ठेंगणा असो, लहान असो अगर मोठा असो, सुरूप असो किंवा कुरूप असो, जगांतल्या इतर सर्व माणसांहून कांहीं तरी निराळा असतो त्याप्रमाणेंच लघुनिबंधलेखकाचें असलें पाहिजे. इतर कुठल्याही मोठ्या अगर यशस्वी लेखकाचें अनुकरण न करतां स्वतःचे बरे वाईट विचार त्यानें स्वतःच्या बऱ्यावाईट पद्धतीनें मांडले पाहिजेत. तरच आज ना उद्यां तो मोठा किंवा यशस्वी लघुनिबंधलेखक होऊं शकेल.

या दृष्टीनें श्री. बोरकर यांच्या लघुनिबंधांकडे पाहिलें असतां डोळ्यांत भरण्यासारखें त्यांचें वैशिष्ट्य जर कुठलें आढळत असेल तर त्यांची गोड काव्यमयता. '**कागदी होड्यां**'तला कुठलाही निबंध तुम्ही उघडून पहा, कुठे ना कुठे तरी त्यांचा हा गुण तुमच्या दृष्टीला पडेल. ऊर्मिगीतें (lyrics) लिहिणारे ते एक उत्तम कवि आहेत; आणि लघुनिबंध लिहितांनासुद्धां त्यांच्यांतला कवि मधून मधून जोरानें उसळी मारल्याशिवाय रहात नाहीं. 'गोल्डफ्लेक' सिगारेटवर त्यानीं लिहिलेला निबंधच पहा. अगदीं खेळकर वृत्तीनें त्यानीं तो लिहावयाला सुरवात केली आहे. आणि त्याच वृत्तीनें त्यानीं तो जरा वाजवीपेक्षां फाजील लांबवलाही आहे. पण शेवटीं एकदम त्यांचा हा खेळकरपणा नाहींसा होतो, आणि मूळ प्रकृति जागृत होऊन ते पुढीलप्रमाणें नितांतरम्य काव्यमय उद्गार काढतात: "माझ्या बोटांनां एकाएकी चटका बसला. सिगारेट केव्हांच जळून गेली होती. राख इतस्ततः सांडली होती व इवल्याशा थोटकांतून धुराची बारीक ओळ आकाशांत चढत होती. दहा मिनिटांपूर्वीची सिगारेट आतां कुठें होती? राख व धूर यांत तीचं रुपान्तर झालं होतं. जीवनाची तरी गत हीच नाहीं का? सिगारेटसारखी आपणालासुद्धां कुठून तरी चेतना मिळते. आपण अखंड व संथपणें जळत रहातों. याचं नांव जीवन; आणि कुणाला तरी चटका लावून अदृश्य होतों याचं नांव मरण...". हा निबंध तितकासा चांगला नाहीं,—थोडा कंटाळवाणा झाला आहे, असें माझें मत आहे. पण शेवटल्या या सुंदर विचारानें सर्व कांहीं भरपाई झाल्यासारखी वाटते.

यामुळेंच ज्या ज्या निबंधांत इतर सर्व मोह बाजूला सारून त्यांनीं आपल्या या काव्यमयतेला यथेच्छ मोकळें सोडलें आहे ते ते निबंध मला पुनः पुनः वाचावेसे वाटतात. 'काळोखा'वरल्या निबंधांतली पुढील कल्पना किती भव्य आणि हृद्य आहे, "......हें दृश्य म्हणजे काळोखाचें—नव्हे—श्रीकृष्णाचें विराटस्वरूप वाटलें मला. आणि उघड्या शिंपल्यासारखें तें आकाश म्हणजे श्रीकृष्णाचा वरदहस्तच. त्याच्या तळहातावरच्या तेजोरेषा, ग्रहांचे उंचवटे वगैरे सर्व शुभचिन्हें मला दिसूं लागलीं......". किंवा '**कागदी होड्या**' या पहिल्याच निबंधांतलें पावसाळी दिवसांचें वर्णन पहा, "......काळ्या निळ्या ढगांनीं आकाश व्याप्त झालं, वीज गमतीनं झिम्मा खेळूं लागली, तिचं पाऊल चुकलेलं पाहून तिचा लबाड भाऊ दडल्या ठिकाणाहून खदखदा हसूं लागला म्हणजे आम्हा पोरांच्या आनंदाला घर अपुरं पडे.. ..." अशीं किती तरी उदाहरणें दाखवून देतां येतील.

पण काव्यमय कल्पना एवढेंच श्री. **बोरकरांचें** वैशिष्ट्य नाहीं. त्यांच्या काव्यमयतेला तत्त्वचिंतनाचा गाभा आहे. किंबहुना काव्यमयता आणि तत्त्वचिंतन यांचें गोड मीलन हेंच त्यांचें वैशिष्ट्य होय. 'लेखकांचे तीन वर्ग' या निबंधांतला शेवटचा परिच्छेद माझ्या मतें काव्यमय तत्त्वचिंतनाचा सुन्दर नमुना आहे. 'कांहीं लेखक आपल्या पुस्तकाहून लहान असतात. कांहीं त्यांच्या समान असतात, तर कांहीं त्यांच्याहून कितीतरी पटीनं मोठे असतात' असे लेखकांचे तीन वर्ग पाडून श्री. **बोरकर** म्हणतात, "......मानवतेचे मूळ रंग तिघांकडेही असतात. पण पहिला भडक रंग फांसून जगाचें लक्ष आपल्याकडे वेधून घेऊं पहतो. दुसरा रंगांचें वैचित्र्य व विविधता दाखवून त्याला स्तिमित करण्याच्या विचारांत असतो, तर तिसरा आपल्या जीवनाला रूप देण्यासाटीं रंगाचा उपयोग करून घेतो. आपली परिणती करून घेण्यासाटीं तो लिहितो. विश्वभर विस्तारलेल्या आपल्या मनाला तो वाचा फोडतो आणि म्हणूनच

त्याची कलाकृती मानवतेवर दिवसा सूर्यासारखी जीवनवर्षाव करते तर अंधाऱ्या रात्रीं तिला विजेप्रमाणें 'वैऱ्याची रात आहे जागा रहा' असा इषारा देते. ती आपणाला सांगते, कीं जीवन केवळ मधुरच नाहीं तर विशालही आहे."

असलीं सुन्दर विचारमौक्तिकें या संग्रहांत ठिकठिकाणीं विखुरलेलीं आढळून येतील. 'अलिखित चरित्रें व अनामिक महात्मे' या निबंधांत "......ज्यावेळीं आपण लिहितों किंवा बोलतों त्यावेळीं सत्य लपवतों तर जेव्हां आपण करतों अथवा वागतों तेव्हां तें व्यक्त करतों......चारित्र्य घडविणें म्हणजे चरित्र लिहिणें......" हा उतारा; किंवा 'आत्मपूजा' या निबंधांतले पुढील विचार माझ्या म्हणण्याची सार्थता पटवून द्यावयाला पुरेसे आहेत. "......मनुष्य निसर्गतःच आत्मपूजक आहे. मी सर्व जगाचा स्वामी, विश्वाच्या या विराट पसाऱ्याचें केंद्र तें मी, अशी त्याची जन्मजात समजूत आहे. पण पदोपदीं तूं कनिष्ठ आहेस, असें सगळी सृष्टी त्याला जाणवीत असते. त्यामुळें त्याचा दुखलेला अहंभाव आपल्याहून मोठ्या भासणाऱ्या आपल्या शक्तीच्या अपकर्षाला, अधःपाताला टपून बसलेला असतो. एखादें भलें मोठें झाड कोसळूं लागलें, सूर्याला ग्रहण लागूं लागलें, किंवा एखाद्या महात्म्यावर शिंतोडे उडूं लागले म्हणजे ती मौज पहावयाला लोकांच्या झुंडी लोटूं लागतात. आपल्याहून प्रबळ शक्तीचा पराजय माणसाला ज्या ज्या वेळीं पहाण्याचा योग लाभतो त्या त्या वेळीं त्याला एक प्रकारचा विजयसुखाचा आनंद होत असतो......".

सामाजिक अन्यायाविरुद्ध किंवा मानवी मनाच्या दुबळेपणाविरुद्ध उपरोधाचें किंवा उपहासाचें शस्त्र कांहीं निबंधांत श्री. बोरकर यांनीं चालविलेलें दिसतें. पण या प्रांतांत त्यांना तितकेंसें यश आलेलें नाहीं. रोमरोमीं ते कवि असल्यामुळें त्यांचें अंतःकरण अत्यंत हळवें आहे. उपरोधी विनोदाचें शस्त्र चालविण्याकरतां लागणारा बेछूटपणा किंवा निर्दय-

पणा त्यांच्या रक्तांतच नाहीं, असें मला वाटतें. याचा अर्थ त्यानां सामाजिक अन्यायाची मनापासून चीड येत नाहीं, असा मुळींच नव्हे. पण घाल घाव आणि कर दोन तुकडे, अशा तऱ्हेनें समाजाला धक्के देण्याची त्यांची जात्याच वृत्ती नाहीं. 'पोट आणि हृदय' या निबंधांत सामाजिक विषमतेविषयीं आपणाला वाटणारा उद्वेग त्यांनीं पुढील सुन्दर शब्दांत व्यक्त केला आहे. ते म्हणतात, "पोट आणि हृदय यांच्या या झगड्यांत पोट हृदयाला दोन कारणांनीं खात असतं. अर्धपोटी पोट भुकेसाठीं त्याला खातं तर फाजील भरल्यामुळें धापणारं पोट औषध म्हणून त्याला गिळंकृत करीत असतं. गरीब व श्रीमंत, जित व जेते, प्रबुद्ध व निर्बुद्ध या दोघांनांही हृदय नसावं, हें याचंच प्रत्यंतर नाहीं का? अशानंच माणुसकीला ओहोटी लागत आहे व मानवतेच्या कुशींतली तेजस्वी संभवनीयता जेथल्या तेथं विनाश पावत आहे."

श्री. **बोरकर** यानीं आपल्या या निबंधांना '**कागदी होड्या**' असें विनयानें नांव दिलें आहे. पण या चिमुकल्या होड्या एका कविमनानें निर्मिलेल्या आहेत हें विसरतां कामा नये. त्यांच्यापैकीं कित्येकांत चमकदार विचार आणि सुंदर कल्पना यांचें माणिकमोती भरलेलें असल्यामुळें रसिकांच्या मानससरोवरांत त्या दीर्घकाल तरंगत रहातील, अशी मला दृढ आशा आहे.

३-८-३८ — **अनंत काणेकर.**

# कागदी होड्या

५६९६

उन्हाळयाचे दिवस जसे वृद्धांना किंवा हिंवाळयाचे जसे तरुणांना तसेच बालगोपालांना पावसाचे दिवस भारी प्रिय असतात व तसे ते मलाहि होते. काळया निळया ढगांनीं आकाश व्याप्त झालं, वीज गमतीनं झिम्मा खेळूं लागली, तिचं पाऊल चुकलेलं पाहून तिचा लबाड भाऊ दडल्या ठिकाणाहून खदखदां हंसूं लागला म्हणजे आम्हां पोरांच्या आनंदाला घर अपुरं पडे. ‘ये ये पावसा, तुला देतों पैसा’ असं भोळया पावसाला आमिष दाखवायचं व बिचारा धांवत आला तरी खोटा पैसाहि न देतां त्याची फटफजिती करायची हा त्यावेळचा आमचा खेळ.

मुसळधार पावसामुळं तांबड्यालाल पाण्याचे पाट इकडून तिकडे धांवत सुटले म्हणजे आमच्या खेळकरपणाला अधिकच भरती येई. अंगणांत तर गुडघाभर पाण्याचं तळं सांचलेलं असायचं व लगेच आमच्या सफरीच्या तयारीला सुरवात व्हायची. जो तो कागदाच्या होड्या करण्यांत गुंतून जाई. वर्तमानपत्राचा ताजा अंक असला तरी त्याचे कपटे फाडून आम्ही आमची हौस भागवून घेत असूं. आमच्या या जगाच्या उलाढालींत वडीलमंडळीच्या जगाचे तुकडे होड्यांतून प्रवासाला जात. वर्तमानपत्रांतलं वाङ्मय हेंच पुष्कळशा प्रौढ लोकांचं जग नसतं का ? आपल्या या जगाची नासधूस केल्याबद्दल

श्रीमुखांत चार दोन खाव्या लागल्या तरी या आनंदापुढं त्याची क्षिति नसे. किरत्यासाठीं दिलेल्या चांगल्या पांढऱ्या शुभ्र हत्तीछाप कागदांची वासलात लावतांना आमच्या काव्यलोलुप मनांत उपयुक्ततावादाला थारा मिळत नसे. तें जग आतां हरपलं असलं तरी त्यावेळचा तो कागदी होडया सोडून देण्याचा हव्यास अजून सुटत नाहीं.

ह्या होड्यांना खरं म्हटलं तर इच्छित स्थल नसायचं, व त्यांत प्रवासीहि नसायाचे. पण त्यावेळच्या आमच्या मनाला ही उणीव जागवतच नसे मुळीं. आमचीं मनंच त्यांतून अज्ञाताचा प्रवास करीत व तोहि किति आनंदानं. बालजीवनाच्या त्या प्रवासांत होड्या तळाला गेल्या तरी आमचा आनंद कांहीं रसातळाला जात नसे. होड्यांच्या भंगुरतेची जाणीव प्रवासाच्या रम्यतेला मुळींच बाधा आणीत नसे. प्रत्येकाला आपली होडी सर्वांच्यापुढं असावी असं वाटत असलं तरी त्या स्पर्धेंत सोज्वळपणा व सारल्य कमालीचं होतं.


बालपण सरतं व त्याबरोबर भावनांचं हें जगहि ओसरतं म्हणूनच मोठेपणींचा आपला प्रवास दुःखाकष्टांचा होऊन बसतो. बालपणाच्या त्या निर्व्याज वृत्तीनं विचारांच्या किंवा जीवनाच्या होड्या कितीसेजण हाकारीत असतील ?

माझं पोरपण न गेल्याबद्दल मला सुज्ञ माणसं कितीहि हिणवोत मला तरी त्याचा अभिमानच वाटतो. या पोरपणामुळंच जाणतेपणाचीं दुःखं सुसह्य वाटतात व आपण मोकळ्या मनानं हसूं गाऊं शकतों.

आजहि आपल्या जगांत मुसळधार पाऊस नाचत आहे. त्यासरशीं माझं मन बागडलं नाहीं तरच आश्चर्य होतं. प्रत्येक घराच्या अंगणांत त्याचीं तळीं भरूं लागलीं आहेत. अशावेळीं माझ्या अंगणांत मी या कागदी होडया सोडीत बसलों तर तें वेडेपणाचं होईल

का? अशा वेळीं तुमचीं जीवंत मनं खात्रीनं माझ्या आनंदांत सहभागी होतील. जो तो आपापल्या कुवतीप्रमाणं त्यांतून अज्ञाताचा प्रवास करण्यांत रंगून जाईल. आपल्या या होड्यांचा फोलपणा किंवा भंगुरता कुणाला ठाऊक नाहीं? जीवनालाहि या वैगुण्यांचं लांछन आहे म्हणून सगळयांनीं आत्महत्या करायाच्या कीं अधिकच आनन्द करायाचा?

पाऊस संपला म्हणजे पाणी भुमींत जिरून जाईल व आपल्या कागदी होड्यांचा मागमूसहि दिसणार नाहीं कदाचित्. पण त्याबद्दल खेद करण्याला आपणाला अवसरच मिळणार नाहीं. कारण जिकडे तिकडे हिरवीगार सृष्टि आपणाला जीवनाचे खुले खेळ खेळण्यासाठीं आपल्या राजांगणांत बोलवीलच बोलवील.



# राशिभविष्यें

तसें पाहिलें तर माझा भविष्यावर मुळींच विश्वास नाहीं. एवढेंच नव्हे तर स्वतःला बुद्धिवादी ह्मणवण्यांत मला मोठा अभिमान वाटतो. असें असलें तरी विकत घेतलेल्या प्रत्येक वृत्तपत्रांतलें राशिभविष्य वाचल्याशिवाय मी राहत नसतों. मात्र केवळ भविष्यासाठीं वर्तमानपत्रांचे अंक विकत घेण्यापर्यंत माझी मजल गेलेली नाहीं. पण एकाद्यानें तेवढ्याचसाठीं अंक खरेदी केला तर मी त्याला मूर्ख ह्मणायाला तयार नाहीं. किंवा भविष्य छापून आपल्या पत्राचा खप वाढविणाऱ्या संपादकांना लुच्चे अथवा उचले मानायाला माझें मन घेत नाहीं.

आधीं भविष्य सोळा आणे सत्य उतरतें, या गोष्टीवर खुद्द सांगणाऱ्यांचाच विश्वास नसतो. एवढेंच नव्हे तर तें अर्धें खोटें व्हावें असा त्या शास्त्राला देवादिकांचा शाप असल्याचें, ते स्वमुखानें सांगतात. त्यांतल्या त्यांत वैयक्तिक कुंडलीवरुन किंवा हस्तरेषांवरून सांगितलेल्या भविष्यावर एकाद्यानें थोडासा भरवंसा ठेवला तर त्याला कांहीं अर्थ आहे व एवढा खुळेपणा करायाला जनता राजी असते, असें मानायाला मी एक वेळ कबूल होईन. पण सगळीं माणसें बारा राशींत विभागून केलेले मानवी नशिबांचें बारा नमुने लोकांना विश्वसनीय वाटतात असें मानून मींच काय तो शहाणा, असें समजण्याचें धाडस

करायाला मी तयार नाहीं. केवळ वय सांगून विकत घेतलेले तयार कपडे नव्वद टक्के निरुपयोगी असतात, हें न समजण्याइतकी साक्षर मनुष्यजात खात्रीनें मूर्ख नाहीं. आपली रास बिनचूकपणें अमूकच समजायाला तरी पुरावा हवा होता. व्यवहारांत पाहिलें तर, साहेबांपुढें पहिल्या क्षणाला मेष तर दुसऱ्या क्षणाला वृषभ, बायकोपुढें सिंह, तर शेजाऱ्याशीं वृश्चिक, अशा आपल्या राशी दिवसांतून कितीदां तरी पालटत असतात, आणि आपला हा प्रकृतिविशेष प्रत्येकाला कमीअधिक प्रमाणांत पटलेला असतो. तेव्हां वाचकवर्ग हीं भविष्यें खरीं मानतो व त्यामुळें त्याचें अपरिमित नुकसान होतें अशी ओरड करणारे निष्कारण आत्मवंचना करून घेत असतात असें मला वाटतें. समजा, एकाद्यानें तीं खरीं मानण्याचा मूर्खपणा केलाच, तर त्याला शहाणा व्हायाला फारसा उशीर लागत नाहीं.

या लोकांचें ह्मणणें असें कीं, भविष्यें असत्य, फसवीं व निरुपयोगी असतात, तेव्हां त्यांपायीं पैसा खर्च करणें हा शुद्ध गाढवपणा आहे. या शहाण्यांना मी असें विचारतों कीं, वृत्तपत्रांच्या इतर छापील पानांतून सत्य, सच्चेपणा किंवा उपयोगीपणा कितीसा वाया जात असतो?

खोट्या बातम्या, फसव्या जाहिराती, असंभाव्य माहिती, निरुपयोगी मजकूर, असल्याच गोष्टींनीं वृत्तपत्रांचीं बहुतेक पानें अडवलेलीं असतात. आणि हें माहित असूनहि तेवढ्याचसाठीं आपण तीं विकत घेत असतों. या आपल्या वृत्तीचें विडंबन अजून कांहीं माझ्या वाचनांत आलेलें नाहीं. वृत्तपत्रांतला महत्त्वाचा भाग म्हणजे अग्रलेख. पण अचूक तोच वाचायाचें आपण टाळतों. याचें कारण दु-

मुखलेल्या सत्यापेक्षां हंसतमुख असत्य मानवी मनाला जास्त प्रिय असतें हेंच होय. विद्वानाच्या घुमेपणाऐवजीं विदुषकाचा दिलखुलासपणा आपण खुषीनें पतकरीत नाहीं का? मग खोटया भविष्याच्या नादीं लागून थोडीशी करमणूक करून घेतली तर त्यांत बिघडलें कुठें? मला तरी भविष्य आपल्या खोटेपणामुळेंच इतकें मनोरंजक वाटतें. तें जर तंतोतंत बरोबर उतरलें असतें तर जगण्यांत कितीसें स्वारस्य शिल्लक राहिलें असतें? आयुष्यांतल्या अगणित अनपेक्षित घटनांनीं आपणांला पावलोपावलीं जे धक्के बसतात, त्यांचा आनंद आपण कायमचा गमावून बसलों नसतों का? ज्याच्या वांट्याला दुःखी जीवन आलेलें आहे, त्यानें तर तें निराशेनें अधिक दुःखमय केलें असतेंच! पण ज्याच्या नशिबीं भाग्याचे दिवस आहेत तोहि, सर्व कांहीं आधींच समजून चुकल्यामुळें, जीवनांतल्या उत्सुकतेला मुकला असता! जी स्थिति आपल्यासाठीं राखून ठेवण्यांत आली आहे, ती एक वेळ सुखाची आहे, असें आपणाला कळलें, तरी तिचें स्वरूप आजच्या आपल्या विशिष्ट मनोरचनेस रुचेलच कशावरून? आणि समजा, कीं तें आपणाला रुचलें नाहीं, तर ही स्थिति आपणाला बदलतां येत नाहीं, या जाणिवेनें आपण अधिकच असहाय व अगतिक होणार नाहीं का? फलज्योतिषाला शाप देणारी देवता मोठी दूरदर्शी असली पाहिजे. ज्योतिषाची अब्रू व आमचा आनंद या दोहोंचाहि विमा उतरण्याची तिची शक्कल नामी आहे कीं नाहीं?

प्रवासांत दगदगलों किंवा दैनिक व्यवहाराला कंटाळलों म्हणजे मी हीं भविष्यें हटकून चाळीत असतों. भविष्य म्हटलं कीं, त्यांत काहीं भाग आशादायक तर कांहीं निराशाजनक असावयाचाच. जीवनच जर सुखदुःखमय आहे तर भविष्य तेवढें द्विविध असल्याबद्दल मीं तक्रार कां करावी? बरें, भविष्य अर्धें खोटें ठरतें

तेव्हां निराशाजनक भाग खोटा आहे, असें मानायाला मला हरकत वाटत नाहीं. भाषेचा व विधानांचा लवचिकपणा हा या भविष्यांचा महनीय गुणविशेष असल्यामुळें, आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर तीं वाटेल तितकीं ताणतां येतात. त्यामुळें आपल्या भावी जीवना-विषयीं कितीतरी काव्यात्म चित्रपट आपणाला तिकीटाशिवाय पाहतां येतात. इतकें करूनहि रिकामा वेळ राहिलाच तर आपली रास दुसरी एकादी असती तर आपलें जीवन कसें झालें असतें, यावर अनेक रमणीय तर्क करतां येतात. कुणी सांगावें? आपली रास चुकलीहि असेल. आणि ज्या राशीला त्यांतल्यात्यांत चांगलें फळ आलें तीच कदाचित आपली खरी रास असेल, असें क्षणभर वाटूं लागतें. अशा रीतीनें माझा वेळ मोठ्या गमतींत जातो व साऱ्या शीणांचा मला विसर पडतो.

प्रत्येक मनुष्य फुरसतीच्या वेळीं आपल्या मनाच्या सतेज किंवा अंधुक रंगांनीं आपलें भावी जीवन चितारण्यांत निमग्न होऊं पाहातो, रिकाम्या वेळांत माणसानें असली कामगिरी केली तर तें काहीं वाईट नाहीं. एकाद्यानें निराशेचें काजळच जर आपल्या स्वप्नांना फासलें तर त्याला त्याची विकृत मनोवृत्ति जबाबदार आहे. मनुष्याला आपापल्या मनाप्रमाणें या सुखान्तिका किंवा शोकान्तिका निर्माण करण्यास ज्या फार थोड्या गोष्टींचा उपयोग होतो, त्यांत भविष्यांना बऱ्याच वरचें स्थान आहे. करमणुकीच्या कोणत्याहि साधनाचा दुरुपयोग करणें मनुष्याला असाध्य आहे असें नाहीं. कोणत्याच साधनाच्या बाबतींत तसा तो न करतां त्याला राहावलेलें नाहीं. मग भविष्यांवरच तेवढें खेंकसण्यांत काय अर्थ आहे?

सिनेमाला जाऊन डोळे बिघडतात, झोपेचें खोबरें होतें, भ-

लत्या भावनांची चाळवाचाळव होते, खर्च अव्वाच्या सव्वा होतो, म्हणून का कुणी सिनेमा बघायाचें सोडून दिलें आहे?

मग चार दिडक्यांत त्रासाशिवाय कितीतरी काल्पनिक चित्र-पट दाखवणाऱ्या भविष्यांवर लोकांच्या उड्या पडल्या तर त्याला तुमची आमची हरकत कां असावी ?

# आत्मपूजा

माझ्या एका लोकप्रिय लेखक मित्रावर एका टारगट वृत्तपत्रांत अत्यंत किळसवाणी अशी वैयक्तिक टीका आली होती. त्याच्या वाढत्या लोकप्रियतेला आळा घालण्यासाठीं जाणूनबुजून हा हल्ला चढविण्यांत आला होता व त्यासाठीं जातिद्वेष, कंपूबाजी वगैरे कितीतरी घाणेरडे आरोप प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें त्यावर करण्यांत आले होते. माझ्या मित्राच्या उदात्त वृत्तीची व सद्धेतूंची खात्री असल्यामुळें या टीकेनें माझ्या अंगाचा नुसता तिळपापड उडाला होता. मी तोंडाला येईल तें बोलूं लागलों.----

"बघितलंस गजाभाऊ, एकेकाला 'मोजूनि माराव्या पैजारा' असे आहेत हे लोक."

"अरे, हें असं चालायचंच. त्यांत एवढं मनाला लावून घेण्यासारखं काय आहे? समतेची आवड आहे झालं. तो परवांचा लघुनिबंध नाहीं वाटतं वाचला तूं?"

"समता नाहीं नी कांहीं नाहीं. डांबरटपणा आहे, दुसरं काय?" मी रागारागांतच खिडकींत जाऊन उभा राहिलों. रस्त्यांत

कांहीं पोरें खात गात खेळत होतीं. एक पांढरपेशा गृहस्थ घाईंत व मोरे ऐटींत चालला होता.

"कशी जिरवतों बघ!" एक पोरगा म्हणाला व मोठ्या शिताफीनें त्यानें त्या गृहस्थाच्या वाटेंत हातांतल्या केळयाची साल टाकून दिली. चार सेकंद गेले नाहींत तोंच तो महात्मा आपला सगळा ऐटबाजपणा विसरून लोटांगण घालण्याइतका विनम्र झाला.

तीं पोरें मनमुराद हंसलीं. आम्ही सुद्धां हंसल्याशिवाय राहूं शकलों नाहीं. वस्तुतः त्यांत हंसण्यासारखें काय होतें? ज्या गोष्टीबद्दल अनुकंपा वाटावी त्याबद्दल हंसण्याइतके आपण दुष्ट तर खास नव्हतों. तीं पोरेंसुद्धां दुष्ट म्हणतां येण्याइतकीं मोठीं नव्हतीं व आम्हां लोकांपैकीं त्यानें कोणाचेंहि कधीं चुकूनहि नुकसान केलें नव्हतें.

मनुष्य निसर्गतःच आत्मपूजक आहे. मी सर्व जगाचा स्वामी, विश्वाच्या या विराट् पसाऱ्याचें केंद्र तें मी, अशी त्याची जन्मजात समजूत आहे. पण पदोपदीं तूं कनिष्ठ आहेस असें सगळी सृष्टि त्याला जाणवीत असते. त्यामुळें त्याचा दुखलेला अहंभाव आपल्याहून मोठ्या भासणाऱ्या शक्तीच्या अपकर्षाला, अधःपाताला, टपून बसलेला असतो. एकादें भलें मोठें झाड कोसळूं लागलें, सूर्याला ग्रहण लागूं लागलें किंवा एकाद्या महात्म्यावर शितोडे उडूं लागले म्हणजे ती मौज पाहाण्यास लोकांच्या झुंडी लोटूं लागतात. आपल्याहून प्रबळ शक्तीचा पराजय माणसाला ज्या ज्या वेळीं पाहाण्याचा योग लाभतो त्या त्या वेळीं त्याला एक प्रकारचा विजयसुखाचा आनंद होत असतो.

## आत्मपूजा

एकाद्या कलावंताच्या, विचारवंताच्या किंवा वीराच्या विजयाचा प्रसंग असूं द्या. आपणाला तो एक 'प्रसंग'च वाटतो. वरपांगीं आपण त्याचें कौतुक, कधींकधीं स्तुतीहि करतों; पण मनाच्या अगदीं आंतल्या भागांत कांहींतरी खुपतें असेंच आपणाला वाटतें. तुम्ही मुद्दाम भरल्या मंडळींत एकाद्याची स्तुति करून पहा, लगेच त्यावर दुसरा म्हणेल, "असं काय आहे एवढं त्याच्यांत?" आणि या आपल्या म्हणण्याच्या पुष्टीसाठीं तो सगळी बुद्धि खर्ची घालील.

मला तरी याच्यांत विशेष गर्ह्य असें कांहीं वाटत नाहीं; कारण बोलून चालून मनुष्यस्वभाव आहे. या अहंभावांतच महत्त्वाकांक्षा दडून असते व तीच कर्तृत्वाची जननी असते; पण कांहीं दुबळ्या जीवांची महत्त्वाकांक्षा वांझोटी असते. आपल्या नालायकीची जाणीव होऊन चुकल्यामुळें सगळ्या जगावर कातावलेलीं हीं माणसें उत्कर्षाला जाणाऱ्या माणसावर आपलें गरळ ओकीत असतात. म्हणजे एका परीनें आपल्या टीकाविषयक व्यक्तींचींच तीं भक्त असतात.

भक्तांचा हा विचित्र मासला पाहून माझें मलाच हंसू आलें. 'विरोधी भक्ति' हा इतके दिवस न समजणारा शब्दप्रयोग मला समजूं लागला व माझ्या मित्राला त्या टीकाकाराची कींव करून मी अभिनंदनपर पत्र लिहिलें.

पत्र बंद करण्यापूर्वी जेव्हां तें मी वाचून पाहिलें त्यावेळीं त्या पत्राच्या सुरांत, मी फार मोठा मनुष्य आहें हें मी विसरूं शकलों नव्हतों, हें माझ्या ध्यानीं आलें.

# प ड दा

चौपाटीवरच्या त्या जनसंमर्दांत गजा, त्याचा तो रंगेल मित्र प्रभा व मी, रिकामपणची कामगिरी करीत चाललों होतों, संध्याकाळच्या "अ-वेळ"चें तें सौंदर्यनिरीक्षण व त्यावर चवचाल जिभेनें चालवलेली स्वच्छंद मीमांसा कोणत्या तरुण जीवाला अज्ञात आहेत? या वेळीं कल्पकता व वाचाशक्ति लाटांहूनहि जास्त चंचल व वाऱ्यापेक्षांहि जास्त उच्छृंखल होत नाहींत का?

अशा धुंदींत जात असतांना जवळून घाईघाईंत जाणाऱ्या एका पडदानशीन बाईकडे आमचें लक्ष गेलें. गजा तिच्या हातावरच्या रेषा हुडकीत होता, मी तिला घाईनें संकेतस्थळाकडे जाणारी उत्सुक दयिता समजून तिच्यावर काव्यकल्पना उधळीत होतों, तर प्रभा डोळयांत प्राण आणून तिचें सौंदर्यशोधन करूं पहात होता. त्याच्या मदतीला धांवून आल्याप्रमाणेंच जणुं काय चावट वाऱ्यानें चपळाईनें तिच्या तोंडावरचा पदर दूर केला. खडीसाखरेचा तुकडा म्हणून तोंडांत टाकावा व तो शेवटीं तुरटीचा ठरावा तसें आम्हाला झालें. वारा तर इतका ओशाळला कीं त्याला पळतां भुई थोडी झाली.

"राजा, यापुढें फार्मसिस्ट्री सोडून फिझियोग्नॉमी-रीडींग करायला शीक बरं का. इतके दिवस पडद्याच्या चालीविरुद्ध तावातावानें बोलत होतास, नाहीं का ? अमानुल्लाने तुझें शिष्यत्व पत्करल्यामुळे तुला वाटतें अफगाणिस्थानचे सगळे तरुण खवळले असावे व त्यामुळेंच बिचाऱ्यावर देशांतर करण्याचा प्रसंग आला असावा. मूर्खांना गप्प बसण्याची व कुरुपांना पडदा घेण्याची सक्ति केली तर काय बहार होइल?" प्रभा म्हणाला.

केवळ तिच्या त्या पडद्यामुळें आमच्या कल्पकतेनें किती सुंदर पुतळी निर्माण केली होती ? कित्येकदां मानवी मन, मौन सोन्याच्या मोलानें तोलतें तर झांकलेल्या मुठींत सव्वा लाखावें धन पहातें, ते हे असें. वस्तुतः तें सोने आपल्या मनांतलें असतें, पण ते लुटायचें असेल तर वास्तवतेचें सीमोल्लंघन करायला हवें. ज्यांना तें सुसाध्य नाहीं ते कोणता ना कोणता पडदा वास्तवतेवर टाकीत असतात. आपण व अज्ञात जग यांच्यांत असलेल्या झिरझिरीत अंतरपाटामुळेंच हिमाच्छादित सृष्टीप्रमाणें तें आपणाला रम्य वाटत नाहीं का ? आशेच्या पडद्यामुळें भविष्यकाल मनोरम वाटतो तर मायेच्या आवरणामुळें स्वजन प्रिय व आनंददायक वाटतात. नकट्या नाकाच्या विटोबाचें ध्यान तुकोबाला सुंदर वाटलें तें त्याच्या भक्तीच्या प्रसाधनामुळें. दगडांत देव आढळणें, हिडिंबा पद्मिनीसारखी दिसणें किंवा आपल्या ध्येयांत सर्वस्व सांपडणें यांत मला तरी आश्चर्यकारक असें कांहीं वाटत नाहीं. हे पडदे दूर झाले म्हणजे कालचे देव आज दगड वाटतात, आजच्या पद्मिनी उद्यां हिडिंबा दिसतात तर उद्यांचीं ध्येयें परवां वेडें ठरतात. सर्प एक कातडी टाकतो व दुसरी घेतो; त्या शिवाय त्याला जगतां येत नाहीं. आपणालाहि असेच पडदे हवे असतात. त्यामुळें आपण नित्य नूतन बनत असतों.

कात टाकलेला सर्प किती गोजिरवाणा दिसतो !

सुखानें जगायला असा कोणता ना कोणता पडदा पाहिजे. परमेश्वर जो मायेचा पडदा घेऊन राहिला आहे म्हणतात, तो सुद्धां मला वाटतें मानवतेला सुखी ठेवण्यासाठींच. कुणी सांगावें, खरा परमेश्वर कधीं काळीं सांपडलाच तर तो आपल्या मनोनिर्मित परमेश्वरापेक्षां कमीहि भरायचा !



# अलिखित चरित्रें
## व
# अनामिक महात्मे

"वाचलंस का तूं हें? वाचलं असलंस तर मी टाकतों वाचून या दिवसांत" टेबलावरचं पुस्तक हातांत घेऊन राजा म्हणाला.

"मी कांहीं वाचलं नाहीं अजून. चाळलं होतं वरवर. पण तुला न्यायाला हरकत नाहीं. मी वाचीन मग सावकाश."

त्या पुस्तकाच्या बाबतींतली माझी उदासीनता त्याला आश्चर्यकारक वाटली असावी. कारण तो माझा शाळासोबती होऊन गेल्यामुळें चरित्रें व आत्मचरित्रें मी केवढ्या हावरेपणानें वाचीत असें हे त्याला अज्ञात नव्हतें. त्यांतल्या त्यांत या पुस्तकाचा चरित्रनायक एक फार मोठा हिंदी पुढारी होता. व थोड्याच दिवसांत त्याचा इतका बोलबाला झाला कीं माझ्या एका मुंबईतल्या स्नेह्यानें माझी जुनी आवड माहित असल्यामुळें गेल्या पंधरा दिवसांमागें तें मला पाठवून दिलें होतें.

आपला मुलगा लोकोत्तर पुरुष व्हावा या उदात्त हेतूनें बाबा लहानपणीं मला चरित्रें व आत्मचरित्रें वाचावयाला देत. त्यावेळीं छापून येईल तें सोळा आणे सत्य अशा गोड समजुतीनें मीहि असीम श्रद्धेनें तीं वाचीत असें. माझ्या जीवनांतील लहानसहान प्रसंग, माझ्या इच्छा अपेक्षा, संकेत आणि समजुती, भावना व विचार मी त्यांच्याशीं पडताळून पहात असें. त्यावेळीं मी फार दुष्ट आहें, पापी आहें असें मानून घेण्याचे क्षणच मला जास्त येत. मी दुःखी होत असें. रात्रीच्या काळोखांत केवढातरी वेळ मी डोळे उघडे ठेऊन अंथरूणावर पडलेला असें व माझी उशी भिजून निघत असे.

आपण दिवसाला दहादां चुकतों पण हीं मोठीं माणसें सगळ्या आयुष्यांत एकदांहि कशीं चुकत नाहींत याचे राहून राहून मला आश्चर्य वाटे व आपण अगदींच सामान्य तर नाहीं? अशी शंका येऊन मन निराश व उदास होई.

पण पुढें सौजन्य म्हणजे मूर्खपणा व बाणेदारपणा म्हणजे उन्मत्तता असें समीकरण करणाऱ्या बाजारी जगानें मला जेव्हां शहाणपणाचे थोडेफार पाठ दिले तेव्हां त्या भ्रामक चरित्रांबद्दल मला विलक्षण तिटकारा वाटूं लागला. याचें कारण तीं असत्य असतात म्हणून नव्हे तर अर्धसत्य असतात यासाठीं. "अरेबियन नायट्स" असत्य असूनहि मनोरम नाहीं का? अर्धवट ज्ञान जसें अज्ञानाहून भयंकर असतें तसेंच अर्धवट सत्य असत्याहूनहि घातक असतें अशी माझी समजूत आहे. निबिड अंधःकारांत चालतां चालतां आपल्या दृष्टीची शक्ति व तिच्यावरील विश्वास तरी वाढतो; पण जर का मध्यें जळती चूड लपंडाव खेळू लागली तर आपण भांबावून जातों. या अर्धसत्य चरित्रांनीं श्रद्धाशील बालजीवांची अज्ञान जीवनाच्या

मुशाफरींत अशीच गत होत असते. त्यांच्यांतील प्राणवायु अशुद्ध राहिल्यामुळें बालमनांतल्या ज्योति प्रदीप्त होण्याऐवजीं विझल्या जातात याकडे कुणाचें लक्षहि जात नाहीं. सत्यानुवर्तन व व्यावहारिक यश यांच्यांतील विरोध लक्षांत येऊन सर्वसामान्य मनुष्यस्वभावाची थोडीफार ओळख मला झाली, त्यावेळीं तर या चरित्रांवरचा माझा विश्वास पार उडाला. पण, हे महापुरुष सगळं सत्य उघडपणें कां सांगत नाहींत या प्रश्नाचें उत्तर सांपडलें नाहीं.

आपल्या उज्ज्वल चारित्र्यानें माझ्या व त्याचप्रमाणें माझ्या अनेक स्नेह्यांच्या जीवनाला उजाळा आणणाऱ्या एका अनामिक महात्म्याला मी एकदां विचारलें "आपलं आंतरिक जीवनचरित्र आपण कां लिहित नाहीं?"

"ज्यावेळीं आपण लिहितों किंवा बोलतों त्यावेळीं सत्य लपवतों तर जेव्हां आपण करतों अथवा वागतों तेव्हां तें व्यक्त करतों असें नाहीं का तुला वाटत? चारित्र्य घडविणें म्हणजे चरित्र लिहिणें नाहीं कां?" तो म्हणाला.

गतानुगतिक जीवाचें सरपटणाऱ्या प्राण्याशीं साम्य कल्पिलें तर महापुरुषांची गगनविहारी गरुडांशीं तुलना करावी लागेल हें मी जाणतों. पण द्विजेंद्रालाही आपला देह जगविण्यासाठीं व श्रमलेल्या पंखांना हुषारी आणण्यासाठीं जमिनीवर उतरावें लागतेंच कीं नाहीं? दिवसांतले कांहीं क्षण त्यानें पार्थिव जगांत घालविले तर त्याच्या गगनविहारी या अभिधानाला बाध येतो का? मग या प्रवृत्तीला पाप कल्पून अशा क्षणाचा निर्देश करण्याचें या महापुरुषांनीं किंवा त्याच्या चरित्रकारांनीं कां टाळावें? सत्याऐवजीं लोकप्रियतेला मान

तुकविणाऱ्या या दीन समर्थांना थोर मानणाऱ्या बहुजनसमाजाची जशी मला कींव येते तसाच त्याचे अग्रणी म्हणून मिरवण्याच्या त्यांच्या खटाटोपाबद्दल अनादर वाटतो.

ज्या महापुरुषांना महत्त्वपालनासाठीं असत्याचा आश्रय करावा लागतो त्यांचीं चरित्रें प्रगतिप्रेरक होतील अशी आशा करणें वेडेपणाचें नाहीं का ? सत्य जीवन इतकें साधें व स्वाभाविक असतें कीं तें दूरीभाव निर्माण करूंच शकत नाहीं. पाश्चात्यांचीं चरित्रें आपल्याकडील चरित्रांपेक्षां जरा जास्त दिलखुलास व म्हणूनच जास्त सुंदर असतात. तरी सुद्धां वरील दोषांपासून तीं सर्वस्वी अलिप्त आहेत असें मी म्हणणार नाहीं कारण मानव समाज सत्यप्रिय व्हायला अजून अवकाश आहे.

माझ्या मतें अलिखित चरित्रेंच काय तीं सर्वस्वी सत्यपूर्ण आहेत. तींच जगाला प्रेरक होतात. चरित्रापेक्षां चारित्र्य जास्त कार्यक्षम व प्रभावी नाहीं का ? त्याची ओळख व आदेश आपल्या लहानमोठ्या परिघांतल्या व्यक्तींच्या व्यक्तीत्वांतून अनंत विकसन पावत असतात. म्हणूनच लिहिलेल्या चरित्रांपेक्षां अलिखित चरित्रें वाचण्यांत व नामवंत महापुरुषांपेक्षां अनामिक महात्म्यांची मानसपूजा करण्यांत मला जास्त आनंद वाटतो.

# भांडणारे आंधळे

झोपेचें औषध म्हणून तत्वज्ञानाच्या पुस्तकांचा उपयोग करणारीं पुष्कळ माणसें मी ओळखतों. मला मात्र तीं 'लाफिंग गॅस' सारखीं वाटतात. एकांताचा कडवटपणा घालविण्यासाठीं मी कधींकधीं त्यांचा सदुपयोग करीत असतों. अशावेळीं जगाच्या अंतिम सत्याबद्दल शिरा ताणून भांडणारे तत्वज्ञ माझ्या नजरेपुढें उभे राहातात व एका विचित्र प्रसंगाची आठवण होऊन मला हंसूं लोटतें. तो प्रसंग असा.

संध्याकाळ होती. मी घरांत तत्वज्ञानाचें पुस्तक वाचण्यांत गढून गेलों होतों. त्यांत लेखकानें प्रतिपक्षियाला चांगलेच फैलावर घेतलें होतें. मी बराच रमून गेलों होतों पण एकाएकीं विलक्षण आरडाओरड कानीं आल्यामुळें माझी एकतानता भंग पावली व पुस्तकांत बोटाची खण घालून मी धांवतच दारांत गेलों.

रस्त्यांत दोन आंधळे भिकारी एकमेकांना शिव्यांची लाखोली वहात हातांतील काठ्यांनी झोडपीत होते. इतके दिवस सलोख्यानें वागणाऱ्या या आंधळ्यांना आज असें मारामारीपर्यंत यायला झालें

तरी काय, हें समजून घ्यावें म्हणून मौज बघायला जमलेल्यांपैकीं एकाला मीं त्यांच्या भांडणाचें कारण विचारलें. तो हंसतच म्हणाला.

"अहो, सांगायचं काय? गुत्त्यांत आचमनें करून मोठ्या खुषींत हे बोलतबोलत येथपर्यंत आले आणि इतक्यांत क्षुल्लक कारणावरून यांची जुंपली. रस्त्याच्या लांबीरुंदीसंबंधीं म्हणे यांच्यांत दुमत झालें आणि त्याचा परिणाम हा असा झाला. शिवाय गंमत ही कीं हे दोघेही आंधळे होऊनच जन्माला आलेले आहेत."

त्याच्या या उत्तरानें मला एकदम हंसूं कोसळलें. त्यानंतर किती तरी दिवस तो प्रसंग आठवून मी माझ्याशींच वेड्यासारखा हंसत होतों. त्या दिवसापासून तत्वज्ञानाचें पुस्तक हातांत घेतलें व त्यांतील लेखकाचा भांडखोर अभिनिवेश पाहिला म्हणजे त्या हास्योत्पादक प्रसंगाची आठवण होऊन मला हंसूं येतें.

रस्त्याच्या लांबीरुंदीसंबंधींचीं त्या आंधळ्यांचीं मतें आणि विश्वाच्या विराट विस्तारावर टीचभर मानवी प्राण्यानें दिलेले निर्णयात्मक अभिप्राय यांत अधिक हास्यास्पद काय हें अजून मला ठरवितां येत नाहीं. त्या भिकाऱ्यांप्रमाणें आपण सगळेच या जगांत जन्मांध प्रवासी आहोंत. सर्व इंद्रियें असूनहि एका उच्चतर दृष्टीच्या अभावीं आपण आयुष्याच्या अनंत प्रवासांत स्वतःच्या सोयीसाठीं या तत्वज्ञानाच्या काठ्या घेऊन चालत असतों. आणि चालण्याची शक्ति जसजशी कमी होत जाते तसतसे काठीवर अधिकाधिक भार टाकीत आपण काळ कंठीत असतों. तिच्या अभावीं आपणाला जीवन भकास व असह्य वाटतें. तत्वज्ञानाच्या वैयर्थ्याऐवजीं त्याची आवश्यकताच मला पटायची आहे. या काठ्यांचा मागाहून येणाऱ्या

आंधळ्यांनाही उपयोग होऊं शकेल. नाहीं असें नाहीं. पण आपण एक महत्वाची गोष्ट विसरतां नये ती ही कीं सगळ्याच काठ्या सगळ्यांनां चालायच्या नाहींत किंवा एकाच जातीची काठी सगळ्यांच्या उपयोगीं पडायची नाहीं. जोंपर्यंत एक माणूस सर्वस्वी दुसऱ्यासारखा निपजत नाहीं तोंपर्यंत हें तत्वज्ञानाचें वैविध्य असेंच चालू राहणार आणि जुन्या तत्वज्ञानांवर नवीं माणसें आपल्या सोयीप्रमाणें नवे संस्कार घडवीत राहणार. तेव्हां तत्वज्ञानाचे असले हास्यास्पद लढे लढवून आयुष्य दुःखमय करणें मी मूर्खपणाचें समजतों. आपणच काय ते शहाणे अशा धुंदींत असल्यामुळेंच आपण एवढ्या मूर्खपणापर्यंत येऊन ठेपतों. त्या आंधळ्यांनीं दारू खाल्ली नसती तर कदाचित् असें मार खाऊन स्वतःचें हंसें करून घेतलें नसतें.

आपण सगळेच आंधळे आहोंत अशा समजुतीनें वागणारा मनुष्य मी फार शहाणा समजतों. ही जाणीव फार दुःखमय आहे खरी, पण तिचा विसर पाडून सुखी व्हायला चांगले खड्या सुरांत आपणाला रुचेल तें गाणें म्हणत राहावें मग तें जगाच्या दृष्टीनें अर्थशून्य असलें तर चालेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५६९५



# त्यागाचा मोबदला

पाणी अंगाला लागल्यामुळें आम्ही एकाएकीं जागे झालों व झटकन विजेचें बटन दाबलें. घरांत बोटभर पाणी आलें होतें. काय प्रकार आहे हें पाहण्यासाठीं आम्हीं दार उघडलें. घसकन् बाहेरचा लोंढा आंत घुसला. मुसळधार पाऊस सगळ्या मुंबईला बेदम झोडपीत होता. रात्र प्रलयाची वाटत होती व रस्त्यांतले दिवे भीतीनें हतप्रभ झाले होते.

काय करावें, कोठें जावें हा आमच्यापुढें तांतडीचा प्रश्न होता. आम्ही तिथे ग्रँटरोड स्टेशनजवळच्या एका घरांत तळमजल्यावर राहत होतों. घर जुन्यापैकीं होतें. तेव्हां तें केव्हां धीर सोडून बैठक मारील याचा नेम नव्हता. घरांत राहिलों तर स्थलसमाधि व बाहेर गेलों तर जलसमाधि असा प्रसंग होता. तात्पर्य, मरण अगदीं पांच पावलांत उभें होतें. शेवटीं हातपाय गाळून मरण्यापेक्षां ते हालवून तरतों तर पहावें असें आम्हीं ठरविलें.

आयुष्याची दोरी पांच मिनिटेंपर्यंत शाबूत राहिली तर हनुमान बिल्डिंग गांठावी व मग त्याच्या चिरंजीवित्वावर विसंबून राहावें

असा विचार करून आम्ही जिवाचा धडा करून बाहेर पडलों.

आम्ही रस्त्यावर आलों त्यावेळीं बेंबीपर्यंत झालेंच होतें पाणी. पाऊस वरून ओसंडत होता. लोंढा कुठें घेऊन जाईल याची कल्पना नव्हती. कांहींशा उन्मादानें तर कांहींशा भीतीनें आम्ही पावलें टाकीत होतों. तशा वेळींही मला मोठी गंमत वाटत होती. पहिल्या पावसाच्या वेळीं ज्या हर्षानें मुलें बेहोष होतात तोच हर्ष माझ्याहि अंगांत त्यावेळीं नाचला असावा. मला वाटलें प्रळयकालीं माणसें एकमेकांच्या गळयाला मिठ्या घालून रडण्याऐवजीं लहान मुलांप्रमाणें द्वैतभाव विसरून हर्षातिरेकानें नाचूं बागडूं लागतील !

"बाबा रे ! जरा जपून, गटार वगैरे उघडं असलं मध्येंच, तर नरकवास यायचा कपाळीं." एक सोबती म्हणाला. मी धाडसानें पुढें पुढें जात होतों व माझे दोघेही सोबती माझ्यामागून चालत होते. त्यावेळच्या अनुभवांत विलक्षण जादू होती. पाऊल उचलतांना साहसाचा आनंद तर बिनधोकपणें स्थिरावल्यावर यशाचें समाधान, अशी दुहेरी अनुभूति मी पावलोंपावलीं घेत होतों. त्या वेळेपुरता जीवावर उदार होऊन अज्ञाताचा, अशक्याचा प्रदेश तुडवण्याच्या माझ्या इर्षेमुळेंच तें सुख माझ्या वांट्याला आलें नव्हतें का ?

आम्ही सुरक्षितपणें इच्छित स्थळाला पोंचलों त्यावेळीं माझ्या सोबत्यांनीं माझें कौतुक केलें व त्याबरोबर मला आनंदहि झाला. पण खरें सांगायचें तर तें कौतुक स्वीकारण्याचा मला कांहींच अधिकार नव्हता. कारण त्यांचा मार्ग सुगम करण्यासाठीं कांहीं मी साहसाला प्रवृत्त झालों नव्हतों. मला एका अपूर्व व अननुभूत अशा

भावनेचा आस्वाद घ्यायचा होता. संधि चालून आली होती. तेव्हां तिचा फायदा घेण्यासाठीं मी माझ्या आवाक्यांत होतें त्याचें मोल दिलें. त्यामुळें माझ्या सोबत्यांच्या हिताला मी अप्रत्यक्षरीत्या कारण झालों असेन. त्याबद्दल त्यांनीं माझें अभिनंदन करावें हें त्यांच्या दृष्टीनें बरोबर असलें तरी माझ्या त्यागाचा मोबदला मला आगाऊच मिळून गेला होता.

आम्ही सुस्थळीं पोंचलों त्यावेळीं मी कसल्या तरी उदात्त भावनेनें फुलून गेलों होतों. जीवन आपण समजतों त्यापेक्षां किती तरी विशाल व थोर आहे असें त्यावेळीं मला वाटलें. अशा त्यागा-ला सिद्ध होण्याच्या संधि मला लहानपणापासून सारख्या येत गे-ल्या असत्या व त्याचा अस्वाद कसा घ्यावयाचा हें मला शिकवि-ण्यांत आलें असतें तर मी एव्हांना किती मोठा झालों असतों हा विचार त्यावेळीं मला सुचल्याशिवाय राहिला नाहीं.

त्यागाचा मोबदला त्यागांतच असतो. तो एक प्रकारचा दिव्य भोग आहे. तो स्वतःसाठीं करावयाचा असतो, दुसऱ्यासाठीं नव्हे ही गोष्ट वेळींच आमच्यावर बिंबविली जात नाहीं. त्यामुळें आपण एवढीशी गोष्ट केली तर फार मोठें शतकृत्य केलें अशी समजूत क-रून घेतों व त्याबद्दल सगळ्या जगानें ऋणी मनानें आपणावर अखं-ड पुष्पवृष्टि करीत रहावें अशी अपेक्षा करतों. जगानें तसें कांहीं केलें नाहीं म्हणजे डोक्यांत राख घालायची, त्याला रात्रंदिवस शिव्या हासडायच्या व आंतल्याआंत पिचत जाऊन स्वतःच्या जीविताचा विचका करून टाकायचा अशी आपली वृत्ति होऊन बसते.

लौकिक किंवा पुण्य यांच्या साधनासाठीं किंवा प्राप्त परिस्थि-

ति म्हणून त्याग करणारीं माणसें एकंदरींत गौणच. केवळ नियत कर्तव्य म्हणून पतीला अखेर शेजेवर सोबत करणाऱ्या सतीपेक्षां, ज्योतीचें स्पर्शसुख घेण्याच्या वेड्या आशेनें होरपळणारे पंतगवृति प्राणी मी निःसंशय श्रेष्ठ समजतों. भोग काय किंवा त्याग काय, जीवनानंदाचें माप आपल्या पदरीं टाकण्यासाठींच त्यांचा उपयोग. या कसोटीला ते उतरले नाहींत, माणुसकीला ते उजाळा आणूं शकले नाहींत तर ते माझ्या मतें सारखेच त्याज्य.

"माझा स्वार्थत्याग हा स्वार्थत्यागच नव्हे, मी केवळ विशाल जीवनाच्या प्रतीतीसाठीं राजकारणाच्या आखाड्यांत उतरलों" हे जवाहरलालजींचे उद्गार ज्यावेळीं मी वाचले त्यावेळीं माझा त्यांजविषयींचा आदर अनंतपटींनीं वाढला असेल. किती साधें, सुंदर व समर्थ तत्त्व आहे त्या उद्गारांत !

केवळ, विशाल जीवनाचा आस्वाद घेण्याच्या हव्यासानें प्राण पणाला लावणारे महाभाग आपल्या त्यागानें स्वतः पुढें जातात व जगाला पुढें नेतात. मग त्या त्यागाला निमित्त एकादी व्यक्ति असो किंवा तत्त्व असो. त्यांना मिळणारा आनंद एकच.

आपण चार भिंतींतल्या अंधाऱ्या जगांत घुटमळणारे दुबळे जीव त्या त्यागाचें मोल व्यावहारिक यशापयशावरून ठरविणार. आम्हांला त्याची कसली आली आहे कल्पना ?

तसें नसतें तर शंतनूच्या भोगलालसेचें चोज पुरवून महाभारताच्या अनर्थाला कारण झालेल्या भीष्माचें किंवा स्त्रैण पित्याच्या सत्वपालनासाठीं स्वखुषीनें वनवास पतकरणाऱ्या दाशरथी रामाचे गोडवे गाणारी जनता आठव्या एडवर्डाला खात्रीनें वेड्यांत काढती ना.

# भलीं माणसें

व

# भयंकर माणसें

कांहीं माणसें एवढीं अहंमन्य असतात कीं, आपल्या म्हण-ण्यास कुणी हरकत घेतलेलीहि त्यांना खपत नाहीं. त्यांतल्या त्यांत आक्षेपक वयानें लहान किंवा दर्जानें कमी असला तर त्यांच्या सात्विक (!) संतापाला सीमाच उरत नाहीं. मग त्याच्या बाजूला केवढंहि सत्य असलें तरी चालेल.

परवांच एका वयस्क व वजनदार गृहस्थाशीं बोलतांना या गोष्टीचा मला अनुभव आला. माझा आक्षेप जवळच्या मंडळीला न्यायाचा वाटल्यामुळें गृहस्थ मजकुरांना आंतल्या आंत चरफडत गप्प बसावें लागलें. पण मला करकचून चिमटा घ्यायची संधि ते पहात बसले होते.

वाऱ्याच्या झुळकीसारख्या असतात गप्पा. म्हणजे केव्हां कुठून कुठं जातील याचा नेम नसतो. बोलतां बोलतां माझ्या एका ले-

खक मित्राची गोष्ट निघाली. त्यावर रात्र महाशय म्हणाले.

—पोरगा फारच सालस. स्वभावानं इतका गरीब कीं, पुसतां सोय नाहीं. तुम्ही लागण्यासारखे चार दोन शब्द बोललांत तरी भल्या माणसाच्या तोंडून चकार शब्द उमटायचा नाहीं.

माझ्या मित्राची आपल्या दृष्टीनं अशा रीतीनं 'स्तुति' करून त्यांना मंडळीला माझ्याविषयीं सुचवायचं होतं. "नाहीं तर ह उद्दाम कारटा! वय, वजन यांची कांहीं दिक्कत?"

मला मात्र माझ्या मित्राची ती स्तुति वाटण्याऐवजीं निंदाच वाटली. शिरजोर माणसांनीं दुबळेपणाबद्दल दिलेलीं प्रशस्तिपत्रेंच तीं! माझ्या मित्राबद्दल चार चांगले शब्द सांगण्याऐवजीं स्वतःचें वजन वाढवून त्याचें कमी करण्याचा स्वार्थी हेतूच त्याच्या मुळाशीं होता. मऊ दिसलें म्हणजे कोपरांनीं खणावयालाहि लोक कसे तत्पर असतात व या जनस्वभावामुळें माझ्या मित्राच्या शालीन जीवाचा कसा कोंडमारा होतो हें मला चांगलें ठाऊक होतें. टोल्यास टोला या नियमाला अनुसरून लगेच खंवचटपणानें मीं त्या गृहस्थाला विचारलें.

"काय हो? गालफडांत दिली एक त्याच्या तर तो दुसरी पुढें करीत असेल तुमच्या नाहीं?"

माझ्या या अनपेक्षीत प्रश्नानें त्याला आरामखुर्चीवर ऐटीनें टाकलेला देह जमीनीवर आदळावा तसं झालं.

त्या प्रसंगानंतर माझी व त्या मित्राची जेव्हां गांठ पडली तेव्हां घडलेला सगळा प्रकार त्याला सांगून मी म्हणालों. 'पाहि-

लास तुझ्या सौजन्याचा अर्थ कसा होतो तो. तुझ्या या असल्या भलेपणानें दुष्टांचा दुष्टपणा मात्र वाढत जातो सारखा व त्याची झळ माझ्यासारखी इतरांनाहि लागते मग. अशानं तूं तुझं जिणं निष्कारण त्रासाचं करून घेशील.'

या गोष्टीला बरेच दिवस होऊन गेले. मी एका स्नेह्याकडे गेलों होतों चहाला. पहिल्या बैठकींतली बरीचशी मंडळी तिकडे हजर होती. इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलतां बोलतां तो स्नेही मला म्हणाला,

"कायरे ? तुझं आणि त्या गृहस्थाचं घडलंय तरी काय ? तुझ्यावर फारच संतापलेला दिसतो एकंदरींत! म्हणे काय तर तूं त्याच्या विरुद्ध चुगली केलीस तुझ्या मित्राशीं. त्याचं अगदीं ठाम मत झालं आहे तू भयंकर माणूस आहेस म्हणून."

"अस्सं... ?" सगळा प्रकार उमगून मी मनाशीं हंसलों

मागाहून मला समजलं कीं, त्या गृहस्थाला तसल्याच एका प्रसंगीं माझ्या मित्राकडूच चांगलाच अहेर मिळाला व सहनशील माणसाच्या शब्दाला केवढी धार असते हें कळून चुकलें.

माणसांच्या माना म्हणजे मोठेपणाचें शिखर गांठण्याच्या पायऱ्या होत असें मानणारे अहंमन्य लोक सगळी मानव जात दोन वर्गांत विभागीत असतातः भलीं माणसें व भयंकर माणसें. आपण दिसलों म्हणजे माना वांकवणारे ते 'भले' व तंगड्या मुरगाळू पाहणारे ते 'भयंकर.' कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचं सत्तेचं आसन बळकावून बसलेले लोक तें कायमचें स्थिर कर-

ण्यासाठीं आपल्या सुखसोयींप्रमाणें माणसांचे दोन वर्ग कल्पित असतात. या 'भल्या' लोकांना बगलेंत घेऊन धार्मिक किंवा राजकीय कायद्यांना प्रतिष्ठा आणायची व तद्वारां या 'भयंकर' माणसांचे अंडेंपिलूं धुळीला मिळवायचें असा त्यांचा कटाक्ष असतो. असं केल्याशिवाय त्यांची चलती व्हायची कशी? हीं 'भयंकर' माणसें म्हणजे त्यांच्या दृष्टीनें प्लेगाच्या उंदरासारखीं. त्यांचा पुरा नायनाट केल्याशिवाय त्यांना सुखाची झोंप मिळणें दुरापास्त असते.

त्या दिवसापासून तो गृहस्थ माझ्याविरुद्ध जो गांवभर बोलक्या जाहिराती काढूं लागला आहे, त्याचं तरी कारण हेंच नाहीं का?

उद्यां हें माझें म्हणणें प्रसिद्ध झालेलें त्याला दिसलें तर तो आपल्या 'भल्या' माणसांच्या प्रभावळीला उद्देशून म्हणेल,

—बरोबर कीं नाहीं मी त्या माथेफिरूबद्दल म्हणतों तें ?

आणि त्यावर ती उत्तर करील.

— होय हो ! खरंच किती भयंकर माणूस ?

ट्रॉट्स्कीला जी जगांत जागा नाहींशी झाली आहे ती कशासाठीं ? सगळं जग अगदीं एकमुखानं नाहीं का म्हणत त्याबद्दल "मोठा भयंकर माणूस ?"

# मनाचे चोर

गजा, प्रभा व मी नित्यक्रमाप्रमाणें समुद्रकांठीं फिरायाला चाललों होतों. वाटेंत कुणालासें प्रभाशीं खासगी बोलायचें असल्या-मुळें आम्हीं दोघे काहीं अंतरावर जाऊन सर्व जगावर तोंडसुख घेत राहिलों.

इतक्यांत आमच्यापुढून एक व्हिक्टोरिया वळसा घेऊन जाऊं लागली. तिचा वरचा भाग मागें घेतल्यामुळें तिच्यांतील तें अद्या-वत् परिवेष करून ऐटींत बसलेलें सुंदर तरुण जोडपें त्या मावळत्या उन्हांत आम्हांला फारच मोहक वाटलें. चटकन गजा म्हणाला.

"गंमत आहे लेकाची. नशिबाचा शिकंदर खरा. नाहींतर आपण चाललों आहोंत तंगड्या तोडीत!"

—त्यांत काय आलं आहे एवढं? रुपया तर खिशांत आहे. बसल्या बसल्या तास भर घोडदौड करायला हरकत नाहीं. एकदां-ची तुझी रड तरी आटपूं दे.

—काय अकलेचा कांदा आहेस रे? तुला घेऊन बसल्यानं का

मला तसलं सुख मिळणार आहे ?

—बदमाष!--मी ओरडलों--तुला तसलं सुख नको आहे. तर त्या गृहस्थाच्या जागीं बसायचं आहे. सरळसरळ सांगायचं तर दुसऱ्यांच्या सुंदर सुंदर बायका घेऊन तुला फिरायचं आहे.

— साध्या गोष्टीला काय भयंकर स्वरूप दिलंस रे तूं ? तो काहींसा चपापून म्हणाला.

माझें विधान अतिशयोक्तिपूर्ण असलें तरी त्यांत पुष्कळच सत्य आहे. गजानें खरोखरच स्वतःच्या बायकोला घेऊन अगदीं त्या गृहस्थासारखाच व्हिक्टोरियानें प्रवास केला असता तर त्याला त्याच्या कल्पनेनें चितारलेलें सुख मिळालें असतें का ? तेवढें कशाला ? ती तरुणी जर काळीकिंद्ळी असती तर गजाला शहरभरच काय आयुष्यभरहि एकाकी प्रवासच नसता का परवडला ?

तसें पाहिलें तर आपण सगळे मनाचे अट्टल चोर आहोंत. प्रत्यक्षांत न मिळालेलीं सगळीं सुखें आपण मनानें रात्रंदिवस चोरीत असतों. आणि चोरानें जगांत साव म्हणून मिरवण्यासाठीं कोणताच पुरावा राहूं न देण्याची शिकस्त करावी त्याप्रमाणें आपणही अशा वेळीं चेहऱ्यावर साळसूदपणाचा भाव राखण्याची पराकाष्ठा करीत असतों. ज्या ज्या वेळीं मी मूर्तामूर्त वस्तुमात्राच्या सौंदर्याचा उपभोग घेत असतों त्या त्या वेळीं स्वभावतः ही सगळी धनदौलत आपलीच आहे असें जणूं काय मी गृहित धरीत असतों. निदान ती दुसऱ्याच्या मालकीची वस्तु आहे या गोष्टीचा तरी मला तात्पुरता विसर पडलेला असतो. आपल्या जागेपणाच्या स्वप्नांची आपण शांतपणें छाननी केली तर दुसऱ्याच्या कनक, कांता, कीर्ति वगैरेचें

आपण अव्याहत अपहरण चालविलें आहे असें आपणाला दिसून येईल. आपण कोर्टांत गेलों तर आपणाला न्यायाधिशाच्या खुर्चीवर बसल्याचा भास होतो. सभागृहांत गेलों तर टाळयांचा गजर आपल्यासाठींच आहे, किंबहुना वक्त्याच्या रूपानें तो आपणच स्वीकारीत आहोंत असें वाटतें. पेशवाई नाचाला गेलों तर कंचनीचा शृंगारीक अभिनय आपणाला उद्देशूनच आहे असें मानण्याकडे कल होतो. रेस कोर्सवर गेलों तर पहिला आलेला घोडा आपलाच आहे अशा समजुतीनें क्षणभर आपण हुरळून जातों. आपल्या मित्राचा नवा हॅरॉल्ड लॉयड् चष्मा डोळयांला लावून पहाण्याचा मोह किती जणांला होत नाहीं ? अनोळखी गृहस्थाच्या खिशाचें कॉंक्लिन फाउण्टन पेन मनांतल्या मनांत स्वतःच्या खिशाला लावून आपण पहातोंच कीं नाहीं ? एकाद्या स्नेह्याकडे चहाला गेलों तर त्याच्या दिवाणखान्यांतील चित्रें किंवा पुस्तकें त्याच्या घरांत निष्कारण जागा अडवतात असें मानण्याची किती जणांना प्रवृत्ति होत नसेल ? तात्पर्य, असें हें आपण चोरून सुख घेत असतों तिन्ही त्रिकाळ.

लहानपणीं माझी आजी मला कितीतरी नवलकथा सांगत असे. त्यांतील राजांना हटकून एकुलती एक कन्या असायची. राजानें तपाला जायचें. इकडे कन्या अनुरूप वराच्या अभावीं वाढून राणीच्या गळयाला लागायची. आणि राजा तप करून परतला म्हणजे तिनें राजाला लग्नाची घाई करायची. सकाळीं पहिल्यांदां दिसेल त्या पोराला जांवई करायचें राजानें तडकाफडकीं ठरवून टाकायचें व हें भाग्य शेवटीं समिधा गोळा करायला गेलेल्या गरीब भटाच्या पोराला लाभायचें. अशावेळीं मी अभावितपणे स्वतःकडे त्या पोराची भूमिका घेत असें व रात्रीं बिछान्यावर पडल्यावर, राज्य कसें चालवायचें, एवढ्या संपत्तीचा विनियोग कसा करायचा, इत्यादि

विचारांत गढून जात असें. त्यावेळच्या आठवणींनीं माझें मलाच हंसूं येतें पण अजून सुद्धां कादंबरी वाचतांना नकळतच मी प्रत्येक पात्राच्या उदात्त सुखदुःखाचें अपहरण करीत असतों. कालाबरोबरच अपहरणाचे पदार्थ तेवढे बदलतात एवढेंच. पण हें सुख फार काल टिकत नाहीं. आपल्या कल्पनेचें पांखरूं विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊं लागलें म्हणजे त्याच्या पायाला असलेला दोर विवेकशक्तीकडून खेंचला जातो. त्यासरशी आपणाला कळ येते व उदास वाटतें. ती म्हणते "बाबा रे ! ती दुसऱ्याची वस्तु आहे. ती तुला मिळायची नाहीं. आणि तिच्या नादीं लागलास तर तुला हातचें गमावून बसावें लागेल".

विवेकशक्तीचा हा इशारा लक्षांत घेऊन वागणारीं जीं माणसें असतील त्यांनीं माझ्या मतें काल्पनिक अपहरण खुशाल करावें. दुसऱ्याची धनदौलत किंवा कांताकीर्ति क्षणभर आपली मानून सुख घेतलें तर त्याबद्दल स्वतःला पापी समजायचें कांहींही कारण नाहीं. उलट मी असें म्हणतों कीं यांतच मनुष्याच्या सुप्त कर्तृत्वशक्तीला प्रेरणा आहे. आपण सगळेच थोड्याफार प्रमाणानें मनाचे चोर आहोंत. मनांत चोरी करून जर छत्रपति होतां येतें तर त्यांत बिघडलें कुठें? दुसऱ्याचें सुख हिरावून न घेतां सुखी होण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र स्त्रीपुरुषमिश्र समाजांत वावरतांना मनांतील या चोरीचा मागमूस तोंडावर लागूं न देण्याची सावधगिरी घेणें अगत्याचें असतें. कारण कधींकधीं एकाचीं दोन तोंडेंही होण्याचा संभव असतो या अनुदार जगांत !

१०८८५

# लेखकांचे तीन वर्ग

जातांना किती उमेदीनें गेलों होतों मी त्या लेखकाच्या भेटीला! त्याच्या व्यक्तिमत्तेवर किती महनीय व तेजस्वी गुणांचा आरोप केला होता माझ्या कल्पनेनें? आणि केवढ्या स्फूर्तीची अपेक्षा केली होती मी त्याच्याकडून! पण चार घटकांच्या सहवासानंतर मला काळीजच पायाशीं पडल्यासारखें झालें. त्या गृहस्थाची भेट घेतली नसती तर एक वेळ बरें झालें असतें, असें वाटलें. पूर्वींसारखीं त्याचीं पुस्तकें वेधक वाटतील कीं नाहीं याचीहि शंका आली. गजानें ज्यावेळीं माझें त्याच्याविषयींचें मत विचारलें त्यावेळीं विषण्ण होऊन मी म्हणालों,

"गृहस्थ आपल्या पुस्तकांहून अगदींच लहान आहे."

"म्हणजे? लेखक आपल्या पुस्तकांहून लहान मोठे असतात वाटतं! तुझं एकेक ऐकावं तें विक्षिप्तच," गजा म्हणाला.

गजाच्या म्हणण्याप्रमाणें विक्षिप्तहि असेल माझें मत. पण मला खरोखर वाटतें कीं, लेखकांचे तीन वर्ग असतात. काहीं आप-

त्या पुस्तकांहून लहान असतात. कांहीं त्यांच्या समान असतात तर कांहीं त्यांच्याहून कितीतरी पटीनें मोठे असतात. या तीन वर्गांचीं जीं प्रातिनिधिक कल्पनाचित्रें माझ्या दृष्टीपुढें उभीं राहतात, तीं विचित्र असलीं तरी अन्वर्थक वाटतात.

पहिल्या वर्गाचा लेखक आपलीं पुस्तकें डोक्यावर घेऊन त्यांच्या भाराखालीं वांकलेला दिसतो, दुसरा तीं कौतुकानें चाळीत असतांना दिसतो, तर तिसरा त्यांच्या चौथऱ्यावर उभा राहून जगाकडे पाहत असतांना दिसतो.

या त्यांच्या निरनिराळ्या पवित्र्यांतून मी त्यांची आंतरिक पायरी व रूपरेषा सहज पाहूं शकतों. पहिल्याची मला कींव येते, दुसऱ्याबद्दल आपुलकी वाटते व तिसऱ्याबद्दल आदरानें मस्तक विनम्र होतें. पुष्कळदां वाङ्मयगुणांच्या या लेखकांचा ग्रंथसंभार सारखाच असूनहि केवळ त्यांनीं स्वीकारलेल्या भिन्न भिन्न भूमिकांमुळें आपल्या त्यांजविषयींच्या भावनेंत असा हा फरक पडतो. पुस्तकें डोक्यावर घेतल्यामुळें एक हास्यास्पद किंवा अनुकंपनीय वाटतो. दुसरा तीं जवळ घेऊन बसल्यामुळें आपला सहाध्यायी वाटतो तर तिसरा त्यानें बैठकीसारखा त्यांचा उपयोग केल्यामुळें थोर व आदरणीय भासतो. हें असें होणें मला वाटतें स्वाभाविक व योग्यच आहे. कारण प्रत्येकाच्या बैठकीवरून आपण त्याच्या भवितव्याचा कयास चटकन बांधूं शकतों व त्यांतूनच आपल्या त्यांजविषयींच्या भावना उद्भूत होतात. पहिल्याची परागति, दुसऱ्याची स्थिरगति, तर तिसऱ्याची प्रगति यांचेच ते पवित्रे द्योतक नाहींत का ? पहिल्याचें क्षितिज दिवसेंदिवस मिटत जावें, दुसऱ्याचें मर्यादित रहावें व तिसऱ्याचें सारखें फुलत जावें हें त्यांनीं स्वीकारलेल्या

भूमिकांस धरूनच नाहीं का ?

मात्र त्यांनीं आपापल्यापरी स्वीकारलेली ही अभिमुखता ( attitude ) अकारण नाहीं. तो स्वभावधर्म आहे, सोंग नव्हे. आणि ती प्रत्येकाच्या सामर्थ्याची [ Potentiality ] निदर्शक असते. प्रत्येक मनुष्यांत मला वाटतें दोन परस्पर विरोधी व्यक्ति वावरत असतात. एक मानव व दुसरा अतिमानव. सामान्य मनुष्यांत या दोघांना स्वतंत्र व निश्चित रंगरूप आलेलें नसतें, पण कलावंतांत त्यांना तें आलेलें असतें. त्यांच्यांत रात्रंदिवस लढा चाललेला असतो. ज्यावेळीं अतिमानवापेक्षां मानव प्रबळ ठरतो त्यावेळीं पहिल्या प्रतीचे लेखक किंवा कलावंत निर्माण होतात. ज्यावेळीं ते दोघे तुल्यबळ ठरतात व एकमेकांशीं तडजोड करतात त्यावेळीं दुसऱ्या प्रकारचे कलावंत अस्तित्वांत येतात, आणि ज्यावेळीं अतिमानव यशस्वी ठरून मानवाला आपला सेवक बनवतो त्यावेळीं अनन्यसामान्य असे प्रतिभाशाली कलावंत अवतरत असतात.

म्हणून पहिल्यांच्या प्रतिभेचें बारसें व बारावें यांत फारसा अवधि गेलेला दिसत नाहीं. दुसरे स्वतःच्याच कृतीच्या सफाईदार व सुधारलेल्या नकला काढण्यांत गुंग असतात तर तिसरे यशाचें अत्युच्च शिखर गांठलें तरी More light! More light! असा अहर्निश जप करीत असतात.

मानवतेचे मूल रंग तिघांकडेहि असतात. पण पहिला भडक रंग फांसून जगाचें लक्ष आपल्याकडे वेधून घेऊं पाहतो; दुसरा रंगाचें वैचित्र्य व विविधता दाखवून त्याला स्तिमित करण्याच्या विचारांत असतो तर तिसरा आपल्या जीवनाला रूप देण्यासाठीं

रंगाचा उपयोग करुन घेतो. आपली परिणती करून घेण्यासाठीं तो लिहितो. विश्वभर विस्तारलेल्या आपल्या मनाला तो वाचा फोडतो आणि म्हणूनच त्याची कलाकृति मानवतेवर दिवसा सूर्यासारखी जीवनवर्षाव करते तर अंधाऱ्या रात्रीं तिला विजेप्रमाणें 'वैऱ्याची रात आहे, जागा रहा' असा इषारा देते. ती आपणांला सांगते कीं, जीवन केवळ मधुरच नाहीं तर विशालहि आहे.

# गोल्ड फ्लेक

माझी बायको व इंग्लंडची विल्स कंपनी यांचें वैर आज स-हा वर्षं सतत चालू आहे. बोलून चालून हितसंबंधांचा झगडा आहे तो. आणि जगांतील वर्गकलहामुळें ज्याप्रमाणें जागतिक शांति धोक्यांत आहे, त्याप्रमाणंच यांच्या या कलहामुळं घरांतील शांतीवर गंडांतर येऊं पहात आहे.

या झगड्यांत बायकोची बाजू न्यायाची असण्याचं मला मान्य असूनहि माझा कल अजून कंपनीच्याच बाजूनें आहे. माझ्या या पक्षपाती वृत्तींची कारणमीमांसा लिंगशास्त्रज्ञ कशीहि करोत. तसलं काळं बेरं कांहीं सुद्धां माझ्या मनांत नाहीं.

मी गोल्डफ्लेक सोडायाला कां कबूल नाहीं याचीं कारणं ऐकून घ्यायला बायको तयार नसल्यामुळं, तिच्या नजरेखालून हा लेख जाऊन माझ्या मागची तिची कटकट एकदांची मिटावी किंवा मराठी जगांत आपली फुकट जाहिरात केल्याबद्दल कंपनीनें आयुष्यभर मला फुकट सिगारेटस् पुरवाव्या ( आणि तशी सोय तिनं केली तर आयुष्य भरायला कितीसा अवकाश !) असा स्वार्थी हेतु याच्या मुळाशीं नाहीं हें गैरसमजास जागा राहूं न देण्यासाठीं सांगणं अवश्य आहे.

आपला हेतु साधत नाहीं म्हणून बायको, तर साधून चुकला आहे म्हणून कंपनी, दोघीहिं हा लेख वाचला तरी न वाचल्याचाच बहाणा करणार हें मला पक्कं माहित आहे. असं असूनहि मी हा लेख लिहित आहें याचं कारण मला सिगारेटच्या कृपेनं मिळालेलं विचारधन कांही अंशांनीं तरी तिचं तिला अर्पण करायचं आहे.

तिच्या दुष्परिणामांचा पाढा दिवसांतून एकदां तरी ऐकावा लागल्यामुळें मला आतां चांगलाच पाठ झाला आहे. त्यांत तथ्यांश असला तरी सर्वसामान्य सिगारेटच्या मोलानं गोल्डफ्लेकचीहि किंमत करणं न्यायाचं होणार नाहीं. तिच्या पाकिटांत कुपन असतं ही एकच गोष्ट या विधानाची सत्यता सहज पटवूं शकेल. इतर सिगारेटस् या फर्शी पाडणाऱ्या 'फटाकड्या' असल्या तर गोल्डफ्लेक ही हृदयंगम सात्विक 'फुलराणी' आहे.

शास्त्रीय दृष्टीनं विचार केला तर तंबाखू हा कशाहि वेषांत शरीरांत गेला तरी तो आपला पराक्रम गाजवणारच. आमच्या सौभाग्यवतींना तो म्लेंछ वेषांत घरांत आलेला खपत नाहीं पण तोच तपकीर आणि विडा या सनातन दांपत्याच्या वेषांत नाकातोंडांत घुसला तर चालतो. स्त्रिया वाटेल त्या उपायांनीं संस्कृतिरक्षण करूं शकतात त्या या अशा! हे दोनहि प्रकार मला आवडत नाहींत याचें कारण त्यांत काव्याचा थोडासुद्धां अंश नाहीं.

माझ्या देशभक्त मित्रांनीं मजजवळ विडीची शिफारस करून पाहिली, तिच्यामुळं दरसाल किती रुपयांची बचत होणं शक्य आहे हें सप्रमाण दाखवून दिलं. एकानं तर 'विडीवाली' ही वरेरकरांची परिणामकारक लघुकथा मला सन्मार्गाला लावूं शकेल या अपेक्षेनं

वाचायलाहि दिली; पण माझा नित्यक्रम कांहीं बदलत नाहीं. या बाबतींत अंतरींचं वर्म असं आहे की, गोल्डफ्लेक महाग असल्या-मुळें संवयीला जो स्वाभाविकपणें संयम बसतो तो उडून जाणार हें मला पुरं ठाऊक आहे. पण ही गोम सांगितली तर "पेलॅमॅनिझ-म"चा पुरस्कार करणारा दुसरा स्नेही भेटायचा.

मी चिरूट आणि पायप ओढून पाहिले आहेत पण त्यांच्या-कडे अजून माझं मन ओढा घेत नाहीं. वयातीत माणसाच्या उपदे-शासारखे मला ते कडक लागतात आणि ते ओढतांना पुढचीं पंचवी-स वर्षें एकाएकीं अदृश्य होऊन आपण पन्नाशींत पोंचल्याचा भास होतो. आणखी कांहीं वर्षें मला तरुण राह्यचं असल्यानं व वार्धक्या-ची गोडी पुढं केव्हां तरी मला हवी असल्यानं मी चिरूट व पायप पुढील वयासाठीं राखून ठेवले आहेत.

सिगारेट, चिरूट व पायप या सर्वांना स्वतःचं असं विशिष्ट वय असतं. आणि समवयस्क व्यक्तीच्या सहवासांतच त्याचं खरं सौंदर्य पूर्णांशांनीं प्रकट होतं. दिवाळीची भेट म्हणून या वस्तु मा-झ्या आवडत्या व्यक्तींना पाठवायच्या झाल्या तर सिगारेट जवाहर-लालांना, चिरूट प्रो. राधाकृष्णांना तर पायप गुरुदेव टागोरांनाच मी पाठवीन. या वस्तूंचें स्वागत ते कसं काय करतील हे मी सांगूं श-कत नाहीं पण केवळ या कल्पनेनं जीं तीन चित्रं माझ्या मनःचक्षुं-पुढं उभीं राहतात तीं मला निःसंशय मनोरम वाटतात.

तेव्हां आजच्या माझ्या वयाला सिगारेटच योग्य असं मी ठरवून टाकलं आहे. आज जवळ जवळ अर्धं तप नियमित व अनि-यमितपणं मी ती ओढीत आहें. नियमितपणं म्हणजे दररोज न

चुकतां व अनियमितपणें म्हणजे अमुक वेळ व तमुक संख्या असं कांहीं बंधन नाहीं. मात्र मी अजून कर्मठ अग्निहोत्री झालेलों नाहीं. खरं म्हटलं तर सिगारेटचं पहिलं चुंबन मी मिसरूड व मत फुटण्या-पूर्वीच घेतलं होतं. वेळ रात्रीची, जागा दिवाणखान्यांतील कपाटा-जवळचा कोंपरा, आसपास भीषण अंधार व शांति अशा परिसरांत मी हा अपूर्व प्रयोग करून पाहिला. चुलत्यांच्या सिगारेटचं थोटूक मी मोठ्या शिताफीनं लांबवलं होतं. त्या रात्रीची ती अनुभूति कां-हीं विलक्षण होती. रॉबिनसन क्रूसोलासुद्धां आपली नाव तयार झाल्यावर इतका आनंद झाला नसेल. पण ती गोडी सिगारेटची न-सून बंधनापलीकडील प्रवासाची होती हें हल्लीं कुठं माझ्या लक्षांत आलें. कांहीं दिवस मी ती केवळ गमतीसाठीं, फॅशन म्हणून ओढून (नव्हे फुंकून) पाहिली. पण त्या वेळचा आनंदसुद्धां असाच निराळा; म्हणजे समुदायप्रवृत्तीच्या पूर्ततेतून आलेला होता. फक्त गेल्या आ-ठवड्यांतच काय तो तिचा खरा आस्वाद मी पहिल्यांदा घेऊं शकलों.

दुपारची वेळ होती. जेवण करून मी गोल्डफ्लेकचे झुरके घेत आरामखुर्चीवर पडलों होतों. कोणतंच नवं पुस्तक हाताशीं नव्हतं, गप्पा छाटायाला कुणी स्नेहीहि जवळ नव्हता व सौभाग्यवतीच्या तोंडाला पानावर काम होतं. नव्यानंच बिऱ्हाड थाटलेलं तेव्हां मला अधिकारवाणीनं जाब विचारणारं कोणीहि नव्हतं. एवढं स्वातंत्र्य व सिगारेट ! मी तिचा यथास्थित आस्वाद घेतला. एक मोठं रहस्य मला उमगलं.

सिगारेटची खरी लज्जत अनुभवायला आपण अगदीं एकटं अ-सलं पाहिजे. टेबलावर एकादं पुस्तक पडलेलं असलं किंवा एकादा स्नेही जवळच वाचनांत चूर असला किंवा पत्नी लगबगीनें जवळून

निघून गेली तर चालेल. मात्र आसमंत शांत पाहिजे. जेवण झालं असलं पाहिजे व डोक्याच्या कवटींत, आपल्या तोंडांतून सुटणाऱ्या धुम्रवलयांइतकीच अनिश्चित, तरल व उर्ध्वगामी अशी विचारसृष्टि घोटाळत असली आहिजे. अकारण बेछूट विचार करण्याची कला ज्यांना साधली आहे त्यांनीं तर अवश्य सिगारेट ओढून पहावी. एकांत, विचार व प्रकाश या तीन गोष्टी अवश्य आहेत. अशा प्रसंगीं आपणाला तीं निळीं वलयें हळुहळू वरवर जात अदृश्य होतांना पहातां आलीं पाहिजेत. त्यांच्या रेषा वांकड्या असल्या तरी लक्ष्मणाने सीतेला घालून दिलेल्या रेषांहूनहि त्या प्रभावी असतात. त्यांमुळें आपल्या अमूर्त विचारसृष्टीला भोंवतालचें जग विटाळूं शकत नाहीं. दैनिक जीवनांतील क्षुल्लक गोष्टींचं स्वामित्व, थोडाच वेळ कां होईना, आपल्यावर चालेनासं होतं आणि मुंग्यांच्या सहस्रदंशांतून सुटलेल्या जिवारी सारखा आपण दुर्लभ स्वातंत्र्याचा उपभोग घेऊं शकतों.

त्यावेळीं सकाळींच चाळलेला शुक्रवारचा "टाइम्स"चा ताजा अंक जवळच्या गोलमेजावर पडलेला मला दिसत होता. माझ्या मनःचक्षूंसमोर साहित्यसमाचाराचं पृष्ठ भल्यामोठ्या आकारांत उभं राहिलं. "शांतीचा मार्ग" या पुस्तकाचा कर्ता रसेल हातांत पायप घेऊन उभा होता व एका कोपऱ्यांत चेस्टरटनचा पिपाएवढाला अगडबंब देह स्वतःच्या आत्मचरित्रावर निराळाच प्रकाश पाडण्यासाठीं सज्ज होता. लगेच मला माझ्या एका ख्रिश्चन मित्राच्या गमतीदार वाक्याची आठवण झाली. तंबाखू, दारू, व स्त्री या तीन वस्तु नसल्या तर जगांत रहाणं मोठ्या त्रासाचं झालं असतं असं त्याचं म्हणणं. त्याच्या या म्हणण्यांत दोन तृतियांश सत्य आहे असं माझं मत आहे. मधला तृतियांश काय तो मला धोक्याचा वाटतो. राहिलेले

दोन शारीरिकदृष्ट्या कांहींसे हानिकारक दिसले किंवा असले तरी दुसऱ्या अनेक दृष्टींनीं ते फायदेशीर असतात. पुष्कळशी दृश्यादृश्य संमति या विधानाची सत्यता दर्शवीत नाहीं का? विचार आणि मूल. दोघेंहि आपल्या व्यक्तित्वाचा विकास करीत असतात. त्यांच्या स्वरूपांतच आमच्या संचिताला अंकुर फुटतात. त्यांच्या वर्धिष्णु जीवनांत जें अमरत्व आपण मिळवतों तें कितीतरी क्षणिक मरणांचा अनुभव घेऊनच नाहीं का? मग अमरतेच्या महाद्वाराकडे जायला मरणाची सोपानपरंपरा चढण्याचं कोण कशाला नाकारील?

एकदां एक गमतीची गोष्ट वाचल्याचं मला आठवतं. ती कितपत खरी आहे हें मला माहित नाहीं. पण त्यांतलं रहस्य मोठं मनोवेधक आहे. कार्लाइल व इमर्सन हे परस्परांचे मोठे चहाते होते इंग्लंडमधील आपल्या मुक्कामांत इमर्सन मुद्दाम आपल्या ग्रंथकार मित्राच्या भेटीला गेले. कार्लाइलनीं त्यांचें हंसतमुखानं स्वागत केलं व त्यांना एक चिरूट नजर करून तेहि स्वतः एक ओढीत आरामखुर्चीवर पहुडले. दोघेहि तासभर मुकाट्यानं चिरूट ओढीत आपापल्या जागेवर स्वस्थ पडले होते. चिरूट संपल्यावर इमर्सननीं उठून कार्लाइलचा निरोप घेतला. परस्परांशीं हस्तांदोलन करतांना त्यांनी उद्गार काढले " आजची आपली रात्र फार मजेंत गेली नाहीं?"

मीं ज्यावेळीं ही गोष्ट वाचली त्यावेळीं या थोर लेखकाच्या जोडगोळीला मीं वेड्यांतच काढलं होतं. पण तेव्हां त्या रात्रीचं व त्यांच्या सुखाचं रहस्य मला उमजलं. आपलें उत्कृष्ट लेखन त्यांना त्या रात्रीं सुचलें असं उद्यां प्रसिद्ध झालं तर त्यांत मला मुळींसुद्धां आश्चर्य वाटणार नाहीं. त्या रात्रीं त्या सोपान परंपरेचा अर्धाअधिक

भाग ते सहज लीलेनें चढून गेले असतील.

असे विचार करीत मी पडलों असतांना मला सुद्धां वाटलं मी लहानसा कार्लाइल किंवा इमर्सन आहें. धुराच्या त्या चंचल वेली-बरोबर परिभ्रमण करतांना मला वाटलं माझी कल्पना आकाश व्या-पीत आहे. त्या विस्तारांत लय पावणाऱ्या वलयांत मला नश्वर जी-वनाची विशालता दिसत होती.

माझ्या बोटांना एकाएकीं चटका बसला. सिगारेट केव्हांच जळून गेली होती. राख इतस्ततः सांडली होती व इवल्याशा थो-टकांतून धुराची बारीक ओळ आकाशांत चढत होती. दहा मिनिटां-पूर्वीची सिगारेट आतां कुठें होती? राख व धूर यांत तिचं रूपांतर झालं होतं. जीवनाची तरी गत हीच नाहीं का? सिगारेटसारखी आपणाला सुद्धां कुठून तरी चेतना मिळते. आपण अखंड व संथपणें जळत राहतों याचं नांव जीवन आणि कुणाला तरी चटका लावून अदृश्य होतों याचं नांव मरण. मरण केव्हां तरी येणार हें ठाऊक असूनहि त्याचा विसर पाडून आनंदानें आपण जीवन व्यतीत कर-तोंच कीं नाहीं? सिगारेटचंहि तसंच. पण ती म्हणजे धूर आणि रा-खच का? तिच्यामुळें माझ्या आनंदस्वरूप व्यक्तित्वाला वाढतां ना-हीं का आलं? कोणत्या तरी अगोचर आनंदमय शक्तीला वर्धमान होऊं द्यायला निमित्तमात्र होणं हेंच सिगारेटसारखं आपलंहि जीवन-कार्य नसेल कशावरून?

# जाणती पिढी

माझी ती रात्र मोठ्या आनंदांत गेली. एखाद्याला वादांत जिरवतां आलं म्हणजे माणसाला आनंद हा होतोच. या नियमाला मीहि कांहीं अपवाद नाहीं. आणि मी तर खुद्द तात्यांनाच जिरवलं होतं. तात्या म्हणजे जुन्या पिढीचे वस्ताद वादपटु. युक्तिवादांत त्यांच्यापुढं टिकाव धरणारीं माणसं फार थोडीं अशी त्यांची प्रसिद्धि. मग अशा बड्या धेंडाला निरुत्तर केल्याबद्दल मला आनंद झाला तर त्यांत काय आश्चर्य !

मला लहर आली व तात्यांना फुरसत असली म्हणजे त्यांची व माझी झुंज ही लागायचीच. ते सुद्धां आमच्या वयांतील पंचविशीचं अंतर लक्षांत न घेतां माझ्याशीं सलगीनं वाद घालीत. वाद विशेष रंगांत आला आणि एखादा निरुत्तर करणारा बिनतोड युक्तिवाद मीं टाकला म्हणजे त्यांचं आपलं ठराविक उत्तर ठेवलेलं:

‘ अरे, हा युक्तिवाद ठीक आहे, पण हें विविध जग ज्यावेळीं मीं प्रत्यक्ष पाहिलं, त्या वेळीं कळलं कीं, आपलं पुस्तकी ज्ञान फुकट आहे अगदीं. ’

या उत्तराच्या पोटांतील अभिप्राय सरळ शब्दांत मांडायचा झाला, तर तो असाच नाहीं का ?--'मीसुद्धां एक काळ तुझ्याइतकाच शतमूर्ख होतों, पण आतां मी फार शहाणा झालों आहें; कारण या जगांत मी तुझ्यापेक्षां जास्त दिवस जगलों आहें.'

त्यांच्या या उत्तरानं अनेकदां माझा स्वाभिमान दुखवला गेला आहे. ज्ञानाचा व शहाणपणाचा सगळा मक्ता काय तो आपल्या पिढीकडे आहे. असंच सांगायचं होतं त्यांना एकंदरींत. बरेच दिवसपर्यंत मूग गिळून मीं हें सगळं ऐकून घेतलं. कारण, धर्म, नीति, जीवनसाफल्य, ईश्वर, असले प्रश्नच आमचे वादविषय झाले होते. या विषयांत वयाच्या दाखल्यावरून त्यांना माझ्यापेक्षां जास्त अधिकारी मानण्यास मी तयार झालों; केवळ वयानं असल्या गोष्टींवर अधिकार सांगतां येत नाहीं, हें मला समजतं. पण म्हटलं, आपण देऊं त्यांना एवढी सवलत. पण त्या दिवशींचा त्यांचा तो अतिक्रम मला मुळींच खपला नाहीं. मी भडकलोंच.

हल्लींचे दिवस. कुठंहि लागलं तर कुत्रं म्हणे डाव्या पायानं लंगडतं; तसं कसलाहि वाद निघाला म्हणजे तो नवमतवादावर येऊन घसरायचा. मी पडलों तरुण. केवळ त्यामुळं 'तुमचा तो नवमतवाद' अशी तात्यांनीं सुरवात करायची. आणि मग तो एक वेळ आपला नसला, त्यावर आपले कांहीं आक्षेपहि असले तरी स्वाभिमान इरेला पडल्यामुळं तो आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाचाहि नाहीं या अभिनिवेशानं मीहि राहायचा पवित्र्यांत उभा.

नवमतवादावर बोलतां बोलतां आम्ही जीवनविकासांत प्रियाराधनेचं स्थान या प्रश्नावर येऊन पोहोंचलों. साहजिकच, असला

फाजीलपणा तात्यांना पसंत नव्हता. आज एकीशीं गप्पा करायच्या, उद्यां दुसरीबरोबर हवा खायला जायचं; परवां तिसरीशीं नेत्रपल्लवी करायची, बर तेरवां चौथीला स्नेहपत्रं लिहायचीं. हे थेर त्या पन्नाशी उलटलेल्या गृहस्थाला खपावे कसे? तरी असल्या गोष्टींना समर्थनीय मानणारा मी त्यांच्या दृष्टीनं धक्के मारून घालवून देण्याच्या लायकीचा नसल्यानं जी काय माझी संभावना करायची ती त्यांनीं तरुण पिढीच्या नांवानं खडे फोडून करून घेतली. पण तेवढ्यानं मी बधतों थोडाच.

व्यक्तीच्या सुप्त प्रणय-प्रवृत्ति चाळवून भागवण्यांनच तिचं उन्नयन कसं आहे व त्यामुळं जीवनविकास कसा सुलभ होतो, नसल्यास लैंगिक विकृतीनीं जीवन कसं झुरणीस लागतं; इत्यादि गोष्टी मी फ्रॉइड ॲण्ड कोच्या नांवावर खुलासेवार त्यांना मोठ्या आवेशानं सांगूं लागलों. अशा रीतीनं माझा सारा दारूगोळा आपली दाणादाण उडवितो असं पाहिल्यावर त्यांनीं आपली निर्वाणीची वासवीशक्ति माझ्यावर सोडली.

'बाबारे, तुला अनुभव नाहीं. पुस्तकी ज्ञान दुबळ असतं--' वगैरे.

आतां मात्र मी उसळलों. तात्यांनीं फ्लर्टिंग केलं नव्हतं, हें त्यांनीं स्वतः कबूल केलं असतं. या विषयांत आम्हां दोघांत मी काय तो अधिकारी होतों. माझ्या सत्तेखालीं राहिलेला एकुलता एक प्रांतहि ज्या वेळीं ते काबीज करूं पाहूं लागले, त्यावेळीं मी त्यांच्या राजधानीवरच हल्ला चढवण्याचं ठरविलं आणि म्हटलं,

'तात्या, केवळ वयाच्या मापानंच जर का ज्ञानाचं मोजमाप

करायचं, तर दगडालाच ज्ञानाचा गड्डा म्हणावं लागेल; असं पहा, तुम्हीं कधीं कॉलेजांत गेलां नाहीं. मिसरूड फुटण्यापूर्वी तुमचं लग्न झालं, असं तुम्हीच सांगतां. तुमच्या घरचं वळण तर अगदीं बाळबोध. त्यांत तुम्हीं अलीकडे पलीकडे कांहीं केलं नाहीं, मग हा विषय तुमच्या अनुभवांतला कसा ? विवाहितांच्या व्यभिचारप्रवृत्तीबद्दल फार तर तुम्ही सांगूं शकाल पण अविवाहितांच्या प्रणयवृत्तिबद्दल पुस्तकी ज्ञानापलीकडे तुम्हांला काय सांगतां येणार ?'

अनुभव नाहीं म्हणायला नको व आहे म्हटलं तर शीलावर बेततं असा हा विलक्षण पेंच होता. 'बरं बुवा, तूं काय म्हणशील तें खरं' असं कायसं पुटपुटून तात्यांनीं संभाषणाचं सुकाणुं फिरवलं. पण ते जिरले होते खास.

तात्याच काय, जुन्या पिढींतली प्रत्येक व्यक्ति वयाच्या दाखल्यावरून जगांतल्या सगळया ज्ञानभांडारावर अधिकार सांगत सुटते. आप्तवाक्यांवर त्यांची स्वतःची जेवढी भिस्त तेवढीच आपल्या शब्दांवर तरुण पिढीची असावी, अशी त्यांची अपेक्षा असते. पुस्तकांची किंमत कमी करून स्वतःच्या एकांगी अनुभवाला भलताच भाव आणण्याची त्यांची धडपड तर मोठी मनोरंजक असते.

एकदां मी एका व्याख्यानाला गेलों होतों. विषय शिक्षणशास्त्रासंबंधींचा होता. वक्त्याचीं विधानं जुनीं होतीं म्हणजे अलीकडच्या संशोधनानं तीं खोटीं ठरविलीं होतीं. गृहस्थाचं वय विचारांत घेणं मला प्राप्त असल्यामुळं, मी वळणा वळणानं ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आणून दिली. निरुत्तर झाल्यामुळं आंतल्या आंत जळफळत निघालेला हा गृहस्थ समारंभ संपून बाहेर आल्यावर

मला म्हणतो: 'तुम्ही या विषयावर पुष्कळ पुस्तकें वाचलीं असतील, पण माझ्याइतका त्यावर विचार केला आहे का तुम्हीं?

आतां या गृहस्थाला काय म्हणायचं? क्लापारॅद, बिनॅ, सिमॉसारख्या विश्वविख्यात हजारों तज्ज्ञांच्या अनुभवांतून निघालेल्या सिद्धांतांना केवळ या महात्म्याएवढा आपण विचार केलेला नाहीं, म्हणून धाब्यावर बसवायचं!

बरं, ज्याचा हीं माणसं अनुभव, अनुभव म्हणून डांगोरा पिटतात, त्याची छाननी केली, तर जगाच्या बाजारांत त्याला काय मोल येईल? त्याचें तेज किती अंधुक व स्वातंत्र्य किती मर्यादित? आपले कितीतरी स्वतंत्र विचार आणि कल्पना अनेकांनीं आधींच लिहून टाकल्या आहेत व तो माल आतां रद्दींत गेला आहे असं एखादं पुस्तक वाचतांना आपणांला आढळून येत नाहीं काय?

तेवढं दूर जायलाहि नको. स्वतःच्या जीवनाचं प्रामाणिकपणें सिंहावलोकन केलं, तर स्वतःच्या गाढवपणाच्या कितीतरी गोष्टी आपणांला दिसत नाहींत का? आजपर्यंत तुम्हांला अत्यंत आवडलेल्या पुस्तकांचा संच तुमच्या संग्रहीं असेल, तर त्यांतलीं पुष्कळशीं तुम्हांला रद्दीच्या भावानं विकावींशीं वाटतील. तुमचा निवडक चित्रांचा आल्बम् आज सहज चाळायला घेतला, तर त्यांतलीं बरींचशीं स्नेह्यांनीं नेलीं तर तुम्हांला चालतील आणि कांहीं वेळापूर्वी सहाध्यायाशीं झालेल्या वादविवादाची आठवण झाली, तर तुम्हांला असंहि आढळून येण्याचा संभव आहे कीं, कांहीं महिन्यामागं याच विषयावर तुम्ही बाजू बदलून लढत होतां. तात्पर्य, कालपर्यंत आपण फार मूर्ख होतों, असं आपल्या लक्षांत येईल.

थकल्या भागलेल्या म्हाताऱ्या माणसांना सगळा वेळ भूत-काळाशीं गोष्टी करून घालवावा लागतो. त्यामुळं आपण मूर्ख होतों. हें भयंकर सत्य त्यांना सारखं त्रास करीत असतं व तेंच ते तरुणांना कानींकपाळीं ओरडून सांगत असतात. पण तें ऐकून घेण्याइतकी फुरसत किंवा अवधान तरुणांना नसतं. त्यामुळं या दोन पिढ्यांचं पटत नाहीं.

वस्तुतः कालपर्यंत आपण मूर्ख होतों, हें ज्याला समजतं, त्यानं आज आपण सर्वस्वीं शहाणे झालों असं समजणं, हा महामूर्खपणा आहे. शहाणपणा ही चीजच मुळीं अशी आहे कीं, स्मशानांतून आपण परलोकांत गेलों तरीसुद्धां ती संपूर्ण आपल्या हातीं लागेल असं नाहीं. प्रत्येक वयाचा असा एक एक शहाणपणा असतो व तो त्या त्या वयाचं सुख निर्माण करण्यास पुरेसा असतो.

एक म्हातारा, त्याचा मध्यमवयस्क मुलगा व नातू असे तिघे कवळेच्या जत्रेला गेले तर तो वृद्ध गृहस्थ शांताईला फुलांच्या वेण्या घेईल, त्याचा तरुण मुलगा आपल्या हौशी पत्नीसाठीं एकादी नक्षीदार बहुमोल पेटी खरेदी करील तर छोटा मुलगा एकाद्या दिडकीवाल्या फुग्यासाठीं हट्ट घेऊन बसेल. आपल्या आवडीवरचं मुलांचं मत त्या म्हाताऱ्याला अंतर्ज्ञानानं समजलं तर तो वात्सल्य विसरून त्याला शापहि देऊन जायचा. नवऱ्यानं दिलेली भेट सुनेनं सासऱ्याला दाखवली, तर पोर उधळ्या निघाला असंच त्याला वाटेल. बाळयाचा फुटलेला फुगा त्याच्या बाबाला दिसला तर ते खास म्हणायचे "महामूर्ख पोरगा, मीं नव्हतं का सांगितलं कीं तो दोन घटकाहि टिकायचा नाहीं, म्हणून?" आणि इतक्या अवधींत बाळयाच्या डोक्यांत विचार येऊन गेला असेल कीं, आजोबा व

बाबा यांनींसुद्धां फुगेच घेतले असते इतक्या पैशांचे तर काय गंमत झाली असती घरांत दिवसभर !

त्या त्या वयाच्या या शहाणपणांत किंवा मूर्खपणांतच जीवनांतलं सगळं काव्य, सगळं स्वारस्य सामावलेलं असतं. मनुष्याची विचारसरणी व सुख यांचा संबंध फार निकटचा आहे. आणि ही विचारसरणी म्हणजे त्या विशिष्ट वयाचा परिणाम असते. एकाच वृक्षाच्या निरनिराळ्या ऋतूंतील भिन्न भिन्न निसर्गसिद्ध अवस्था सारख्याच सहजसुंदर व सत्यपूर्ण नाहींत का ? आणि पहिल्या अवस्थेच्या परिपाकामधूनच दुसरीची निर्मिति होत नाहीं का ? या वैचित्र्यपूर्ण व विविध अवस्थांतून परिणतीचं शिखर गांठणं, हेंच जीवनसाफल्य; पण हा साधा, सरळ दृष्टिकोन न राखल्यामुळंच आपण परस्परांचं जीवन सुखमय करण्याऐवजीं दुःखमय करीत असतों.

म्हणूनच वैयक्तिक सुखदुःखांचे प्रश्न सोडवतांना या शहाणपणाची अदलाबदल होऊं देतां कामा नये. आपल्या किंवा जगाच्या शहाणपणापेक्षां आपली एकंदर प्रकृति कितीतरी बिकट प्रसंगीं जास्त बिनचूक निर्णय देऊं शकते. विद्या, व्यवसाय, किंवा वधू यांची निवड करतांना विचाराऐवजीं कोणत्या तरी अज्ञात शक्तीच्या आधीन होऊनच आपण त्यांची निवड करीत नाहीं का ? या आपल्या वृत्तींतून निर्माण होणारं सुख एक वेळ क्षणभंगुर ठरलं, तरी त्याच्या क्षणिक आस्वादाची आठवण सगळ्या दुःखावर चांदणं पसरूं शकते.

असल्या वैयक्तिक प्रश्नांत 'जाणतीं' मत सर्वसत्ताधारी झाल्यामुळं अल्पावधींत न पस्तावलेलीं व कायमचीं दुःखी न झालेलीं

५६९५

कुटुंबं आपणांत कितीशीं सांपडतील ?

वडील माणसांना मुलांच्या हिताची काळजी नसते, किंवा अधिकार गाजवायची हौस असते, असं नाहीं. पण, त्यांची एका महत्त्वाच्या सत्याकडे डोळेझांक झालेली असते. आणि तें हेंच कीं जग, मन व जीवन हीं इतक्या झपाट्यानें बदलतात व गुंतागुंतीचीं बनतात कीं, जुन्या मापानीं नवे व्यवहार चालूं शकत नाहींत.

# पूर्णतेची तहान

मनुष्यप्राण्यासंबंधीं आजवर अनेक व्याख्या मी वाचल्या आहेत पण माझ्या मित्राच्या व्याख्येइतकी इरसाल व गमतीदार मला एकहि वाटली नाहीं. कदाचित् तत्वज्ञांना पटणार नाहीं ती, पण आपल्या सारख्यांना जरा आवतीं भोंवतीं बारकाईनं पाहिलं तर त्यांत बरंच तथ्य आहे असं वाटूं लागतें. त्याचें म्हणणं असं कीं मनुष्य हा स्वभावतःच टवाळखोर प्राणी आहे. मीमांसा, भाष्य, टीका, थट्टा, निंदा, टवाळी, कुटाळकी, हीं सामान्य नावे काय किंवा चिमटे, उपहार, उपहास, इत्यादि वाङ्मयीन नावें काय चट सारीं त्याच वृत्तीचीं द्योतक आहेत. शास्त्रीय दृष्ट्या त्याचें हें म्हणणं खरं असो किंवा नसो, मानवी जगाचं अर्ध अधिक आयुष्य टीकेंत खर्चं होतं यांत शंका नाहीं. घरीं, दारीं, तिकट्यावर, व्यासपीठावर, नियतकालिकांच्या रकान्यांतून वाटेल तिथं कुणाची ना कुणाचीं धुणीं धुतलेलीं दिसून येतात.

माझा गांव मुके व बोलके या दोघांहिबद्दल सारखाच प्रसिद्ध आहे. एक दिवस एक मुका विलक्षण हातवारे व वेडीं वांकडीं तोंडें करीत माझ्या वडलांना काहीं सांगू लागला. त्याच्या करपल्लवीचा मला कांहींच बोध होईना. पण बाबांना संवयीमुळं तें सारं कांहीं

समजत होतं. मोठं महत्वाचं रहस्य समजल्यामुळं त्यांची मुद्रा प्रफु-
ल्ल दिसली. शेवटीं मला कळलं कीं ती गांवच्या एका शिष्टाच्या
छिद्रावरील टवाळी होती. वाचा नसली तरी माणसाला टवाळकी
केल्याशिवाय राहवत नाहीं हें पाहिल्यावर मात्र मला वाटलं, मा-
झ्या मित्राच्या व्याख्येंत बरेंच सत्य आहे.

टीका ही ज्याप्रमाणं कुत्सित व विषारी असते त्याप्रमाणं ती
विशुद्ध व सत्प्रवृत्तहि असूं शकते. पहिलीचं मूळ आत्मपूजेंत असतें तर
दुसरीचं पूर्णतेच्या आवडींत असतं. चांगलीं शीलवान व सद्बुद्ध
माणसंहि आपणाला वंद्य वाटणाऱ्या विभूतीवर टीकास्त्र चाळवतांना
आढळत नाहींत का? कुशाग्र बुद्धीचा विचारवंत असो, प्रांजल
मनाचा निष्ठावंत कार्यकर्ता असो किंवा कलासृष्टीचा प्रति ब्रह्मदेव
असो, कोण सुटला आहे त्याच्या तावडींतून ?

आपल्या या जगांत कधीं विद्वानांच्या निष्क्रियतेवर किंवा
रसहीनतेवर कोरडे ओढले जातात तर कधीं कार्यकर्त्यांच्या अल्पज्ञते-
बद्दल तक्रार करण्यांत येते. कलावंताच्या शीलाबद्दल संशय असा
क्वचितच घेतला जात नाहीं. ज्या लोकांकडून असल्या महाजनांची
टीका चालते त्यांना त्यांजबद्दल प्रेमादर नसतो असंहि नाहीं. तर
आपली पूजाव्यक्ति संपूर्ण असावी, ज्ञान, कर्तृत्व व कला हीं
तिच्यांत संगत झालेलीं असावीं, व आपल्या निष्ठेला अधिष्ठान मि-
ळावं हा आग्रहच त्यांच्या या टीकेच्या मुळाशीं असतो. मनुष्याच्या
या छिद्रान्वेषी वृत्तीची मला मोठी चीड येई. प्रत्येक गोष्टींतलं वैगुण्य
पाहून मनाचं पावित्र्य घालवून बसणाऱ्या या दुबळ्या जीवांची कीं-
वहि येई मला. पण एक दिवस मला कळू आलं कीं अंतरींचं मांगल्य
टिकवण्यासाठींच मनुष्याचा अट्टाहास आहे हा.

## पूर्णतेची तहान

एक दिवस संध्याकाळची सहल करून परततांना मला वाटेंत एक सुंदर तरुणी दिसली. ती ख्रिस्ती असून खालच्या वर्गांतली होती. पण तिचं लावण्य खास स्तंभित करणारं होतं. नुकत्याच वर आलेल्या चंद्राच्या मधुर प्रकाशांत तिच्या ग्रामीण मोकळ्या हालचालीला विलक्षण जादू आली होती. कांहीं वेळ थांबून मी पुढं चालूं लागलों खरा पण माझ्या मनांतून तिच्या सौंदर्यलहरींचा कंप ओसरला नव्हता. मनोमय अशा सनातन स्त्रीचें तेजस्वी स्वरूपच मी कल्पनेनं तिच्यांत पाहत होतों. घरच्या रस्त्याला लागलेले माझे पाय दुसऱ्या वाटेनं परत तिच्या घराकडे वळले. मी तिकडे पोंचलों त्यावेळीं आपल्या शेजारणीशीं तिचं वाग्युद्ध जुंपलें होतें. ऐकण्याबरोबर अंगावर कांटा उभा रहावा अशा बीभत्स शिव्या ती पाठ केल्यासारखी धडाधड म्हणत होती. तिच्या सौंदर्यामुळं माझ्या अंगांत चढलेली धुंदी तत्काळ ओसरली आणि खिन्न अंतःकरणानं व जड पावलांनीं मी घरीं परतलों. एका परीनं ती तरुणी मला तिरस्करणीय वाटूं लागली. तिची शेजारीण विष्णुसहस्रनामावली म्हणत होती थोडीच. पण तिचा बरावाईट असा कोणताच परिणाम झाला नाहीं माझ्यावर. जणूं काय तिनं केलं त्यांत गैर असं कांहींच नव्हतं. माझ्या या वृत्तीचा मोठा अचंबा वाटला मला. त्या दोघीहि एकाच दर्जाच्या व एकाच स्थितींतल्या असून माझ्या दृष्टींत असा पक्षपात कां? सुंदर स्त्रीच्या तोंडीं विशुद्धच वाणी असावी अशी माझी अपेक्षा कां असावी? ग्राम्य शब्दांच्या उच्चारानं रूपाला लांछन लागतं असं थोडंच आहे. बराच वेळपर्यंत मी माझी समजूत घालीत होतों अशी. माझं समाधान होईना. शेवटीं माझ्या लक्षांत आलं कीं आपणाला पूर्णतेचा साक्षात्कार हवा असतो. स्वभावतःच आपण पूर्णतेचे उपासक आहों. प्रामाणिक टीकाकार हा पूर्णतेचा उपासक असतो. मनुष्यमात्र सत्यं, शिवं, सुंदरम्‌चा पुतळा बनावा

ही उत्कट लालसाच आपल्या टीकावृत्तीच्या मुळाशीं असते.

लहान मुलाला मातापित्याच्या किंवा गुरुजनांच्या ठिकाणीं सर्व सद्गुणांचा ठेवा दिसतो म्हणूनच त्यांचें अनुकरण करून तो प्रगतीचा मार्ग आक्रमूं शकतो, नाहीं का? वल्लभाला आपल्या दयितेच्या ठिकाणीं विश्वांतील सगळी सुंदरता, सगळं मांगल्य, सगळं शुचित्व मुसावलं आहे असं वाटल्यामुळंच तो असीम आनंदांत विहार करतो, नाहीं का? आणि ईश्वराचा वेध लागलेलीं वृद्ध माणसं आपला प्रभु म्हणजे सत्यं-शिवं-सुंदरंचा महानिधि आहे अशा श्रद्धेनंच भक्तिरसाचा आनंद लुटूं शकतात, नाहीं का?

माझीच गोष्ट घ्या ना. माझ्या आवडत्या लेखकांचीं पुस्तकं किती हौसेनं वाचतों मी? पण माझं समाधान असं क्वचितच होतं. त्यांत कोणतं ना कोणतं उणं काढून कुरकुरत असतोंच मी सदान कदा. नागव्या उघड्या सत्यदर्शनाबद्दल एकावर, स्वप्नाळू कलाविलासाबद्दल दुसऱ्यावर, निष्प्रेरक चित्रणाबद्दल तिसऱ्यावर, असा प्रत्येकावर कमी अधिक प्रमाणांत संतापत असतों मी. माझा हा संताप अन्याय्य आहे का?

स्वतःचं लेखन हातावेगळं करतांना माझ्यांतील उणीवांची तीव्र जाणीव होऊन मला जी एक प्रकारची रुखरुख लागते त्याचंहि कारण हेंच. एकाच वेळीं सत्यावर अधिष्ठित झालेलं, मानवाला जागृत व वर्धिष्णु बनवणारं आणि अपूर्व सौंदर्यानं आनंद देणारं वाङ्मय आपल्या हातून निर्माण व्हावं हीच ती ईर्षा नाहीं का? कलेंत काय किंवा जीवनांत काय मनुष्यप्राणी पूर्णतेच्या तहानेनं व्याकुळला आहे हेंच खरं.

# काळोख

सांज झाली, झाडाझुडपांचा, शेतांकुरणांचा हिरवागार रंग काळवंडत चालला, म्हणजे त्याकडे एकाग्रतेनें पहात मला स्वस्थ मुकाट्यानें पडून रहावेंसें वाटतें. घरांच्या छपरांचा लाल भडक रंग, इगर्जे कपेलांचा शुभ्रवर्ण, क्षितिजाचा चित्रविचित्र फलक या सगळयांवर एकजात काळोखाचा काळा कुंचला जसजसा फिरत जातो तसतसी आपल्याहि मनःफलकावर त्याच कुंचल्याची कारागिरी काम करूं लागते कीं काय असा भास होऊं लागतो. दिवसभर फुललेल्या पंख्यासारखें दशदिशा पसरलेलें मन हळूहळू मिटून आल्यासारखें वाटतें. आणि विविध व अमूर्त असे अनेक विचार चित्तांत संथपणें येरझारा घालूं लागतात. ती घडी टळल्यावर त्यांच्या सहलीचा माग घेणार म्हटलें तर त्यांच्या पावलांचे ठसेहि दिसत नाहींत.

ही वेळच कांहीं अशी असते कीं प्रेमिकांच्या अंतःकरणांत मोडलेला कांटा अधिकच खुपूं लागतो व दलित व पीडितांच्या दुःखाला कढ येऊं लागतात. कुणी सांगावें? त्याचसाठीं दारू झोंकण्याला हीच वेळ त्यांनीं निवडली असल. वडिलधारीं माणसेंहि

याचवेळीं परतेची ओढ लागून भक्तिरस आळवीत असलेलीं आढळत नाहींत का ? प्रकृतिभेदानुसार काळोखाचे अनेकांवर अनेक परिणाम होतात पण कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत त्यांचा खोल व गंभीर विचारांशीं निकट संबंध असतो. मी तर अशावेळीं इतका अंतर्मुख बनतों कीं पहिल्या हांकेला मी सहसा भानावर येत नाहीं. वन्यावस्थेंतील मनुष्याला लहान मुलाप्रमाणें प्रथमतः काळोखाचें भय वाटलें तरी पुढें पुढें सरावानें गाढ अंधारांतलें तें नक्षत्रमंडित आकाश पाहून त्याच्याहि मनाच्या काजळावलेल्या अवकाशांत अस्पष्ट विचारांच्या असंख्य चांदण्या लुकलुकल्या नसतील कशावरून ? त्या पहिल्या भयाबरोबर तत्कालीन युगुलांचीं काळजें असीम माधुर्यानें, उदंड सहानुभूतीनें व सहवासाच्या अधीर उत्कंठेनें एकमेकांना जोरानें विलगलीं असतील. नरनारीच काय. दोन समलिंगी जीवहि केवळ काळोखाच्या या अद्भूत जादूमुळें परस्परांवर प्रेम करावयास शिकले असतील. नाहीं कसें म्हणावें ? मला तर काळोखांत विचार करतां करतां वैयक्तिक मनःसृष्टीवर दुःखाचें एक दाट धुकें तरंगत असलेलें दिसतें व तें एका परी सगळ्या मानवतेला कोणताच द्वैतभाव न ठेवतां झांकीत आहे असें वाटतें.

काळोख, दुःख व मरण यांत विलक्षण साम्य दिसतें. त्यांचें आपापसांत गूढ नातें तर नसेल, असाहि प्रश्न मनांत उद्भवल्याशिवाय राहत नाहीं. तिघांबद्दलहि आपणांस थोड्याफार प्रमाणांत भय वाटतें व तिघांच्याहिमुळें माणसं क्षणभर का होईना परस्परांशीं स्नेहभावानं वागूं लागतात. दिवसा आपणास न हटकतां जाणारें माणूस काळोखांत भेटलें तर हटकून दोन भले शब्द दिल्याशिवाय जात नाहीं, याचा अनुभव कुणाला नाहीं ? दुःखाचंहि तसंच. आपला ज्याच्याशीं फारसा स्नेह नाहीं असा मनुष्य बिछान्याला खिळला

म्हणजे आपण किती सहानुभूतीनं बोलतों त्याच्याबद्दल? माझी पत्नी एकदां गमतीनं मला म्हणाली "मला किनई असं वाटतं कीं आपण कुठं परस्थळीं असल्यावेळीं मला एकाएकीं दुखणं व्हावं व ही बातमी कळतांच उठाउठी आपण काम सोडून निघून यावं". मला तिच्या या वेड्या कल्पनेचं हंसू आलं त्यावेळीं. पण एकदां काय झालं, मलाच परस्थळीं भरला ताप व थोड्याच दिवसांत बाटलं विकोपाला जातो असं. केव्हां एकदां ती येईल असं होऊन गेलं मला व आतां तिला पत्र पाठवण्याची व्यवस्था करणार तोंच ती घरांत तयार. तिची ती बावरलेली क्षीण मुद्रा, जाग्रण व भीति यांमुळें खोल गेलेले डोळे पाहून माझ्या डोळयांना पाणी आलं. पण किती समाधान वाटलं त्यावेळीं मला? त्या नंतरच्या कालखंडांत आमच्या प्रेमाचा प्रवाह जास्त सखोल व निर्मल झाला असं मला वाटलं. एकमेकांत कसली तरी अढी येऊन परस्परांना दुरावलेले किती तरी स्नेही एकाद्या दुःखाच्या प्रसंगानं पूर्वीपेक्षांहि जास्त जिवलग झाले असतील.

जी गोष्ट दुःखाची तीच मरणाची. एकादी प्रेतयात्रा दृष्टीस पडली म्हणजे दुष्ट मनुष्यालाहि वैराग्याचे विचार सुचूं लागतात. व मनुष्यजीवनाचा तोकडेपणा व भंगुरता लक्षीं येऊन क्षणभर त्याला आपल्या दुष्टपणाचा विसर पडतो.

कालच्या काळोख्या रात्रीं असे अनेक विचार माझ्या मनांत चालले होते. अंधारावर एक स्तोत्र लिहावं असं मला वाटलं. एका मागून एक अशा अगणिक कल्पनानीं माझं मन फुलून आलं व त्याचें अभ्यंग दर्शन घेण्यासाठीं ओटीवरून मी बाहेर बागेंत गेलों. कसल्या तरी अनिर्वचनीय अनुभूतीनं स्तिमित झालों मी. हें दृश्य

म्हणजे काळोखाचें -- नव्हे -- श्रीकृष्णाचें -- विराटस्वरूप वाटलें मला. आणि उपड्या शिंपल्यासारखें तें आकाश म्हणजे श्रीकृष्णाचा वरद-हस्तच. त्याच्या तळहातावरच्या तेजोरेषा, ग्रहांचे उंचवटे, वगैरे सर्व शुभचिन्हें मला दिसूं लागलीं. त्यावरून त्याच्या भविष्याचा कयास बांधण्याच्या ईर्षेनं मी माझी कल्पना ताणून पाहिली. माझ्या त्या वेड्या प्रयत्नाचें माझें मलाच हंसूं आलें नंतर. पण तेवढ्यानं ज्या काळोखाची आपण उपेक्षा व तिरस्कार करतों त्यानंच किती लख्ख प्रकाश टाकला होता माझ्या मनांत!

# पोट आणि हृदय

"पोट आणि अवयव" ही गोष्ट मी लहानपणीं वाचली. त्यावेळीं अनेक प्रश्नांनीं माझ्या मनांत एकच काहूर उठवून दिलं. पोट व अवयव यांचं भांडण आधीं मुंपणंच शक्य आहे का? आणि एक वेळ शक्य असलं तरी तसं कधीं घडतं का? माझ्या स्वतःच्या बाबतींत मला कधीं तसा अनुभव आला नव्हता व एकाहि स्नेह्यानं आपल्या बाबतींत तसं घडल्याचंहि मला सांगितलं नव्हतं. मुलं दुधखुळीं असतात, त्यांना कसलीहि थाप द्यावी असं वेड्या इसापला वाटलं असावं असं मानून मी माझ्या जिज्ञासू मनाचं समाधान केलं त्यावेळीं. तात्पर्य, पांडित्याच्या अभावीं त्या वेळीं तर त्या गोष्टीचं स्वारस्य मला अनुभवतां आलं नाहींच व पुढंहि पोट व अवयव यांचं भांडण कधीं जीवनांत मला दिसून आलं नाहीं.

मला भांडण दिसलं ते निराळंच. कोंबड्यांसारखी पोट व हृदय यांची झुंज लागली आहे व एकमेक एकमेकांना टोंचीत बोंचीत आहेत असं चित्र मला दिसलं. तें अजूनहि माझ्या नजरेपुढून हलत नाहीं. त्यांच्या झगड्याचं विदारक व भयानक स्वरूप मला सारखं भेडसावीत असतं तिन्हीत्रिकाळ. हृदय व पोट यांचा तीव्र कलह घरोघर चालला आहे व त्यामुळं मरणापेक्षांहि जास्त शोचनी-

य अवस्था निर्माण झाली आहे. पोट व अवयव यांच्या काल्पनिक झगड्यांत दोघांवरहि मरण ओढवलं, पण पोट व हृदय यांच्या वास्तव कलहामुळं दोघांच्याहि कपाळीं नरकवास आलेला आहे. त्यामुळं हिऱ्यासारखं दैदिप्यमान मानवी जीवन कोळशासारखं निष्प्रभ व काळंठिक्कर पडलं आहे.

पोटाला अर्धपोटीं ठेवल्यामुळं तें स्वतःची भूक भागवण्यासाठीं हृदयाचे लचके तोडीत असतं. त्यामुळं हृदय नामशेष होत चाललं आहे. त्यामुळं प्रत्येक क्षुधापीडित व्यक्तीच्या जीवनांत, व्यवसायांत व व्यवहारांत हृदयाचा ओलावा नाहीं, मुद्रेवर परसुखानं प्रज्वलित होणारं स्मित नाहीं, डोळ्यांत परदुःखानं चमकणारं असूं नाहीं. जिकडे तिकडे औदासिन्य, निराशा, निरुत्साह यांचीच सांथ फैलायलेली.

शिक्षक अर्धपोटीं असल्यामुळं त्याच्या अध्यापनांत हृदय नाहीं, आणि म्हणून मुलांच्या मुद्रेवर जीवनाचा तजेला नाहीं. लेखक भुकेबंगाल झाल्यामुळं त्याच्या लेखनांत हृदयाची तळमळ आणि जळजळ नाहीं. आणि म्हणून वाचकाच्या मनांत हीन जिण्याबद्दल उदात्त असंतोष नाहीं. हीच गोष्ट इतर पेशांतल्या व घरांतल्या माणसांची. पोटाची खळगी धडपणं भरतां न आल्यामुळं निर्मळ मनाच्या असंख्य तरुणींना हृदय मारून आपल्या देहाचीं दुकानं थाटावीं लागतात. अनेकांवर स्वतःच्या हातानं आपल्या मुलीबाळी व आयाबहिणी स्त्रीमांसाला चटावलेल्या नरश्वापदांच्या जबड्यांत लोटण्याचा प्रसंग येतो. आया आपल्या अर्भकाचं दूध तोडून परक्या मुलांना पाजूं लागतात. कोणतंहि पाप किंवा दुराचार करण्यास माणसं प्रवृत्त होऊं शकतात. पोटाची आग असह्य होतांच

## पोट आणि हृदय

जिथं विश्वामित्रासारखा तपस्वी कुत्र्याचं तंगडं चोरून खातो तिथं सामान्य मनुष्याच्या विवेकबुद्धीला अंधत्व आलं व त्यानं हृदयाच्या हांकेला ओ न देतां पापाच्या गर्तेत उडी टाकली तर तें अक्षम्य म्हणतां येईल काय ?

कुणालाच पापी व्हायला नको आहे. पण बुभुक्षिताला उष्ट्याची किळस असून चालत नाहीं. पापाचं हालाहल त्याला डोळे मिटून प्यावं लागतं व तें पचवण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते. धर्मसूत्रांनीं स्वर्ग गांठतां येत असेल, पण भुकेल्या जीवाच्या हातातोंडाची गांठ पडत नाहीं. नीतितत्वांच्या प्रतिपादनानं खुशालचेंडू लोकांची करमणूक होत असेल पण भुकेनं विव्हळणाऱ्याला त्यामुळं कपाळीं धोंडे बसतात. पोटाचे हाल चुकवण्यासाठीं शेंकडा नव्याण्णव लोकांना प्रत्यहीं आपल्या तत्वांशीं व्यभिचार करावा लागतो व हृदयाचे हाल सहन करावे लागतात. अनेकांना तर आपल्या हृदयाच्या आवडी व अपेक्षा यांचा त्याग करून पोटापायीं कुठल्यातरी घाण्याला मान जुंपावी लागते.

पोट व हृदय यांच्या या झगड्यांत पोट हृदयाला दोन कारणानीं खात असतं. अर्धपोटीं पोट भुकेसाठीं त्याला खातं तर फाजील भरल्यामुळं धापणारं पोट औषध म्हणून त्याला गिळंकृत करीत असतं. गरीब व श्रीमंत, जित व जेते, प्रबुद्ध व निर्बुद्ध या दोघांनाहि हृदय नसावं हें याचंच प्रत्यंतर नाहीं का ? अशानंच माणुसकीला ओहोटी लागत आहे व मानवतेच्या कुशींतली तेजस्वी संभवनीयता जेथल्या तेथं विनाश पावत आहे.

पोटच हृदयाला खातं असं नाहीं तर हृदयहि पोटाला चिमटा

लावीत असतं. त्यागाच्या खोट्या कल्पनेनं पोटाला उपास काढा-याला लावणारे महात्मे आपल्यांत थोडे का आहेत ? अशानं आपण सुदृढ व समर्थ होऊं असं त्यांच्या हृदयाना सारखं वाटत असतं. उपाशीं किंवा अर्धपोटीं समाधानानं राहण्याची त्यांची शिकवण अनेकांना त्यांच्या विकासाला पराङ्मुख बनवीत असते. या तत्व-ज्ञानाच्या विषानं अर्धमूर्च्छित झालेलीं अनेक दुबळीं हृदयं "आपलं दैवच खोटं, पूर्वकर्माप्रमाणं पोटाला हे उपास काढलेच पाहिजेत. देवाघरचा न्याय आहे हा" अशा श्रद्धेला बळी पडून पोटाची आग आंसवांनीं विझवूं पाहतात.

शरीररचनेंत हृदयाची बैठक पोटाच्या वर असते हें जितकं खरं तितकंच हृदयापेक्षां पोटांतल्या आंतड्यांचं वजन जास्त असतं हेंहि खरं. जीवनांत पोटाला महत्व आहे व हृदयाला श्रेष्ठत्व आहे हें सत्य उपेक्षून चालत नाहीं. हें ओळखून परस्परांनीं तडजोड क-रून घेतली पाहिजे. हृदय सबल करण्यासाठींच पोटाला संतुष्ट ठेवलं पाहिजे हाच निसर्गाचा संदेश आहे. त्या संदेशाचा मानवजातीनं अनादर केल्यामुळंच पोटाला योग्य अन्न पुरवण्याचं तरतम ज्ञान तिला साधत नाहीं व म्हणूनच ती अधोगतीला चालली आहे. जों-पर्यंत पोट व हृदय यांचा तंटा मिटला नाहीं तोंपर्यंत मानवजात प्रगत किंवा सुखी होण्याची आशा नको.

गेल्या दिवसांत कशावरून तरी असे विचार मी तात्यांशीं बोलून गेलों, त्यावेळीं ते मला म्हणाले 'तूं म्हणतोस तें ठीक, पण त्यामुळं जगांतील दुःख नाहींसं होईल का ?' 'मुळींच नाहीं. पण जग खात्रीनं आजच्यापेक्षां जास्त सुखी होईल. निदान त्याच्यांतली माणुसकी वाढीस लागेल'? मी उत्तरलों.

## पोट आणि हृदय

जगांतील दुःख नष्ट होणार नाहीं म्हणून आहे तें कमी करूं नये हा कुठला न्याय? आजचीं दुःखं इतक्या हीन जातीचीं आहेत कीं त्यांच्याशीं झुजतांना हृदय उंचावण्याऐवजीं तें शरमेनं अधो-मुख बनतं. ज्यावेळीं सगळ्यांचीं पोटं नीटपणं भरूं लागतील त्याच वेळीं सगळ्यांच्या हृदयांना प्रगतीची सोपानपरंपरा चढण्याची शक्ति येईल व अवसर मिळेल. त्यावेळचीं दुःखं कितीहि कठोर असलीं तरी तीं उदात्त असतील व तीं हृदयाला उजाळा आणतील. तीं थोरांचीं दुःखं दुबळ्यांच्या सुखापेक्षां निःसंशय श्रेष्ठ असतील.

अशा जीवनाला आसावलेले स्त्रीपुरुषच हा पोट व हृदय यांच्या मधला लढा मिटवूं शकतील. पण तो लढा दिसायाला आधीं डोळे असावे लागतात व तेहि उघडे असावे लागतात. क्रांतीच्या धक्क्यानं ते झटकन उघडतील का?

# मरावं कसं

'जगावं कसं' हा प्रश्न समाधानकारक रीतीनं सोडवतां न आल्यामुळं कितीतरी दुबळे जीव 'मरावं कसं' हा प्रश्न सोडवीत असतात हें कुणाला माहित नाहीं. दैनिक वृत्तपत्राचा अंक सहज चाळायाला घेतला तर या विधानाची सत्यता पटवणारीं दोन तीन तरी उदाहरणं खास सांपडतील. कोण परीक्षेंत नापास झाल्यामुळं जीव देतो, कोण प्रेमांत अपेश आलं म्हणून विष खातो, कोण आपल्या प्रीतिविवाहाला वडील संमति देत नाहींत म्हणून आत्महत्या करतो, कोण व्यापारांत पत बुडते म्हणून किंवा दिवाळं निघालं म्हणून हिरकणी खातो. 'ज्ञानप्रकाशां'त नांव छापून यावं म्हणून मरणारे किंवा मुलांबाळांचं दैन्य कायमचं फिटावं म्हणून गुप्तपणं मरून विमाकंपनींना नाडणारेहि कांहीं थोडथोडके नसतील. या लोकांच्या मृत्यूच्या बातम्या आपण जितक्या उत्सुकतेनं वाचतों तितक्याच सहजतेनं विसरून जातों. आतांशा तर त्यांच्या अतिरेकामुळं पूर्वीची उत्सुकताहि राहिलेली नाहीं. आपल्या मरणानं जिवंतांचा विचार-क्षोभ करण्याचं सामर्थ्य नसल्यामुळं या क्षुद्र लोकांच्या मरणानं त्यांचा तर फायदा होत नाहींच व इतरांचाहि होत नाहीं. जीवन व मरण या दोघांहिबद्दल सारख्याच औदासिन्यानं वावरणारांना जगावं

कसं व मरावं कसं यांपैकीं एकहि धडपणं समजत नाहीं. वस्तुतः एका प्रश्नाचंच उत्तर मिळण्याचा प्रश्न मग दुसऱ्याचं उत्तर काहीं दूर नाहीं.

'मरावं कसं' या प्रश्नाचा विचार ज्यांना जगायाचं आहे त्यांनीं करायाचा नसतो, अशीच हल्लींहल्लींपर्यंत माझी समजूत होती व मरणाचा विचार धुडकावून लावून मी जीवनाचा आस्वाद घेत होतों. पण पणजींत मी ट्रेनिंग कॉलेजमध्यें असतांना एक विचित्र गोष्ट घडली व माझ्या विचारसरणीला जबरदस्त धक्का बसला.

ही गोष्ट म्हणजे एका रशियनाचा मृत्यु. ग्रार्शॉफ हा एक परागंदा रशियन म्हातारा होता. तो पणजी शहरांत शिकवणी देऊन राहत असे. त्याला पुष्कळ भाषा अवगत होत्या व त्याबद्दल त्याची प्रसिद्धि होती. कॉलेजला जातांना मला त्याच्या खोलीवरून जावं लागे. त्याची खोली म्हणजे एकाकी जीवाचा संसार. ती बहुतेक बंदच दिसायाची. ज्यावेळीं ती उघडी दिसे त्यावेळीं तो म्हातारा कधीं वाचनांत, कधीं गमतीनं चिलिम ओढण्यांत तर कधीं शेजाऱ्याच्या गांवठी मुलांशीं मोडक्या तोडक्या कोंकणींत बोलण्यांत गढलेला दिसे. या पलीकडे त्याच्या जीवनाची कुणालाच फारशी माहिती नव्हती. त्याची पांढरी शुभ्र दाढी, भव्य कपाळ व भेदक व शोधक नजर पाहिली म्हणजे हा मनुष्य सामान्य नाहीं याची खात्री पटे. त्याच्या जीवनांत विलक्षण उलाढाली व उलथापालथी झाल्या असल्या पाहिजेत याबद्दल मला तरी शंका नव्हती. नाहींतर रशीयांतला एक गुणी मनुष्य गोव्यांत दिवस कंठील कशाला ?

ग्रॉशॉफची वृत्ति केव्हांहि आनंदी असे. कोणाहि नवख्या गृहस्थाशीं तो स्नेह्याप्रमाणं वागे. राजकीय व सामाजिक घडामोडीं- विषयीं चर्चा करी पण स्वतःच्या गतजीवनाबद्दल तो कधींहि बो- लल्याचं कुणाला माहित नव्हतें व एकाद्यानं त्याला त्याविषयीं प्रश्न करण्याचें धाडस केलेंच तर तो उडवून लावण्यांत त्याला विलंब लागत नसे.

ग्रॉशॉफ वारल्याचं समजेपर्यंत तो हॉस्पीटलमध्यें आजारी होता याची मला दादहि नव्हती. पण पुढं त्याच्या मरणाची सा- द्यंत हकीकत मी मिळवली. इस्पितळांत कांहीं दिवसपर्यंत त्यानं औषध व आहार घेतला पण पुढं जेव्हां त्याला कळून चुकलं कीं आपण या दुखण्यांतून उठत नाहीं त्यावेळीं त्यानं परिचारकांची सेवा किंवा औषध आहार घेण्याचं साफ नाकारलं. डॉक्टर त्याची समजूत पाडण्याची पराकाष्टा करूं लागले. त्यावेळीं तो म्हणाला ‘ डॉक्टर, जीवन हा जगाशीं केलेला सौदा आहे एक. जोंपर्यंत ज- गाला आपण काहींतरी उलट देऊं शकतों त्यावेळींच जगाकडून कांहीं तरी घेण्याचा अधिकार आहे. माझं मरण आतां जवळ आलं आहे. तेव्हां बांडगुळासारखं जगावर जगणं माझ्या तत्वाविरुद्ध आहे. मी नास्तिक आहें व परलोकावर माझा विश्वास नाहीं, तेव्हां माझ्या तत्वानुसार जगणं आणि मरणं यांतच माझं सुख आहे. या अंतिम सुखावर मी पाणी सोडावं अशी आपली इच्छा आहे का ?’ बिचारे डॉक्टर या प्रश्नानं निरुत्तर झाले. सगळ्यांना वाईट वाटलं. थोड्याच दिवसांनीं ग्रॉशॉफनं प्राण सोडला. त्याचं प्रेत ज्यावेळीं हलवण्यांत आलं त्यावेळीं त्याची अखेरची इच्छा व्यक्त करणारें एक मृत्युपत्र आढळलं. तें इतकं असामान्य होतं कीं त्यामुळेंच सगळं पणजी शहर ग्रॉशॉ- फचा आदरपूर्वक नामोच्चार करूं लागलं. एका परागंदा एकाकी

## मरावं कसं

जीवाचा संसार तो काय पण त्याची विल्हेवाट लावण्यांत ग्राशॉफच्या जीवनाचं सारसर्वस्व ओतलेलं होत, आपलं जें काय सामान सुमान किंवा कपडालत्ता असेल तो विकून त्याचं उत्पन्न कुष्टपीडितांच्या रुग्णालयास देण्यांत यावं, आपला तिकिटांचा संग्रह मोफत वाचनालयांत ठेवण्यांत यावा व आपला देह चिरफाड करण्यासाठीं मेडिकल कॉलेजच्या हवालीं करावा असं लिहून ठेवलं होतं.

जगाचं दुःखनिवारण, कलोपासना व ज्ञानदान या तीन कार्यांसाठीं त्यानं आपलं सर्वस्व खर्च केलं. 'मरावं कसं' हा प्रश्न त्यानं इतक्या उद्बोधक व विचारप्रक्षोभक पद्धतीनं सोडवला होता कीं प्रत्येकाच्या स्थितिबद्ध जीवनाला धक्का बसावा. हजारांच्या जीवनापेक्षां एकाद्याचं मरण जास्त प्रेरक व उत्तेजक होऊं शकतं तें हें असं.

'मरावं कसं' हें जगावं कसं हें ज्याला उमजलं त्यालाच समजूं शकतं. ग्राशॉफच्या जीवनाची मला कांहींच माहिती नसली तरी त्याच्या मरणाच्या अभिनव पद्धतीमुळं मी त्याच्या तेजस्वी जीवनाचा इतिहास सहज कल्पनेनं पाहूं शकलों. मला दिसलं त्यापेक्षांहि तें आपणाला जास्त हृदयंगम दिसण्याचा संभव आहे. तेव्हां माझ्या नजरेपुढचं तें चित्र आपणास नजर करून मी आपल्या कल्पनेचा आनंद व प्रेरणा कशाला हिरावून घेऊं ?

कांहीं लोक सूर्यासारखे असतात. त्यांचं जीवन व अवसान दोन्हीहि सारखींच प्रेरक व मार्गदर्शक असतात. ज्यांना जगण्याचं भाग्य लाभतं त्यांना मरणाचंहि लाभेलच असं नाहीं. पण ज्यांना जगण्याची कला साधली नाहीं त्यांना ऐनवेळीं कधींकधीं मरणाची

कला साधल्याचीं उदाहरणं इतिहासांत अनेक सांपडतात. शिवछत्रपतींनां जगावं कसं हें समजलं पण मनासारखं मरणाचं भाग्य त्यांना लाभलं नाहीं. शंभूराजे आबासाहेबांप्रमाणं आपल्या जीवनानं मराठमोळा मेळवू शकले नाहींत पण जीवनानं मिळवतां आलं नाहीं तें ते मरणानं मिळवूं शकले.

'जगावं कसं' या प्रश्नाच्या सोडवणुकींत गर्क असल्यामुळं व मृत्यूचं आव्हानशृंग ऐकूं न आल्यामुळं अनेकांना आपल्या मरणाचा सोहळा साजरा करतां येत नाहीं पण जीवनाचा कधींच विचार न केलेले लोक तें भाग्य मिळवून बसतात. गायधनी किंवा बाबू गेनू यांचं जीवन कदाचित फारसं महत्वाचं झालं नसेल पण मरणाची कला साधल्यामुळं ते जीवनाचं साध्य मिळवूं शकले.

आतां मात्र मला वाटत असतं कीं ज्यांना मरणानंतरहि जगण्याचं आहे त्यानीं या प्रश्नावर विचार केलाच पाहिजे कीं 'मरावं कसं.'

# जुन्या घराची दुरुस्ती

तात्यांचा बापू हल्लींच कुठं मला सलगींत घेऊं लागला आहे. वस्तुतः या पूर्वींच आमचा स्नेह जमायाला हवा होता. कारण एक तर तात्यांशीं माझं नातं बरोब्याचं व दुसरं आम्हीं दोघे समवयस्क पण तात्यांशीं माझा स्नेह असल्यामुळंच कीं काय तो मला वचकून असे. वडिलांच्या स्नेह्यांना रहस्यांत घेणं मुलांना धोक्याचं वाटत असावं बहुतेक. पण हल्लीं नवमतवादावर तात्यांशीं माझे वरचेवर खटके उडूं लागल्यापासून तो माझ्याशीं मोकळेपणानं बोलूं लागला आहे. तात्यांच्या मतामुळे त्याला संसारांत कुठं दुखतं तेंहि तो मला खुल्या दिलानं सांगत असतो. म्हातारा मनाचा प्रेमळ असल्यामुळं त्याला दुखवणं त्याच्या जिवावर येतं. माझ्याकडून त्यांचं मन वळवण्याचे त्याचे प्रयत्न चालू असतात. गेल्या दिवसांत तो मला म्हणाला.

'कळलं बाळाभाऊ, आतां घराच्या दुरुस्तीला पुन्हां सुरवात करण्याच्या विचारांत आहेत तात्या. गतवर्षीं चौपाशीजवळची बाजू दुरुस्त करण्यासाठीं आठनवशें रुपये खर्च झाले व आतां माजघराची बाजू सावरण्यासाठीं आणखी पांचसातशें रुपये वाया जाणार. या

त्यांच्या वेड्या वादांत जो खर्च झाला तेवढ्यांत चांगलं टुमदार नवं घर उभं झालं असतं एव्हांना. खर्च केल्यासारख्या सोयी तरी असायच्या होत्या. त्याहि बाबतींत पूर्वीचीच रड. जुन्या काळचं आपलं हे घर. यांत चांगली हवाहि खेळत नाहीं व स्वच्छ उजेडहि पण पडत नाहीं. धड व्हिजिटिंग हॉल नाहीं चांगलासा. तुझ्यासारखे चार स्नेही आले तर चांदण्यांत गंमत करायाला गच्ची नाहीं. पण तात्यांना तें पटत नाहीं. एवढ्या पैशांत सर्व सुखसोयींनीं सज्ज असं छानदार घर उडवून दिलं असतं मी!'

'बापू, तूं कांहीं काळजी करूं नकोस. मी बघतों तात्यांचं मन वळवतां येतं तर.' इतकं बोलून मी तात्यांच्या खोलीकडे वळलों.

'काय तात्या, यावं तेव्हां घराबाहेर असतां हल्लीं. कोर्टकचेरीच्या कामांत गुंतलां आहांत की काय? मी विचारलं.

'बाबारे, एकवेळ खटला लढवणं पुरवलं पण हें घरदुरुस्तीचें काम नको. मजूर, सुतार, गंवडी या सगळयांची गांथन गोवणं म्हणजे आवळयांची मोट बांधण्यासारखं. माझ्या स्वभावाशीं हें जुळत नाहीं. पण बापू कांहीं संसारांत लक्ष घालीत नाहीं. तेव्हां माझं हें काष्ट उभं आहे तोंवर मला काढल्याच पाहिजेत या काढाओढी. मी घर बरोबर घेऊन जाणार आहें थोडाच. म्हणे नवं घर बांधूं. अरे, घर बांधूं म्हटल्यानं का तें बांधून होतंय? आपल्याकडून कसलं घर बांधून होणार हें दिसतंच आहे. निदान वाडवडलांनीं बांधून ठेवलेली ही मठी तरी सावरून धरावी म्हणतों मी.,

'पण मोडकळीस आलेल्या या घरापायीं आतांपर्यंत जो खर्च

झाला त्यांत लहानसं नवं घर नसतं का बांधून झालं? मी विचारलं.

'तूं, बापू, आतांचीं सारीं पोरं तुम्ही एकाच माळेची मणी. तुम्हां लोकांना व्यवहार कसा तो कळत नाहीं. हातांत चार पैसे झाले म्हणजे मी घरदुरुस्तीच्या कामाला लागतों. म्हणून तर एवढं काम होऊन आलं. आतां हिशेब केला म्हणजे दिसते खरी मोठी रक्कम पण ती घरकामांत खर्च केली नसती तर अन्य कामांत खर्च होऊन गेली असती व मग नवंहि घर नाहीं व जुनंहि घर नाहीं अशी झाली असती आपली गत. समज मोठ्या चिकाटीनं टाकली असती एवढी रक्कम आपण आपल्या संग्रहीं. तरीहि आपल्या घरा-सारखं चांगलं ऐसपैस घर काहीं आपणाला बांधतां आलं नसतं. बापूच्या म्हणण्याप्रमाणें बांधलं असतं आपण नव्या पद्धतीचं एकादं वीतभर घर. घर बांधण्यासारखं एकादं कार्य झालं तर त्यांत पांच सातशें लोकांच्या पंक्ती बसतील अशी चौपाशी नको का? बापूला वाटतं या जीर्ण घरासाठीं एवढा खर्च कां? मी म्हणतों, माझ्यासा-रख्या म्हाताऱ्या माणसांचा अन्नपाण्याचा खर्च करण्यापेक्षां त्यांना उपासांनीं मरूं दिलेलं काय वाईट?'

घरदुरुस्तीच्या मुळाशीं असलेली तात्यांची ही वृत्ति व तिच्या समर्थनासाठीं बुद्धीपेक्षां भावनेवर भर देण्याचा त्यांचा कल पाहून मी तेथेंच विषय आंखडता घेतला. पण तेवढ्यांत तात्यांच्या म-नाचा--नव्हे सामान्य मानवी मनाचा-एक प्रभावी विशेष मला उमगून चुकला.

मनुष्याचें मन जात्या कितीहि संस्कारक्षम असलं तरी त्याची ही क्षमता कालांतरानं खुरटत जाते व या सजीव चिकणमातीला

भोंवतालच्या विशिष्ट जगाच्या हातून जो आकार मिळत जातो त्याला स्थिरता येते. त्या जगाच्या संस्कारसमुच्चयानेंच त्याच्या कल्पना, भावना, विचार व संवयी यांना सगुणत्व येतं. कांहीं जीव-जंतूंना त्यांच्याच आसमंताचं रंगरूप आलेलं आपण पहात नाहीं का? या गुणविशेषांत ज्याप्रमाणं त्यांच्या संरक्षणाची सुलभता सांठलेली असते त्याप्रमाणं मनुष्याच्या या मनोधर्मांतहि त्याच्या सुरक्षिततेची सोय झालेली असावी. म्हणूनच सहवासानं आत्मीय बनलेल्या जगांत त्याला सहजतेनं वावरतां येतें. पण त्याबरोबर आपल्या जगाच्या बन्धनापलीकडे त्याला मोकळेपणा वाटेनासा होतो. नव्या जगाशीं एक वेळ जुळवून घेणं भाग झालं तरी तें त्याला साधत नाहीं.

व्यक्ति किंवा वर्ग यांच्यांतील पुष्कळशा कलहांचें मूळ मला वाटतं आपल्या या मनोधर्मांत आढळण्यासारखं आहे. संस्कारक्षमतेच्या अभावीं, मोडकळीस आलेलं जुनं घर तात्यांना अट्टाहासानं सावरून धरावंसं वाटतं तर ती जोमांत असल्यामुळं बापूला नवं घर उभारण्याचे मनोरथ करावेसे वाटतात. तरुणाची दृष्टि भविष्याकडे लागलेली तर वृद्धाची दृष्टि भूतकालाकडे वळलेली असते. तरुण भावि कालाचीं सुखस्वप्नें चितारण्यांत निमग्न असतो तर वृद्ध भूतकालाच्या भूपाळ्या आळवण्यांत रंगून जातो. नव्या पिढीला जुनं जग निरुपयोगी वाटतं तर जुन्या पिढीला नवं जग धोक्याचं वाटतं. जुन्या घरांत बापूंची जेवढी गैरसोय होते त्यापेक्षां बापूनं नवं घर बांधल्यास त्यांत तात्यांची जास्त होईल.

स्वतःच्या हितसंबंधाचं संरक्षणच जीवमात्राच्या सर्व हालचालींच्या मुळाशीं असतं या नियमाला मला वाटतं, मनुष्याच्या

भावना किंवा विचार सुद्धां अपवादभूत होऊं शकत नाहींत. घर-बांधणीच्या प्रश्नावर ज्या कारणामुळं बापूंचं व तात्यांचं पटत नाहीं त्याच कारणामुळं नवमतवादावर माझं व तात्यांचं एकमत होत नाहीं असं मी म्हटलं तर तें वावगं होईल का?

जुनं घर मोडून त्या जागीं नवं बांधायचं झालं तर मध्यंतरींचे दिवस बरीचशी गैरसोय सोसून एकाद्या खोपटांत काढावे लागतात हें का कुणाला माहीत नसतं? पण भावी आपत्ति टाळण्यासाठीं आपण ते क्लेश खुशीनं पतकरीत असतों. मात्र हीच वस्तुस्थिति ज्यावेळीं आपण आपल्या समाजाच्या इमारतीला लागू करतों त्यावेळीं हा विवेक बहुतेकांना राहत नाहीं. अविवेकी व अप्रबुद्ध माणसांबद्दल मला कांहींच म्हणायाचं नाहीं पण तात्यांसारखीं सुबुद्ध माणसंहि ज्यावेळीं समाजाच्या पुनर्घटनेला कसून विरोध दर्शवितात त्यावेळीं मात्र मला म्हणावंसं वाटतं कीं त्यांचा हा विरोध स्वार्थमूलक असतो. आपली संस्कारक्षमता संपुष्टांत आल्यामुळं संक्रमणकालांतली गैरसोय आनंदानं सहन करण्याइतकं त्राण त्यांच्यांत राहिलेलं नसतं. बदलत्या जगाबरोबर बदलायाला तीं सर्वस्वी असमर्थ बनलेलीं असतात. मग, आपल्या हयातींत कांहीं ही इमारत कोसळत नाहीं ना? करा कशाला उगीच खटाटोप? अशी त्यांची विचारसरणी होऊन बसते. स्वार्थाच्या या झिरझिरीत पडद्यामुळं त्यांची ज्ञानदृष्टि दुबळी बनते व नव्या समाजमंदिराचा नकाशा दाखवला तरी त्याचं श्रेष्ठत्व त्यांना दिसनासं होतं. पण नवी पिढी जीर्ण समाजमंदिरावर आघात करीतच असते. त्याची एकादी बाजू कोसळली म्हणजे दचकून उठलेलीं हीं वृद्ध माणसें त्वेषानं उसळून अंगावर येतात व संक्रमणकालांतल्या वैगुण्याकडे अंगुलिनिर्देश करीत विचारतात 'शेवटीं घर मोडून मांडव घालण्या-

इतकीच ना तुमची अक्कल?' असं विचारीत शिव्या शाप देत पुन्हां विश्रांति घेतात. ज्यांच्यांत थोडी क्रियाशक्ति आहे ते म्हणतात आपण आपल्या समाजमंदिराची दुरुस्ती करूं. पण जिथें पायाच डळमळीत झाला आहे तिथें वरपांगी दुरुस्ती काय कामाची? पण भूतकालाकडे ज्यांची नजर वळलेली आहे त्यांना भावी कालांतील धोका दिसावा कसा? म्हणून अशांचं मतपरिवर्तन करण्याची खटपट करणं म्हणजे शक्तीचा अपव्यय आहे असें मला वाटतं, मात्र वयोवृद्धांना मी वृद्ध समजतों असं कुणी समजूं नये. कारण पुष्कळसे तरुण वयोवृद्धांपेक्षांहि वृद्ध असतात हें मला पक्कं माहित आहे. मनानं जे वृद्ध झाले आहेत, त्यांची संस्कारक्षमता नष्ट झाली आहे. अशांनाच मी वृद्ध समजतों. असे लोकच म्हणजे प्रगतीच्या मार्गांतले धोंडे होत.

आजचीं सजीव (म्हणजे संस्कारसुलभ) माणसं उद्यां धोंडे बनायाला एकच उपाय आहे व तो म्हणजे प्रत्येकानं आपल्या संस्कारक्षमतेची जपून जोपासना करणं. मी तर त्याला आतांपासूनच सुरवात केली आहे. नाहीं तर तात्यांना नावें ठेवतां ठेवतां मीच होऊन जायचा पुढं मागं माझ्या मुलांचा तात्या!



# मखमली ठिगळें

तीं संध्याकाळ चांगली प्रसन्न असल्यामुळें गजाला घेऊन फिरायाला जाण्याच्या विचारानं मी मुद्दाम त्याच्या खोलीवर गेलों. स्वारी खाटेवर पडल्या पडल्या आळस झाडीत होती.

'चल, मुलखाचा आळशी कुठला ! किती छान रंग पसरले आहेत बघ बाहेर ! कांपालच्या बाजूनं भटकून येऊं जरा. या दिवसांतले सूर्यास्त किती सुंदर असतात !' मी म्हटलें.

'सूर्यास्त कीं सूर्यास्तानंतरच्या चांदण्या ? माझी कांहीं आज लहर लागत नाहीं सहलीला निघायाला. कॅरमचा डाव खेळण्याची किती दिवसांनीं हुक्की आली आहे मला, आणि मी थांबलों आहें तुझ्यासाठीं एवढा वेळ.'

पण त्याला बाहेर काढण्याचा हट्टच घेतला मी. शेवटीं नाइलाज होऊन तो म्हणाला. 'भल्या गृहस्था, मला का नको आहे बाहेर निघायाला अशा वेळीं ? माझीं धोतरं झालीं आहेत सगळीं मळकट व एक स्वच्छ आहे, तें आहे आठ ठिकाणीं फाटलेलें. तुझ्याकडून व्यवस्थितपणावर व्याख्यान ऐकण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून तर घेतले मी एवढे आढेवेढे !'

'अजून पोर आहेस. आपलीं छिद्रं शिताफीनं लपवून दिमाखानं मिरविण्याची कला साधलेली दिसत नाहीं तुला. जगाच्या फजीत-खान्यांत हंसं व्हायला नको असेल तर आतांपासूनच फाळे लपवून नेसायाला शीक!'

माझ्या शिकवणीप्रमाणं तो नेसून तयार झाला व आम्हीं चालायाला लागलों.

स्वत:चीं छिद्रं लपविण्याची दीक्षा जगच नाहीं का आपणाला देत? भोंक दिसलं कीं बोट घालून तें मोठं करण्याचा मोह जगाला अनावर होतो. तसं न केलं तर करमणुकीची एक संधि आपण वायां दवडली असं त्याला वाटत असतं. मग सामान्य माणसानं आपलीं स्वभावछिद्रं लपवण्याचा प्रयत्न केला तर तें क्षम्यच नाहीं का? आपल्या व्यक्तित्वाचीं छिद्रं आपण निर्माण केलेलीं असतात थोडींच, तीं आपल्यावर, वांशिकता व परिस्थिति यांनींच बहुतांशीं लादलेलीं असतात. आणि हें सत्य कळलं असूनहि जग कांहीं त्यांच्याबद्दल आपणाला कमी जबाबदार धरायाला तयार नाहीं.

अशा विचारांत मी चाललों आहें तोंच प्रभाची गांठ पडली. तो गजाला उद्देशून म्हणाला 'कसं पण बरोबर पकडलं? मला फसवीत होतास नाहीं?' गजानं क्षणभर चमकून आपलं धोतर व्यवस्थित करण्यासाठीं कासोट्याचे सोगे जरा ओढून घेतले. त्यासरशीं अचुक एक फाळा बाहेर निघाला. 'मी इतका वेळ विनवलं त्यावेळीं तुझा पाय ठणकत होता तो थांबला वाटतं इतक्यांत?' प्रभा पुढं म्हणाला. गजाचें बंड असं अकल्पितपणं बाहेर फुटलेलं पाहून मला एकदम हंसू कोसळलं. केवढा वेळ तरी आम्हीं तिघेहि सारखे हंसत होतों.

महत्प्रयासानं लपविलेलीं छिद्रं कधीं कधीं सहज कशीं उघडीं पडतात या विषयावर आमचीं बोलणीं सुरू झालीं. प्रभानं आपल्या लहानपणची एकआठवण सांगायाला सुरवात केली. तो म्हणाला.

'आमच्या घराण्यांत एक बडे अंमलदार होते. त्यांनीं दानशूरत्वाबद्दल बरीच प्रसिद्धी मिळविली होती. रजेच्या दिवसांत ते घरीं आले कीं चतुर्थीच्या किंवा दिवाळीच्या सणानिमित्त पुष्कळांना त्यांच्याकडून पै पैसा मिळे. एके दिवशीं केऱ्या पाडण्यासाठीं म्हणून मी मागील दारच्या परसांत जात होतों. आमचं न्हाणीघरहि तिथंच होतं. कुटुंब मोठं असल्यामुळं सगळे हांडे रांगेनें ठेवलेले असत. माझं सहज तिकडे लक्ष गेलें. इकडे हे दानशूर गृहस्थ आंघोळ करतां करतां दुसऱ्याच्या हांड्यांतलं पाणी आपल्या हांड्यांत ओतीत होते. स्वतःच्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. शेवटीं त्या थोर महात्म्याच्या गुन्हेगार डोळ्यांवर विश्वास ठेवून मी शिकायाचा तो धडा शिकलों. त्या दिवसापासून ते माझ्यावर फारच लोभ दाखवूं लागले. पण प्रत्येक खेपेस खाऊ, पुस्तकं वगैरे देऊन त्यानीं ती माझी आठवण कितीतरी दिवस ताजी राखली होती. त्या प्रसंगानंतर त्यानीं हें फाजील औदार्य दाखविलं नसतं तर मी तो विसरूनहि गेलों असतों.'

प्रभाची ती आठवण खरोखरच मला मोठी बोधप्रद वाटते. मनुष्यस्वभावाच्या बाबतींत पावलोपावलीं हीच गोष्ट आपल्या प्रत्ययाला येत नाहीं काय ? माणसं परस्परांशीं वागतांना आपलीं स्वभावछिद्रं लपवण्याची शिकस्त करीत असतात. जगाच्या सहानुभूतिशून्य वृत्तीमुळं त्यांना तसं वागावं लागतं असं म्हणावं हवं तर. पण असं घडतं खरं. आणि तसं करणं त्यामुळंच फारसं अनिष्ट ठरत नाहीं. प्रिय व्यक्तीचा सारा स्वभावपट स्पष्टपणं दृष्टीपुढं उभा राहि-

त्यावर आपली तद्विषयक जिज्ञासा व औत्सुक्यबुद्धि मावळत जाते. सामान्य मनुष्यस्वभाव आहे हा. दिसणाऱ्या छिद्रांतूनहि मानवतेचा थांग घेण्याच्या उत्कंठेनं न बाचकतां त्यांकडे पाहणारे कुठंहि झाले तरी दुर्मिळच. त्यामुळं प्रेमांत व युद्धांत या लपवाछपवीचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतर राहत नाहीं. पण प्राप्त परिस्थिति म्हणून आपलीं छिद्रं लपवणं हें वाईट नसलं तरी तेवढ्याच खटाटोपांत सगळी शक्ति खर्च करण्यापेक्षां वेळींच त्यांना टांके मारण्यांत किंवा आपल्या मनोधर्माशीं सुसंगत असतील अशींच ठिगळं जोडण्यांत ती खर्च करणंच शेवटीं जास्त शहाणपणाचं ठरतं. नाहीं तर शिकस्तीनं लपवलेलं छिद्र एकाएकीं उघडकीस आलं म्हणजे त्या दानशूर (!) गृहस्थाप्रमाणं आपण आपल्या वैगुण्याच्या अगदीं उलट असा सद्गुण पाजळायाला जातों. त्याच्या प्रकाशांत तें चांगलंच उठून दिसतं व आपण अधिकच हास्यास्पद ठरतों. मनुष्याचा हा स्वभावविशेष पाहिला म्हणजे अत्तर लुटावयाला लावणाऱ्या बादशहाची मला आठवण होते. अत्तराचा पडलेला थेंब बोटानं पुसून काढणं बादशहाला शोभत नाहीं हें खरं असलं तरी आपलं वैगुण्य लपवण्यासाठीं दुसरे दिवशीं अत्तराचे हौद लुटावयाला लावण्याइतकें तें निःसंशय हास्यास्पद नाहीं. बादशहाची चूक फार तर बिरबलासारख्याच्याच काय ती लक्षांत आली असती. इतरांनीं त्याच्या मितव्ययीपणाचींच अष्टकं गायलीं असतीं कदाचित. पण ती सुधारण्याच्या शहाणपणानं मात्र ती अजरामर होऊन राहिली.

मनुष्यजात काहीं बादशहा होऊन जन्माला आलेली नाहीं. एक मनुष्य राजघराण्यांत जन्माला आला म्हणजे काहीं त्याच्यांतला मानवजातीचा इतिहास पुसला जात नाहीं. मग बादशहानं पडलेला अत्तराचा थेंब काढून घेतला तर तें उपेक्षणीय नाहीं का ?

मानव हा विविध विरोधांची गोळाबेरीज आहे. तो कधीं देव होतो तर कधीं दानव होतो व म्हणूनच त्याला दोघांनाहि निर्माण करतां आलं. समुद्रमंथनाची कल्पना मला वाटतं मानवी मनावरचेंच एक रम्य रूपक आहे. आपल्या अंतःकरणांत रात्रंदिवस थैमान घालणाऱ्या भावनाविकारांना सुरासुर म्हटलं तर तें शोभून दिसणार नाहीं का? विवेकशक्तीच्या रवीनं ज्यावेळीं आपण त्याचें मंथन चालवतों त्यावेळीं चौदाच काय अनंत रत्नं त्यांतून वर येतात. कलावंताचं अंतःकरण हें अहर्निश चाललेलं समुद्रमंथनच असतं. पण या रत्नांत अमृतहि असतं आणि सुराहि पण असते. मानवी मनाच्या या सत्य स्वरूपाची जगाला कल्पना असली, आणि आम्हांपैकीं प्रत्येकाला स्वतःच्या वैगुण्याची जाणीव असली, तरी तटस्थतेनं त्यांकडे पाहाण्याची, परस्परांचें उणं भरून काढण्याची वृत्ति काहीं प्रत्यक्ष जीवनांत आपणाकडून आचरली जात नाहीं. एवढेंच नव्हे तर अशा वृत्तीला उत्तेजनहि दिलें जात नाहीं. त्यामुळंच पुष्कळशीं माणसं दुःखी झालेलीं आपण पाहातों. काल गळयांत गळा घालणारे मित्र आज एकमेकांच्या मानगुटीला हात घालतात. अनेक विरोधांशीं झगडत प्रीतिविवाहानें बद्ध झालेलीं जोडपीं क्षुल्लक कारणावरून लग्नविच्छेदाला तयार होतात. या व अशा अनेक गोष्टींचं मर्म येथंच आहे. माणसं परस्परांशीं वागतांना आपलीं छिद्रं लपवून वागत असतात पण जसजशीं तीं निकट येत जातात तसतशीं तीं लपवणं अधिकाधिक अशक्य होत जातें व एक दिवस सत्य स्वरूपांत आपण परस्परांपुढें उभे राहतों. त्याचवेळीं आपली खरी परीक्षा होते.

आणि शेंकडा नवाण्णव माणसें तींत रोज नापास होतात म्हणून मी म्हणतों, छिद्रं अवश्य लपवावींत पण तीं दिसलींच तर तिकडे डोळे-झाक करावी व ठिगळं जोडावयाचींच असलीं तर आपल्या स्वभावाशीं शोभून दिसतील अशींच जोडावीं. उगीच सुती कपड्याला मखमली ठिगळं जोडून हास्यास्पद होण्यांत काय अर्थ आहे ?

# थोरांचा गुरु

दिव्य दृष्टि प्राप्त झाली म्हणजे 'साध्याहि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे' हें सर्वांनाच माहीत आहे. माझीच गोष्ट घ्या ना. Gran Rhys चा A brother of St. Francis हा लघुनिबंध वाचल्या पासून मला जी दृष्टि लाभली तिच्यामुळं माझ्या पुष्कळशा घटका गमतींत व विचारांत जातात. पूर्वी डुकर हा प्राणी जणुं काय आपल्या गांवचाच नव्हे अशी त्याजकडची माझी वागणूक असे. पण आतां तो संतांचा व पर्यायानें आमचाहि भाऊ असल्याचें कळल्यापासून स्वाभाविकच मी त्याच्याकडे आपुलकीनें पाहूं लागलों आहें.

राजविलासांत रममाण झाल्यासारखा तो चिखलाच्या डबक्यांत कसा तासाचेतास खुशाल पडून असतो, कुत्र्याची चुलूस लागतांच चपळाईनें उठून शेंपटी मुरडून कसा एकाच दिशेनें धूम पळत सुटतो, वाळणी पेज घालण्याची वेळ झाली व आपल्या मालकीणीचा हेल कानीं पडला म्हणजे वक्तशीरपणें कसा ठराविक स्थळीं हजर होतो इत्यादि त्याच्या कृती मी बारकाइनें पहात असतों. भक्तीचें पर्यवसान ज्ञानांत होतें म्हणतात ना? त्या प्रमाणें

माझ्या या आपुलकीमुळें हा सामान्यपणें कुरूप व बेढब गणला गेलेला प्राणी मला एका अनिर्वचनीय अर्थानें सुंदर वाटूं लागला आहे. कुरूपतेच्या वरपांगी आभासाच्या पलीकडचें निरंजन सौंदर्य पहाण्याची ही शक्ति वाडविण्याचा मी सतत प्रयत्न ठेवला तर लवकरच मी Cubist, Impressionist व Modernist कलेवर अधिकारी वाणीनें नवे गूढ सिद्धांत सांगूं शकेन असा मला विश्वास वाटतो !

दशावतार ही परमेश्वराची साधना आहे व तिची वराह ही तिसरी पायरी आहे हें संशयवाद्यांनीं जरूर लक्षांत ठेवावें. परमेश्वरानें एका अवतारासाठीं हा प्राणी पसंत करण्यांत त्याची स्वयंसिद्ध योजकताच दिसून येते.

किती सद्गुणांचें त्याच्यांत बेमालूम मिश्रण झालें आहे पहा. शुद्धाशुद्धांचें अद्वैत त्याच्यांत मूर्तिमंत अवतरलें आहे. खाणें, पिणें, निजणें, उठणें या सर्व बाबतींत तो उपासनी बाबांचा परात्पर गुरु शोभेल. बाबा मलमूत्रांत गोविंदस्वरूप पाहूनच गप्प बसतील तर हा महात्मा त्याला आत्मरूपांत लीन करून घेईल. तो जन्मतःच निःसंग आहे. त्यामुळें दिगंबरपंथीय सनातनी महंत व त्याच पंथाचे पाश्चिमात्य नवे अध्वर्यु यांना तो सारखाच अनुकरणीय होतो. या परमार्थसाधनांत तो मग्न असला तरी प्रपंचाकडे त्याचें दुर्लक्ष नाहीं. अनंग रंग रतिशास्त्रांत तो पारंगत असून वात्स्यायनभक्त सनातनी व फ्रॉइडपंथीय नवमतवादी या दोघांनाहि मार्गदर्शक होण्याइतकें प्राविण्य त्याच्या ठिकाणीं असतें. संततिनियमनाच्या तो विरुद्ध आहे असा आक्षेप त्याच्या विरुद्ध येणें शक्य आहे. पण त्याचें त्याबाबतींतलें

वर्तन अज्ञानमूलक नसून दूरदर्शित्व दाखवणारें आहे. त्यानें संतति-नियमन आरंभल्यास अल्पावकाशांत ख्रिस्ताच्या कोंकरांचे कसे हाल होतील हें तो जाणून आहे. तसें झालें तर लवकरच धर्मग्लानि होईल याची त्याला खात्री असल्यामुळें तो त्यांच्या पोषणासाठीं हुतात्म्यांच्या पिढ्यांवर पिढ्या निर्माण करीत असतो. यावरून त्याच्या असीम भूतदयेची सहज कल्पना येण्यासारखी आहे. बलिदानापूर्वीं त्याची उलटी पालखी काढण्यांत येते, हातपाय व तोंड बांधून त्याला भोकसण्यांत येतें व शेवटीं त्याला आगींत टाकण्यांत येते. अशा अमानुष—छेः मानुष छळानें त्याला ख्रिस्ताच्या स्वर्गांत मानाचें पान मिळालें तर त्यांत आश्चर्य करण्यासारखें काय आहे? कोणत्याहि ख्रिस्ती उत्सवाच्या पूर्वदिवशीं त्याला जें स्वर्गाचें निमंत्रण येतें तें प्रेषितांच्या पंक्तीला बसण्यासाठींच असावें बहुतेक. तो सुद्धां एका परी प्रेषितांप्रमाणें स्वतःच्या जीवनांतून संदेश देऊनच नाहीं का जात? वैयक्तिक प्रपंच किंवा संकुचित परमार्थ यांच्यापुरती त्याची दृष्टि मर्यादित नाहीं. तो स्वतः कितीहि ओंगळ असला, किंबहुना दिसला तरी शहराच्या किंवा गांवच्या स्वच्छतेकडे त्याचें दुर्लक्ष नाहीं. तो एकदमच अनेकदां कामचुकार म्युनिसिपालटीची अब्रू व सार्वत्रिक शांतता सांभाळतो. शहरांत त्याची वसाहत असली तर काय बिशाद् आहे भंग्यांची संप करायाची! त्याच्या या द्विविध कार्याबद्दल Peace Prize नसलें तरी म्युनिसिपालटीचें मानपत्र त्याला अवश्य मिळालें पाहिजे. त्याचे मातीचे व चिखलाचे प्रयोग वैद्यकशास्त्रांत निःसंशय क्रांति घडवून आणतील. एखाद्या चतुष्पादभाषातज्ज्ञाला त्याची 'प्रदीर्घ मुलाखत' घेतां आली तर 'डॉक्टरीण माती' किंवा 'वैद्यराज चिखल' हे महत्वाचे ग्रंथ लिहू-

न तो वैद्यकसंमेलनाचें अध्यक्षस्थानहि मंडित करील.

असे अनेक सद्गुण अंगीं असल्यामुळें आपल्यांतील अनेक थोरांचा गुरु शोभणाऱ्या डुकराच्या अंगीं केवळ स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं माणसानें नसते दुर्गुण चिकटविले आहेत. ज्या गोष्टी मनुष्यांच्या ठिकाणीं दिसतांच आपण विनम्र होतों व आदरानें किंवा भक्तिभावानें त्यांना फुलें वहातों, त्याच गोष्टी डुकराचे ठिकाणीं दिसतांच नाकाला रुमाल लावणें हा दांभिकपणा आहे व तो मनुष्यालाच शोभण्यासारखा आहे. त्याचें सगळें जीवन मानवजातीच्या हितार्थ खर्च होतें व त्याचा मोबदला त्याला मिळतो कसा ? तर त्याचें नांव शिवीसारखें वापरण्यांत येऊन. आपल्या सुदैवानें त्याला बिचाऱ्याला मानवजातीचा सारा इतिहास, साधुसंतांचे आचारविचार, महापुरुषांचीं वेडें, सामान्यांची अंधश्रद्धा, अर्थयुगांतील स्पर्धा, राष्ट्राराष्ट्रांचा अधाशीपणा इत्यादि गोष्टी ठाऊक नाहींत म्हणून बरें. नाहीं तर त्यानेंच 'माणूस' शब्द आपल्या व्यवहारांत शिवी म्हणून वापरला असता. आणि तो तसा वापरीत नसेल याला तरी पुरावा काय ?—मग मानवजातीचा एक घटक या नात्यानें मी डुकराकडे जरा सहानुभूतीनें पाहिलें तर त्यांत आपणां सर्वांचेंच हित नाहीं काय ?

# मूर्तिभंजक

'गझनीचा महम्मूद' हा धडा शिकवून मी नुकताच घरीं परतलों होतों पण अजूनहि माझ्या मनश्चक्षूंपुढून त्याच्या रोमहर्षण चरित्रांतलीं विविध दृश्यें जागत्या रंगांनीं तरळत होतीं.

गझनीच्या उजाड व अफाट पठारांवरून उंटांच्या लांबच्या लांब रांगा सारख्या सरकत आहेत, त्यांवर आरूढ झालेल्या त्या गोष्टीवेल्हाळ अरब व्यापाऱ्यांना तो चिमुकला महम्मूद आग्रहानें थांबवीत आहे, ते त्याला निरनिराळीं रेशमी वस्त्रें व बहुमोल जड जवाहीर दाखवीत हिंदुस्थानच्या दैदिप्यमान वैभवाच्या, सोन्या-रुप्याच्या व हिरेमाणकांच्या खाणींच्या व रत्नजडित देवमंदिरांच्या अद्भूतरम्य नवलकथा सांगत आहेत व अधीरपणें एवढा वेळ ऐकत असलेला तो महम्मूद खिन्न मनानें पण जागृत महत्त्वाकांक्षेनें दिग्विजयाचे असंख्य मनोरे उभवीत रात्रीच्या रात्री जागत घालवीत आहे असें चित्र माझ्या नजेरपुढून सरकून गेलें.

पण त्या चित्राच्या मागोमाग दुसरें चित्र माझ्या नजेरपुढें उभें झालें.

आतां तारुण्याच्या व महात्वाकांक्षेच्या धुंदीनें बेहोष झालेला महम्मूद आपल्या धिप्पाड व दणगट अफगाणांची फौज घेऊन हिंदुस्थानावर सारख्या स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करीत शहरांची शहरें उध्वस्त करीत वैभवाची लूट नेत आहे. आणि ती स्वारी !---अनेक रजपूत राण्यांना धूळ चारुन विजयाच्या उन्मादानें सोमनाथाच्या मंदिरांत घुसून त्यावर सोटा हाणण्यास सरसावणारा महम्मूद---मूर्तीबद्दल पैसे देऊन ती सांभाळण्याची धडपड करणारे व गर्भगळीत होऊन लटलट कांपणारे पुजारी व त्यांच्याकडे तिरस्कारानें एक दृष्टिक्षेप करीत 'मी मूर्तिविक्या नाहीं मी मूर्तिभंजक आहें' असें ताठरपणानें सांगत मूर्तीचीं शकलें करतांनाचा तो त्याचा आवेश या सर्वांच्या दर्शनानें माझें मन क्षणभर भयभीत झालें.

त्याच महम्मुदाचा मरण समय आतां समीप आला होता. अबूच्या पहाडावरील शिवमंदिर पाडतांना झालेल्या आवाजानें त्याच्या हृदयाला जबर धक्का बसला होता. हकीमाच्या सांगण्यानें त्यानें माणसांचे गर्भहि बांधून पाहिले. पण सारें व्यर्थ !

तो पहा. अंत्य घडी जवळ आली आहे, या जाणिवेनें त्यानें कशी हाय खाल्ली आहे. तें कर्तृत्वशाली तारुण्य व तो तज्जन्य ताठा दोनहि आतां त्याच्या ठिकाणीं राहिलेलीं नाहींत. 'मूर्तिभंजक' हें बिरुद अभिमानानें मिरवणारा तो दिग्विजयी महम्मूद पहा कसा आजवर मिळविलेल्या धनाचा ढिगारा रचून त्याकडे टक लावून पाहात आहे. त्याच्या विरहाच्या कल्पनेनें तीं पहा त्याच्या डोळ्यांत आसवेंहि उभीं राहिलीं.

या तीनही चित्रांच्या दर्शनानें माझें मन थरकल्याशिवाय राहिलें नाहीं. माझ्या मतें प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगांत 'गझनीचा महम्मूद' अंशतः तरी असतोच. तो बालपणांत दिग्विजयाचीं अनंत सुखस्वप्नें चितारतो. त्यांपैकीं अनेक आपल्या पितरांच्या पूजामूर्ति, त्यांचीं ध्येयें, त्यांचे विचार, संकेत आणि समजुती यांचा विध्वंस मांडण्याचीं असतात. त्यांतील कांहीं फलद्रूप होतात. पण एकीकडून मूर्ति फोडीत असतांनाच तो दुसरीकडून नव्या मूर्ति घडवीत असतो व नवीं मंदिरें रचीत असतो. आणि अंतःकालीं त्यांच्या विरहाच्या जाणीवेनें व्यथीत होतो व त्यांच्या भवितव्याच्या कल्पनेनें शंकाकुल होतो.

'मूर्तिभंजक' हें बिरुद मिरविण्याची धडपड आजच्या नवमतवाद्यांमध्येंच दिसते असें नाहीं. मानवी मनाइतकीच ती सनातन आहे. सत्यशोधनासाठीं त्या त्या कालच्या प्रेषितांनीं व विचारवंतांनीं मूर्तींच्या विध्वंसनाचें कार्य अव्याहत केलेलें आहे. अद्वैतवादी हिंदूनीं मूर्तींची प्रतिष्ठापना केली, निर्वाणवादी बौद्धांनीं बुद्धाच्याच मूर्ति जागोजाग उभ्या केल्या व काष्ठ पाषाणांना देव मानणें पाप आहे अशी शिकवण प्रतिपादणाऱ्या महंमद पैगंबराचे अनुयायी मक्केकडे तोंड करून नमाज पढतात व 'पवित्र गालिच्या'च्या पालख्या काढतात.

मानवजातीचा इतिहास म्हणजे तरी काय? पहिल्या पिढीच्या मूर्ति दुसऱ्या पिढीनें फोडायाच्या व त्याजागीं आपल्या नव्या मूर्तींची स्थापना करायाची व तिसऱ्या पिढीनें पहिलीच्या मूर्तींचे

उध्वस्त अवशेष महत्प्रयासानें गोळा करून अमोलिक धन म्हणून ते वस्तुसंग्रहांत सांभाळून ठेवायाचे, असा अखंड क्रम म्हणजेच आपला इतिहास.

निराकार सत्य एकाद्या महापुरुषालाच दिसूं शकतें. सर्वसामान्य जनतेला प्रतिकाशिवाय त्याचें दर्शन घेतां येत नाहीं. प्रत्येक पिढीला पूजनीय वाटणाऱ्या विभूति, तत्वें, ध्येयें, समजुती या सर्व मूर्तीच आहेत. स्थलकालाप्रमाणें त्या बदलत राहणें हेंच आपल्या विकासाचें सुचिन्ह. त्यामुळें घाबरून जाण्याचें कांहींहि कारण नाहीं. अशा मूर्ति मानवजातीला सोडतां कधींहि यायच्या नाहींत. कारण त्या म्हणजेच तिचा इतिहास, तिची कला, तिचें वाङ्मय, तिचें समाजजीवन.

मानवजात ही झपाट्यानें धांवणारी व वरचेवर अनपेक्षित वळणें घेत राहणारी एक अचाट सामर्थ्याची नदी आहे. ती धांवतांना कांठाचीं डिखळें पाडते व तशा रीतीनें आपलीं बंधनें झुगारीत रहाते. पण ती सर्वस्वी केव्हांहि बंधमुक्त होऊं शकत नाहीं. या बदलत्या बंधनांतलें वाढतें अंतर म्हणजेच विकास, नाहीं का ?

हा समंजस दृष्टिकोण सामाजिक जीवनांत असो किंवा कौटुंबिक जीवनांत असो जरूर पाहिजे. तो असला म्हणजे प्रगति सुकर होते. तरुणांच्या अश्रद्धेमुळें वृद्ध वैतागत नाहींत व वृद्धांच्या भाविकतेमुळें तरुण निराश होत नाहींत. कारण मनुष्य हा स्वभावतः अश्रद्धहि नाहीं व श्रद्धाशीलहि नाहीं. त्याच्या आयुष्यांत श्रद्धेचा, आंधळ्या पण पवित्र भावनेचा एक काल येतो. त्या कालखंडांत,

मोहरलेल्या वृत्तींच्या गोड सुगंधांत तो निमग्न असतो. त्या कालांत प्रिय झालेल्या व्यक्ति व तत्त्वें कायमचीं आपल्या जीवाला जडून राहतात. त्यांच्याबद्दलचा जिव्हाळा सहसा आपणाला सुटत नाहीं. पुढें, तो काल गेल्यावर, त्यांच्याहून विशेष गुणी माणसें किंवा जास्त मूलगामी तत्त्वें आपल्या आढळांत आलीं तरी आपलें मन क्वचित जिंकूं शकतात. उदाहरण म्हणून माझा एक अनुभव तुम्हांला सांगतों. मी एकदां एका बैठकीला होतों. तीन पिढ्यांचे प्रतिनिधि तिथें उपस्थित होते. कशावरून तरी नटांच्या कौशल्याबद्दलच्या गोष्टी निघाल्या. दाते, वैशंपायन, केशवराव, बालगंधर्व यांच्या कामाचीं स्तुतिस्तोत्रें आम्हीं गात होतों. तीं अर्ध्यावरच 'थांबवून आमच्या पूर्वींच्या पिढीचीं माणसें 'चिंतुबुवा', 'भावड्या' 'अण्णा किर्लोस्कर' व 'दत्तोपंत हल्याळकर' यांच्या अद्भुतकथा आम्हांस सुनावूं लागले. त्या गोष्टीचा अजबपणा व अवास्तवता अगदीं अपुरी वाटल्यामुळेंच कीं काय, एवढा वेळ मुकाट्यानें बसलेला एक म्हातारा वर्मीं घाव बसल्यासारखा उठला व चवताळून तावातावानें आपल्या काळचे ते दशावतारी खेळ, लांकडी नऊ तोंडें व अठरा हात अंगावर पेलून आवेश करणारे ते महारथी व रंगभूमीला समरभूमीची कला आणण्याचें त्यांचें सामर्थ्य इत्यादी गोष्टी तिखट मीठ लावून सांगूं लागला. आम्हांला वाटलें, सगळेंच रामायण महाभारत ऐकावें लागतें कीं काय ?

त्या सगळ्या गप्पांवरून त्रयस्थाला वाटलें असतें, महाराष्ट्रांत नाट्यकलेची सारखी अधोगति होत चालली आहे.

अशा एक ना हजार गोष्टी! आतांच्या मोठ्या माणसांच्या गोष्टी सांगा ना तुम्हीं. तुमच्या वडलांच्या पिढींतला मनुष्य तुम्हांला तत्कालीन महापुरुषांच्या कथा सांगून आजच्या लोकांना बाहुलीं ठरवील.

पुष्कळदां आमच्या घरच्या वडील माणसांच्या तोंडून ऐकलं आहे मी. 'अरे इतकं शिकून व हे कुर्से करून कसली पोर्तुगीज लिहितां तुम्हीं? नाहींतर आमच्या कालीं—' त्यांच्या या म्हणण्याची शहानिशा करून घेण्यासाठीं मी मुद्दाम एक दिवस जुन्या नियतकालिकांच्या फायली काढून त्यांनीं सांगितलेल्या लेखकांचीं पोर्तुगीज म्हणींचीं भाषांतरें पाहिलीं. मला हसूं कोसळलें. जुन्या कालीं शब्दांचे अर्थहि बदलत असत अशी मी माझी सोईस्कर समजूत करून घेतली, झालें.

म्हणून वरचेवर आप्तवाक्यें सांगून आपलें कीर्तन रंगविणाऱ्या कथेकऱ्याची ज्यावेळीं एकादा पदवीधर थट्टा करतो व आपल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ पाश्चात्य लेखकांचे उतारे धडाधड म्हणतो त्यावेळीं मी मनांत हंसतों व म्हणतों. 'हा नव्या युगाचा कथेकरी आहे, झालं—'

# दुःखाचा शोध

खांडेकरांचा ' चांदण्यांत ' हा लघुनिबंधसंग्रह मी नुकताच वाचून हातावेगळा केला होता. त्यांतल्या एका लघुनिबंधानं तर माझ्या मनाची विशेषच पकड घेतली होती. कदाचित स्वतःच्या कवितेचीं अवतरणं त्यांत आढळल्यामुळं तो मी विशेष आत्मीयतेनं वाचला असेल. 'सुखाचा शोध' हा त्याचा मथळा अधिकाधिक मोठा होत माझ्या मनश्चक्षूंपुढें पुन्हापुन्हां उभा राही. 'मनुष्याचा सर्वांत मोठा शत्रु तो स्वतःच आहे.' हें त्यांतलं वाक्य केवढा तरी वेळ माझ्या कानांत प्रतिध्वनित होत होतं. अनेक हरिदासपुराणिकांच्या तोंडून मी हेच शब्द कैक वेळां ऐकले असतील पण माझ्या दृष्टीनं, निरर्थकतेची पांडित्यप्रचुर बडबड या पलीकडे त्यांना फारशी किंमत नव्हती. ते माझ्या कानांवर आदळले होते, ते माझ्या मनाला शिवले नव्हते. पण त्याच शब्दांना आज विलक्षण अर्थ आलेला होता. खांडेकरांच्या व्यक्तित्वाच्या भारानं व प्रतिभेच्या धारेनं त्यांना ही अपूर्व संजीवक शक्ति आलेली होती. त्या वाक्यानं माझ्या मर्मस्थलाव-

रच आघात केला होता. अपराधी अंतःकरणानं मी आत्मनिरीक्षण करीत होतों. मीच माझा शत्रु आहें हाच तर तो कबुलीजबाब नव्हता ?

घराच्या कोनाकोपऱ्यांतले अमृतघट शोधणारा मी खरोखरच सुखी आहें का ? चहाचा एकादा घोट, वाऱ्याची झुळूक, तारेवरचीं भुरटीं पांखरें, कुरणांतलीं चिमणीं फुलें, चिरंतन काव्याचा एकादा गोड चरण अशा स्थिरचरांतल्या लहान सहान घटनांतूनहि अमोल रत्नें शोधून काढणारे भाऊसाहेब सुखी आहेत का ? 'अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे ' असं गुणगुणत त्या दिव्याच्या दिव्य प्रकाशानं धुळीचंहि सोनं करणारे खांडेकर सुखी आहेत का ? कितीदां तरी त्यांना हा प्रश्न विचारण्याची माझी इच्छा अनावर झाली असेल. स्वतःच्याच दुर्दैवाचं भीषण तांडवनृत्य पाहून त्याची थट्टा करीत हंसणाऱ्या खांडेकरांना हा प्रश्न करण्याचं धाडस मला झालं असतं का ?

' मनुष्याचा सर्वांत मोठा शत्रु तो स्वतःच आहे. ' पण तो तसा कां आहे ? कांटे चघळीत आपल्याच रक्ताचे आंवढे घोटण्यांत उंटाप्रमाणं माणसालाहि का समाधान असते ? मला नाहीं वाटत असं. जीवनाच्या विविधतेचं नाविन्य अनुभवण्यासाठीं एक वेळ तो तसंहि करील. पण तो त्याचा नित्य स्वभाव खास नाहीं. तो स्वभावतः आत्महत्याराहि नाहीं व परहत्याराहि नाहीं. पण जीवनांत तो तसा ठरतो खरा.

स्पेनांतली यादवी, चिनांतला रक्तपात, हबशांच्या कतली,

रशियांतलं शिरकाण, आस्ट्रियाचं अपहरण ..एक ना हजार तऱ्हांनीं मनुष्यानं चालविलेला आत्मनाश व कुलविनाश खांडेकरांच्या विधानाचीच सत्यता पटवीत नाहीं का ?

पण अप्राप्य सुखाच्या मृगजळामागं धावल्यानं का मनुष्य स्वतःचा शत्रु ठरला आहे ? मोहाचा गळ लागून विव्हळ होण्यांत काहींच का सुख नसेल ?

मनुष्य स्वतःचा शत्रु ठरतो तो यामुळं असं म्हणण्यापेक्षां सुखाचा शोध घेण्याच्या वेड्या हव्यासामुळं असंच मला म्हणावसं वाटतं. सुखाचा शोध घेण्याच्या निरर्थक व निष्फळ खटाटोपांत दुःखाचा शोध घेण्याचं त्याच्या लक्षांतहि येत नाहीं व हेंच त्याला आत्मशत्रु बनवीत असतं.

ज्यावेळीं दोन प्रहरच्या उन्हांत घामानं भिजलेला, धुळीनं माखलेला अनवाणी व उपाशी भिकारी लाचारपणं दोन घांसांची याचना करतो, त्यावेळीं फार तर मूठभर दाणे त्याच्या ओंजळींत टाकून आपण कृतार्थता मानतों. त्याच्या हांकेबरोबर अंतःकरणाला जखम होऊन त्यांतलें रक्त तिला ओ द्यायला धांवलं. पण विश्वभर विस्तारण्यासाठीं धडपडणाऱ्या त्या रक्ताचा, सहानुभूतिचा, माणुसकीचा प्रवाह अडवण्यासाठीं आपण दयेचे दोन घांस टाकून त्याला वाटेला लावतों. अशा रीतीनं स्वतःच्या जखमेवर मलमपट्टी लावून आपण आपला प्रश्न मिटवतों व त्याचा प्रश्न मिटला अशी मनाची समजाविशी करतों. आपली ही आत्मवंचना अप्रतिहत चाललेली आहे. दैनंदिन सुखसोयींच्या उबदार अडगळीचा मोह आपल्या सुखासीन

मनाला झुगारतां येत नाहीं. म्हणूनच दुःखाचा शोध घेण्याची यातायात करण्यास आपण सहसा तयार होत नाहीं. झेपेल ती दया दाखवून मी अनेक अनाथ अपंगांना बोटेला लावलं आहे व माझ्या लहानसहान सुखांत लगेच रमूनहि गेलों आहें. वर्डस्वर्थप्रमाणं मीहि मनुष्यानं केलेली मनुष्याची हीनावस्था पाहून 'Have I not reason to lament what man has made of man?' असे उद्गार काढले आहेत व सुस्कारेहि टाकले आहेत. पण दुःखाचा शोध घेण्याचा प्रयत्न मी कितीसा केला आहे?

लहानपणांत मी दारांत आलेल्या भिकाऱ्यांशीं केवढा वेळ तरी समरस होऊन गोष्टी बोलत असें. अनेकदां वडिलमाणसांचा डोळा चुकवून मी त्यांना तांदूळ आणि नारळ दिलेले आहेत. एकीकडून अपराधी मन मला खात होतं तर दुसरीकडून तें दिव्य समाधानाचा आस्वाद घेत होतं. भिकारी दृष्टीआड झाल्यानंतरहि त्यांच्या चंद्रमौळी संसाराचीं विविध कल्पनाचित्रं चितारीत मी घटकान् घटका घालवीत असें.

लहानपणीं आपण कवि असतों व वाढत्या वयाबरोबर अधिकाधिक व्यवहारी बनत जातों. आपल्या काव्यशक्तीचं, माणुसकीचं मोल देऊन दैनंदिन सुखांची आपण सारखी खरेदी चालवलेली असते. माणुसकी गमावीत गेल्यामुळंच मनुष्य स्वतःचा शत्रु ठरला आहे. माणुसकीचा विलास म्हणजेच काव्य. कल्पकता व सहानुभूति हेच दोघांचेहि प्राण. थोर कलावंत, सुधारक, पुढारी किंवा शास्त्रज्ञ यांचें कर्तृत्व हें माणुसकीचं व म्हणूनच काव्याचं नृत्यांगण होत असतं, नाहीं का?

## दुःखाचा शोध

मार्क्स किंवा लेनिन यांची माणुसकी मोठी म्हणूनच तिनें अवाट कल्पकता व विशाल सहानुभूति या आपल्या दोनहि हातानीं मानवजातीला पोटाशीं कवळलें. दोन दगेचे घांस टाकून त्यांनीं आत्मवंचना करून घेतली नाहीं. दुःखाचा शोध घेण्याचें पवित्र कर्तव्य टाळलं नाहीं म्हणूनच ते मानवजातीचा प्रश्न सोडवूं शकले.

टॉलरची काव्यात्मता किंवा माणुसकी समाजाची हीनावस्था पाहून आंसवं गाळून थांबण्याइतकी दुबळी किंवा सुस्कारे टाकून गप्प बसण्याइतकी संकुचित व निष्क्रिय नव्हती. तर धारातीर्थावर झुंजण्याइतकी कणखर आणि कारागृहांत न खुरटण्याइतकी जिवंत होती म्हणून त्याला दुःखाचा शोध घेतां आला. तो एके ठिकाणीं म्हणतो.

'I do not believe in the essential wickedness of man. I believe that the worst things are done from lack of imagination, from laziness of heart' कल्पकतेची उणीव व अंतःकरणाचा आळशीपणा यामुळं मनुष्य स्वतःचाच शत्रु बनला आहे. टॉलरचं हें म्हणणं कुणाला पटणार नाहीं? काव्यात्मतेच्या सार्वत्रिक अभावामुळंच दुःख दिसतांच आपली कल्पना त्याच्या शोधार्थ धांवत नाहीं. आपली सहानुभूति त्याची आग विझवण्यासाठीं ओसंडत नाहीं. म्हणूनच आपण आपले शत्रु बनतों.

आजवर मनुष्यानं सुखाचा शोध घेण्याच्या वेड्या नादांत जेवढा कालाचा व शक्तीचा अपव्यय केला तेवढ्यांत त्याला दुःखाचा शोध खास घेतां आला असता. चांगलं पीक काढायाला जा-

मरूकतेनं नडणी काढावी लागते हा नियम शेताइतकाच सुखालाहि लागू आहे. सुखाचं सोळा आणे पीक काढायाला दुःखाची नडणी केल्याशिवाय कसं चालेल ?

पण येथें जातीचे पाहिजेत. हें गबाळांचं काम नाहीं 'If only the active could realize the true meaning of what they do and the inactive of what they leave undone, man would no longer be his worst enemy ( जर कार्यमग्नांना आपण केलेल्या कार्याचा व कार्य-विन्मुखांना आपणाला करतां येण्याजोग्या कार्याचा खरा अर्थ कळला असता तर मनुष्य स्वताचा शत्रु होता ना ) टॉलर पुढं म्हणतो पण हा अर्थ कळायाला तरी दृष्टि नको का ? ती लाभायाची कशी ?

स्वतःच्या दुःखांचा शोध घेत समाजाच्या अंतरंगाशीं समरस होणं व समाजदुःखांचा उगम आपणांतून कितपत होत असेल याचा शोध घेणं या दुहेरी कार्याबरोबर ही दृष्टि निःसंशय येत जाते. ही दृष्टि म्हणजेच काव्यदृष्टि. ही काव्यदृष्टि स्वप्नाळू नसते. ती सत्य जीवनाचा साक्षात्कार घडवणारी कल्पवल्ली असते. या दृष्टिलाभानं घरांत किंवा स्थिरचरांत सुख दिसूं लागलं तरी दुःखाचा शोध घे-ण्यांतच मन जास्त गुंतून जातं.

म्हणूनच भाऊसाहेब सुखी असतील का ? मी सुखी आहे का ? हा माझा प्रश्न अनुत्तरितच राहतो. पण दुःखाचा शोध घेण्यांत गढून जाणं हेंच तर सुख नसेल ना ?

५६९५

# शुद्धिपत्र.

अतिशय महत्वाचीं अशुद्धेंच खालीं दुरुस्त करून दिलीं आहेत.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६ | ३ | सशा | अशा |
| ३२ | ५ | पेशवाई | पेशवाज |
| ३५ | १२ | वांङ्मय गुणांच्या | वाङ्मयगुणांच्या दृष्टीनें |
| ३९ | ९ | कुपन असतं | कुपन नसतं |
| ४३ | ३ | संमति | संतति |
| ५१ | १७ | वध | वधु |
| ५३ | ११ | तिकठ्यावर | तिवांठ्यावर |
| ५७ | १४ | दलित | दलितांच्या |
| ५८ | १२ | विलगलीं | बिलगलीं |
| ६२ | १८ | घरांतल्या | धंद्यांतल्या |
| ६६ | ३ | नाईी. | नाहीं ? |
| ६८ | १५ | त्यावेळीं | तोंपर्यंत |
| ६९ | ५ | होतं. | होतं त्यानं. |
| ७२ | ८ | उडवून | उठवून |
| ७६ | १ | असं विचारीत | आणि मग |
| ७६ | १३ | धोंडे बनायाला | धोंडे न बनायाला |

REFBK-0005696